सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १५ मे २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १६६ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघाला राजकारण करायचे नसून राष्ट्रकारण करायचे आहे. जसजशी संघाची संघटनशक्ती वाढत जाईल तसतसा संघ सर्वच राजकीय पक्षांच्या धोरणावर प्रभाव पाडेल. आपले राजकारणही राष्ट्रहिताला सुसंगत असले पाहिजे हे आज ना उद्या प्रत्येक राजकीय पक्ष पाहील.

**- स्व. कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# १६ राज्यांमध्ये 'एसआयआर'

## तीन केंद्रशासित प्रदेशांसह महाराष्ट्राचा समावेश

◆ **नवी दिल्ली, १४ मे**

निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष मतदार यादी सुधारणा (एसआयआर) मोहीम राबवण्याची घोषणा केली आहे. या प्रक्रियेला २० मे २०२६ पासून सुरुवात होणार आहे.

महाराष्ट्रात ही मोहीम २० जूनपासून सुरू होणार आहे. मतदारयाद्या अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबवली जात आहे, असे आयोगाने सांगितले. या प्रक्रियेदरम्यान नव्या मतदारांची नोंदणी, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे तसेच मतदारांच्या तपशीलातील दुरुस्त्या करण्यात येणार आहेत.

पंजाब, मणिपूर आणि उत्तराखंडात आगामी विधानसभा निवडणुका होणार असून, त्याच पृष्ठभूमीवर एसआयआर प्रक्रिया अधिक महत्त्वाची ठरणार आहे. देशभरात १९ ठिकाणी होत असलेल्या एसआयआरची सुरुवात २० मे रोजी होईल. विविध राज्यांचे स्वतंत्र वेळापत्रक आहे. १९ पैकी शेवटच्या राज्याची प्रक्रिया २३ डिसेंबर रोजी पूर्ण होईल.

या विशेष मोहिमेअंतर्गत महाराष्ट्रात ५ ऑगस्ट रोजी मसुदा मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर दावे आणि हरकती स्वीकारण्याची प्रक्रिया पार पडेल. सर्व सुनावण्या आणि पडताळणीनंतर महाराष्ट्रात ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदारयादी प्रकाशित केली जाणार आहे. (वृत्तसंस्था)

### कोणकोणत्या ठिकाणी होणार एसआयआर?



**ही प्रक्रिया महाराष्ट्रासह ओडिशा, मिझोरम, सिक्कीम, मणिपूर, दादरा-नगर-हवेली आणि दीव-दमण, उत्तराखंड, आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरयाणा, चंदीगड, तेलंगणा, पंजाब, कर्नाटक, मेघालय, झारखंड, दिल्ली, नागालॅण्ड, त्रिपुरा अशा १६ राज्यांमध्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये होणार आहे.**

### महाराष्ट्राचे वेळापत्रक

- **तयारी, प्रशिक्षण आणि छपाई :** २० ते २९ जून भरती
- **बीएलओंकडून घरभेटी :** ३० जून ते २९ जुलै
- **मतदान केंद्रांचे तर्कसंगतीकरण :** २९ जुलपर्यंत
- **मसुदा मतदार यादी प्रकाशन :** ५ ऑगस्ट
- **दावे आणि हरकती दाखल करण्याचा कालावधी :** ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर
- **दावे-हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया :** ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर
- **एसआयआरसाठी पात्रता दिनांक :** १ ऑक्टोबर
- **अंतिम मतदार यादी प्रकाशन :** ७ ऑक्टोबर

# सोलापूर जिल्ह्यात अजून १ लाख कोटींच्या निधीतून रस्त्यांचे नेटवर्क उभारणार : ना. गडकरी




### २७८४ कोटीच्या निधीतून सहा कामांचे डिजिटल भूमिपूजन

### सुरत-चेन्नई महामार्गामुळे सोलापूर जिल्ह्याचे चित्र बदलणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

आजतागायत जिल्ह्यात ३४ विकासकामे मंजूर असून, त्यापैकी १५ कामे पूर्ण झाली आहेत, १९ कामे प्रगतीपथावर आहेत. नव्याने २ हजार ७८४ कोटींच्या पाच कामांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये अक्कलकोट-मोहोळ-बसमतनगर मार्ग, रेल्वे उड्डाणपूल, बोरी नदीवरील पूल यांचा समावेश आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात आगामी ३ वर्षात अजून एक लाख कोटी रुपयांची विकासकामे पूर्ण करण्याचा संकल्प केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी श्री स्वामी समर्थांच्या अक्कलकोट नगरीत गुरुवारी सोडला.

सोलापूर जिल्ह्यातील विविध ५ प्रकल्पांचे श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे गुरुवार, दि.१४ मे २०२६ रोजी डिजीटल स्वरुपात भूमीपूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर खा.प्रणिती शिंदे, खा.प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, आ.सुभाष देशमुख, आ.विजय देशमुख, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.समाधान आवताडे, आ.देवेंद्र कोठे, आ.बी.आर.पाटील, माजी आमदार राजन पाटील, प्रशांत परिचारक, राम सातपुते, राजेंद्र राऊत, यशवंत माने, महापौर विनायक कोंडयाल, जि.प.चे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, पक्षनेत्या रश्मी बागल, सभापती रामप्पा चिवडशेट्टी, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशीकांत चव्हाण, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, 'अन्नछत्र'चे अमोलराजे भोसले उपस्थित होते. (उर्वरित वृत्त पान २ वर)

### या नवीन प्रकल्पांचे होणार हे फायदे

प्रस्तुत पॅकेज सुरत चेन्नई ग्रीन फील्ड कॉरिडॉरचा एक भाग आहे. यामुळे ३९० किलोमीटर आणि सहा तासाच्या प्रवासाच्या वेळेचे बचत होणार आहे. वन्यजीव संरक्षण उपायोजनामुळे प्राण्यांच्या सुरक्षित प्रवासाची खात्री होईल. अक्कलकोट आणि गाणगापूर या तीर्थक्षेत्रापर्यंत पोहोचणे सुलभ होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४६५ ह एक भाग सोलापूरसाठी अतिरिक्त रिंग रोड म्हणून काम करेल. वाहतूक कोंडी प्रवासाचा वेळ आणि इंधनाचा वापर कमी होईल. सोलापूर जिल्ह्यात कृषी पर्यटन उद्योग आणि रोजगार निर्मितीला यामुळे चालना मिळणार आहे. अहिल्यानगर-सोलापूर चौपदरीकरण, सोलापूरचे २ उड्डाणपूल, अक्कलकोट-कर्नाटक सीमा महामार्ग यांसारख्या विविध प्रकल्पांना यामुळे गती मिळणार असून, यामुळे सोलापूरचा कायापालट होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## महत्त्वाचे

### 'व्हॅल्यू बाईंग'मुळे शेअर बाजारांत तेजी

**मुंबई :** शेअर बाजारात गुरुवारी मोठी तेजी पाहायला मिळाली. व्हॅल्यू बाईंग, अस्थिरतेत झालेली घट आणि अमेरिका-चीन दरम्यान सुरू असलेल्या सकारात्मक चर्चेमुळे जागतिक बाजारात निर्माण झालेले उत्साहाचे वातावरण यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांनी मोठी झेप घेतली. सेन्सेक्स ७८९.७४ अंकांनी म्हणजेच १.०६ टक्क्यांनी वधारून ७५,३९८.७२ वर बंद झाला. बाजाराची सुरुवात तेजीसह झाली होती, मात्र दुपारच्या सत्रात निर्देशांक काही काळ घसरला होता. त्यानंतर दूरसंचार आणि बँकिंग क्षेत्रातील शेअर्समध्ये गुंतवणूकदारांनी खरेदीचा ओघ वाढवल्याने बाजाराने पुन्हा उभारी घेतली. एका टप्प्यावर सेन्सेक्सने १,००० हून अधिक अंकांची उसळी घेत ७५,६८१.८८ ची उच्च पातळी गाठली होती. बुधवारी झालेल्या वाढीनंतर सलग दुसऱ्या दिवशी बाजारात ही तेजी कायम राहिली. निफ्टी २७७ अंकांनी म्हणजेच १.१८ टक्क्यांनी वधारला आणि २३,६८९.६० वर स्थिरावला.

### लाल किल्ला स्फोट प्रकरणात 'एनआयए'चे आरोपपत्र

**नवी दिल्ली :** लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणार राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने १० आरोपींच्या विरोधात येथील विशेष न्यायालयात ७५०० पानांचे आरोपपत्र दाखल केले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली. या बॉम्बस्फोटात ११ जणांचा बळी गेला होता. मागील वर्षी १० नोव्हेंबर रोजी वाहनात घडवून आणलेल्या या उच्च तीव्रतेच्या स्फोटामुळे राजधानी दिल्ली हादरली होती. या स्फोटात काही जण जखमी झाले आणि संपत्तीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. येथील पतियाळा हाऊस येथील विशेष न्यायालयात दाखल केलेल्या आरोपपत्रानुसार, मुख्य सूत्रधार आणि आत्मघातील स्फोट घडवणारा डॉ. उमर उन नबी याच्यासह सर्व १० आरोपींचा संबंध अन्सार गझवत-उल-हिंद (एजीयूएच) या संघटनेशी होता.

# होर्मुझमध्ये भारताचे जहाज बुडाले

## १४ खलाशांना वाचविले; ब्रिटनचे जहाज इराणने पळविले




◆ **दुबई, १४ मे**

ओमानच्या किनाऱ्यावरून होर्मुझ सामुद्रधुनीकडे जाणाऱ्या भारतीय मालवाहू जहाजावर ड्रोनचा मारा करण्यात आला. यात गुजरात येथील हाजी अली नावाने जहाज समुद्रात बुडाले. ओमानच्या बचाव पथकाने जहाजावरील १४ खलाशांना सुखरूप बाहेर काढले. देवभूमी द्वारका जिल्ह्यातील सलाया बंदरात नोंदणीकृत असलेले हे जहाज सोमालियाहून शारजाकडे जनावरे घेऊन जात होते.

भारतीय जहाजावर झालेल्या हल्ल्याच्या काही तासातच इराणी नौदलाने ओमानच्या बंदराजवळून ब्रिटनचे एक मालवाहू जहाज पळविले. युनायटेड किंगडम मेरिटाइम ट्रेडचे हे जहाज संयुक्त अरब अमिरातीकडे (यूएई) जाण्यासाठी निघाले होते. फुजैराह बंदरपासून काही किमी अंतरावरून सशस्त्र हल्लेखारांनी जहाज ताब्यात घेतले. आता ते इराणच्या सागरी हद्दीत असल्याची माहिती आहे. जहाजाच्या नावाबाबत कोणतीही माहिती जाहीर करण्यात आलेली नाही.

भारतीय जहाजावरील हल्ल्याचा निषेध करताना परराष्ट्र मंत्रालयाने निवेदनात म्हटले की, बुधवारी पहाटे हाजी अली नावाचे जहाज ओमानच्या उत्तर किनाऱ्याजवळील लिमा भागातून जात असताना त्यावर ड्रोन हल्ला झाला. हल्ल्यानंतर जहाजाला आग लागली आणि ते समुद्रात बुडाले. जहाजात गायी आणि म्हशी होत्या. चालक दलाने तत्काळ मदतीसाठी संदेश पाठवला. गस्तीवर असलेले ओमानचे बचाव पथक मदतीसाठी आले आणि त्यांनी सर्व १४ खलाशांना दिबा बंदरात सुखरूप आणले. हा हल्ला कोणी केला हे सध्या अस्पष्ट आहे. (वृत्तसंस्था)

### जलमार्गातील हल्ले अस्वीकारार्ह

**भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, होर्मुझ जलमार्गात सातत्याने होणारे हल्ले चिंताजनक आणि अस्वीकारार्ह आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने समुद्री व्यापार मार्गांच्या सुरक्षेसाठी एकत्र येणे गरजेचे आहे. या प्रकारामुळे जागतिक इंधन आणि तेल पुरवठ्याला मोठा फटका बसला आहे. व्यापारी जहाजावर हल्ला करुन सदस्यांचा जीव धोक्यात घालण्याच्या घटनेचा भारत निषेध करतो. ओमान सरकारने केलेल्या मदतीबद्दल भारत आभारी आहे.**

# साखर निर्यातीवर ३० सप्टेंबरपर्यंत बंदी



## किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली, १४ मे**

देशांतर्गत बाजारपेठेत उपलब्धता वाढवून किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने तत्काळ प्रभावाने साखर निर्यातीवर ३० सप्टेंबरपर्यंत बंदी लादली आहे. पूर्वी ही निर्यात प्रतिबंधित श्रेणीमध्ये यायची. त्याअंतर्गत विदेशी पाठवल्या जाणाऱ्या मालासाठी परवान्याची गरज असायची. साखरेचे (कच्ची साखर, पांढरी साखर आणि शुद्ध साखर) निर्यात धोरण तत्काळ प्रभावाने ३० सप्टेंबरपर्यंत किंवा पुढील आदेशापर्यंत अथवा यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत 'प्रतिबंधित'वरून 'निषिद्ध' असे सुधारित करण्यात आले आहे, असे विदेशी व्यापार महासंचालनालयाने (डीजीएफटी) १३ मे रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे. मात्र, हा आदेश युरोपियन युनियन आणि अमेरिकेला अनुक्रमे सीएक्सएल आणि टॅरिफ रेट कोटा व्यवस्थेच्या अंतर्गत निर्यात केल्या जाणाऱ्या साखरेला लागू नाही, असे स्पष्ट करण्यात आले. या व्यवस्थेळे निर्यातदारांना या गंतव्यस्थानी साखरेचा विशिष्ट साठा अत्यंत कमी किंवा शून्य सीमाशुल्कावर पाठवणे शक्य होते. डीजीएफटीचा हा आदेश 'ॲडव्हान्स ऑथरायझेशन' योजनेअंतर्गतच्या शिपमेंट्स सरकार ते सरकार निर्यातीला प्रत्यक्ष निर्यातीच्या प्रक्रियेत आधीच असलेल्या मालाच्या खेपांना लागू होणार नाही. २०२५- २६ या हंगामासाठी (ऑक्टोबर ते सप्टेंबर) अन्न मंत्रालयाने सुरुवातीला १५ लाख टन साखरेच्या निर्यातीला परवानगी दिली. त्यानंतर पाच लाख टनांचा अतिरिक्त कोटा खुला केला.

### ७.३२ टक्क्यांनी उत्पादन वाढले

महाराष्ट्र आणि कर्नाटकातील वाढीव उत्पादनामुळे २०२५- २६ च्या हंगामात एप्रिलपर्यंत भारताचे साखर उत्पादन ७.३२ टक्क्यांनी वाढून २७.५२ दशलक्ष टन झाले, अशी माहिती उद्योग संस्था 'इस्मा'ने दिली. इथेनॉलकडे वळवण्यात येणाऱ्या साठ्याची वजाबाकी केल्यानंतरचे एकूण उत्पादन २९.३ दशलक्ष टन राहील, असा अंदाज 'इस्मा'ने वर्तवला आहे. हे प्रमाण २०२४-२५ मध्ये नोंदल्या गेलेल्या २६.१२ दशलक्ष टनांपेक्षा जास्त आहे.

# आरक्षण सवलत घेणाऱ्यांना खुल्या प्रवर्गात प्रवेश नाही

## सरकारकडून आरक्षणाचे नवीन धोरण जाहीर

◆ **मुंबई, १४ मे**

ज्या उमेदवारांनी आरक्षणाची सवलत घेतली आहे, त्यांना आता खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा सांगता येणार नाही. केंद्र सरकार आणि गुजरात राज्याच्या धर्तीवर राज्य सरकारने नवे आरक्षण धोरण निश्चित करीत हा निर्णय घेतला आहे.यामुळे आगामी राज्य सरकारी नोकरभरतीच्या प्रक्रियेत मोठे बदल शक्य आहे.

आरक्षणासंदर्भातील नव्या धोरणानुसार ज्या उमेदवारांनी आरक्षणाची कोणतीही सवलत घेतली आहे, त्यांना आता खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा सांगता येणार नाही. राज्य शासनाने आरक्षणाचे धोरण अधिक स्पष्ट आणि पारदर्शक करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. ज्या उमेदवारांनी अर्ज करताना वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव किंवा परीक्षेस बसण्याच्या संधींमध्ये राखीव प्रवर्गातून सवलत मिळवली आहे, त्यांची नियुक्ती आता केवळ आणि केवळ त्यांच्याच राखीव प्रवर्गात केली जाईल. त्यांना गुणवत्तेच्या जोरावर खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही. (वृत्तसंस्था)

### कायदेशीर गुंतागुंत टळणार

**आरक्षणाबाबतच्या स्पष्ट धोरणाअभावी यापूर्वी नोकरभरती प्रक्रिया अनेकदा न्यायालयीन कचाट्यात सापडत असत. सर्वोच्च न्यायालयात वारंवार निर्माण होणारी कायदेशीर गुंतागुंत कायमची टाळण्यासाठी सरकारने हा प्रशासकीय निर्णय घेतला आहे.**

# नीट पेपरफुटी प्रकरणी सेवानिवृत्त प्राध्यापक ताब्यात

## सीबीआय पथक लातुरात दाखल

**तभा वृत्तसेवा | श्रीधर स्वामी**
**लातूर, दि. १४ मे-**

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट परीक्षेचा रसायनशास्त्राचा पेपर सेट करणाऱ्या कुलकर्णी नामक एका सेवानिवृत्त प्राध्यापकाला सीबीआयने ताब्यात घेतल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहे. या प्रकरणाचा छडा लावण्याकामी सीबीआय पथक लातुरात दाखल झाले असून संबंधित प्राध्यापकाने कोणच्या सांगण्यावरून अथवा इशाऱ्यावरुन हे कृत्य केले की ते केवळ फक्त एक मोहरा आहेत? हेही प्रकाशात येणार आहे. दरम्यान, लातूरच्या प्रा.शिवराज मोटेगावकर यांच्या नामांकित आरसीसी क्लासेस्चा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

भारतातील सर्व संस्थांमधील विविध पदवीपूर्व वैद्यकीय, दंत, आयुष, पशुवैद्यकीय आणि नर्सिंग अभ्यासक्रमांसाठी अनिवार्य असलेली ही एकमेव प्रवेश परीक्षा आहे. या परीक्षेत चांगल्या गुणांनी यशस्वी होणारे विद्यार्थी शासकीय, चांगल्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठी पात्र ठरतात. परंतु 'नीट'च्या पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अंध:कारमय झाले आहे. पेपरफुटीच्या गवगव्यामुळे ही परीक्षाच रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




'नीट'ची पात्रता परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी अहोरात्र मेहनत घेताना दिसतात. त्यातच या परीक्षेलाही मॅनेज करण्यासाठी काही मंडळी वरिष्ठ पातळीवरुन तापून असल्याचे बोलले जात असे. काही ठराविक खासगी क्लासेस् चालवणारेही या प्रक्रियेत असल्याच्या चर्चांना उधाण आल्याचे ऐकावयास मिळत होते. मात्र, या क्षेत्रात कार्यरत असणारी मंडळी अतिशय चाणाक्ष असल्याने आतापर्यंत कोणताच सबळ पुरावा न मिळाल्यानेही कदाचित तपास यंत्रणांना फारसे काही करता आले नसावे.

लातुरातही नीट परीक्षेच्या पेपरफुटी बद्दल एका पालकांकडून पोलिसात तक्रार दाखल झाली. त्यामध्ये तक्रारकर्त्या पालकाने संबंधित खासगी शिकवणी वर्गाच्या नावाचा उल्लेख केलेला असतानाही लातूरच्या पोलीस यंत्रणेने आपल्या प्रेसनोटमध्ये त्याचा ओझरताही उल्लेख करणे टाळल्याचे कटाक्षाने दिसून आले. प्रा.शिवराज मोटेगावकर यांची आरसीसी नावाचे क्लासेस नामांकित आहेत. त्यांचाच परीक्षेनंतर विद्यार्थिनींना नीटचा पेपर कसा गेला? हे विचारतानाचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाले आहे.

### प्रश्नपत्रिकेची पीडीएफ प्रत दिसते

या व्हिडिओमध्ये विद्यार्थिनी प्रा. मोटेगावकर यांना स्पष्टपणे तुम्ही सांगितलेले प्रश्न कसे जसेच्या तसे आल्याचे सांगताना दिसतात. तसेच त्या प्रश्नपत्रिकेची पीडीएफ प्रतही दिसते. याप्रकरणी वास्तव काय आहे? ते सीबीआय आणि पोलिसांच्या कसून तपासातून समोर येणार आहे.

# अखेर सोलापुरला मिळाले पूर्णवेळ जिल्हा क्रीडाधिकारी

## प्रकाश मोहारे यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ मे-**

सोलापूर जिल्ह्यासाठी पूर्णवेळ जिल्हा क्रीडाधिकारी नसल्याने क्रीडाविषयक अनेकांनेक कामे प्रलंबित राहत होते. यावर दैनिक तरुण भारतने बातमीद्वारे प्रकाशझोत टाकला होता. त्यास अनुसरुन अखेर सोलापूरला पूर्णवेळ जिल्हा क्रीडाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.



तरुण भारत Impact

मावळते जिल्हा क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्याकडे सोलापूर आणि धाराशिव असे दोन जिल्ह्याचा पदभार होता. त्यामुळे ते काही दिवस सोलापुरात तर काही दिवस धाराशिव येथील कार्यालयीन कामकाज पाहत होते.

खेड (जि.पुणे) येथील तालुका क्रीडाधिकारी प्रकाश तुकाराम मोहारे यांची पदोन्नतीने सोलापूर जिल्ह्याचे क्रीडाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. याबाबत गुरुवार, दि.१४ मे २०२६ रोजी शासन आदेश पारित करण्यात आला. प्रकाश मोहारे हे आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू आहेत. त्यांनी याअगोदर अहिल्यानगरचे जिल्हा क्रीडाधिकारी पदाचा कार्यभार सांभाळला होता. ते राष्ट्रीय व एशियन पॉवरलिफ्टींग स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू आहेत. त्यांना २००२-०३ मध्ये महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज जयंती साजरी

**अकलुज, दि. १४ मे -**

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज चौक बागेचीवाडी ९चारी येथे धर्मवीर छत्रपती श्री संभाजी यांची जयंती साजरी करून महाराजांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी भाजप नेते अमरसिंह देशमुख सचिनजी शिंदे रणजितदादा गायकवाड माळशिरस तालुका मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष कृष्णा लावंड शिवाजीराव घोडके सुधीर पवार गणेश इंगळे अक्षय चौगुले सागर मोहिते प्रदीप मुळीक बागेची वाडीचे उपसरपंच राहुल वाघ सदस्य रियाज शेख बाळासाहेब भोसले संजय कांबळे दादासाहेब सूर्यवंशी अमरभैया जाधव दीपक कणसे बागेची वाडी गावचे बाळू चव्हाण यांच्या सह अनेक शिवशंभूप्रेमी उपस्थित होते.



### महापालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन

**सोलापूर, दि.१४ मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जुना पुना नाका येथील श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास तसेच कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयातील श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक बिजू प्रधाने, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेविका श्रीदेवी फुलारी, नगरसेविका संगीता जाधव, श्रद्धा पवार, नगरसेविका कल्पना कदम, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, महेश देवकर, किरण पवार, शाहू सलगर, कामगार कल्याण अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, आकाश जाधव आदी उपस्थित होते.

### सोलापूर जिल्ह्यात अजून १ लाख...

**पान १ वरून...**


ना.नितीन गडकरी याप्रसंगी बोलताना पुढे म्हणाले, २०१४ पर्यंत जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी ५६५ किमी होती, ती आता १,७५० किमीपर्यंत वाढली आहे. ५२ हजार कोटी रुपयांच्या कामांचे भूमिपूजन झाले असून, त्यातील बहुतेक कामे पूर्ण झाली आहेत. गया-बुद्ध सर्किटसाठी २२,००० कोटींचा प्रकल्प पूर्ण झाले आहे. १२,००० कोटींचा पालखी मार्ग ८० टक्के पूर्ण झाला असून मार्गावरील ४६ तलाव बांधले गेले. सोलर पंप व ड्रिप सिंचनामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होऊ शकते. पंढरपूर रिंग रोड, कोल्हापूर रिंग रोड, अक्कलकोट-दुधनी रस्ता यांसारख्या कामांना मंजुरी देण्यात आली. एकूण २७८४ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये हसापूर ते बद्दाड रस्त्यासाठी १५५२ कोटीचा निधी, वागदरी-अक्कलकोट-तोळणूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ बी चे पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरण, या रस्त्याची लांबी ४७.६६ कि.मी. असून प्रकल्प खर्च ३५३ कोटी रुपये आहे. मोहोळ-बसवनगर-वळसंग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४६५ चे पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरण रस्त्याची लांबी ८२.०० कि.मी. असून प्रकल्प खर्च ७५६ कोटी रुपये आहे. दुधनी येथे रेल्वे उड्डाण पूल बांधकाम तसेच रा.म.क्र. १५० ई च्या उर्वरित ४.१२२ कि.मी. रस्त्याचे उन्नतीकरण व दर्जोन्नतीकरण करण्यात येणार असून प्रकल्प खर्च ९७ कोटी रुपये आहे. रा.म.क्र. १५० ई अंतर्गत बोरी उमरगे येथे बोरी नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यात येणार असून लांबी ०.७५ कि.मी. असून प्रकल्प खर्च २६ कोटी रुपये आहे. या सर्व प्रकल्पांची एकूण लांबी १७१ कि.मी. असून एकूण प्रकल्प किंमत २७८४ कोटी रुपये आहे. या सर्व विकासकामांमुळे सोलापूर जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होऊन नागरिकांना सुरक्षित व जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. महामार्ग प्राधिकरणचे सचिव एस.जी. शेलार यांनी प्रास्ताविक केले. मुंबईतील महामार्ग प्राधिकरणचे आर्थिक सल्लागार संजय जयस्वाल यांनी आभार मानले.

#### आम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त मिळाले : आ. कल्याणशेट्टी



गेल्या ७५ वर्षांत अक्कलकोट आणि पंचक्रोशीमध्ये एकही हायवे नव्हता. मात्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यामुळे या मतदारसंघात ६ राष्ट्रीय महामार्ग झाले. यामुळे श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांची गर्दी वाढली, स्थानिकांना मोठा रोजगार मिळाला. शेतकऱ्यांना आपला माल व्यवस्थित बाजारपेठेत घेवून जाता येवू लागले. एकंदरीत, ना. गडकरींच्या या संकल्पनेतून झालेल्या महामार्गांमुळे अक्कलकोट नगरीचे अर्थकारण बदलत गेले. आम्ही मागितल्यापेक्षाही त्यांनी जास्तच दिले आहे. आता गाणगापूर जाणाऱ्या भाविकांसाठी दुधनीपर्यंतचा रस्ता चौपदरीकरण करून द्यावा, अशी आमची माफक अपेक्षा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केली.

#### अशा नेत्यांमुळे नवी उर्जा, हिंमत मिळते: खा.प्रणिती शिंदे



राजकीय मतभेद न ठेवता विकासाचे राजकारण करणारे नेते म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची ओळख आहे. आम्ही कोणतेही काम घेवून गेलो तरी आम्हाला विरोधी पक्षाचे आहे असे म्हणून न पाहता आमचे काम गतीने आणि वेळेत पूर्ण करण्याची खासियत ना.गडकरी यांची आहे. अशा नेत्यामुळेच आम्हालाही नवीन उर्जा आणि हिंमत मिळत असल्याचे विचार खासदार प्रणिती शिंदे यांनी मांडले.

# अधिकमासनिमित्त पंढरीत संत नामदेव गाथा पारायण सोहळा

**पंढरीत धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल**

**हेलिकॉप्टरने येणार संतांच्या पादुका**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ मे-**

राज्याच्या विविध भागातील वारकऱ्यांनी एकत्र येत तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे अधिकमासानिमित्त संतनादेव महाराज गाथा पारायण सप्ताहासह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.





चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर परिसरात दि.१७ ते २४ मे या काळात या सप्ताहाचे आयोजन केले आहे. सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असून शनिवार (दि.१६ मे) रोजी दुपारी ३ ते ५ दरम्यान संत तुकाराम महाराज यांच्यासह विविध संतांच्या पादुका हेलिकॉप्टरने दर्शनासाठी खास येथे आणल्या जाणार आहेत.

सप्ताहामध्ये रोज पहाटे चार ते सहा काकडा भजन, सकाळी सहा ते अकरा नामदेव गाथा पारायण, अकराते साडेबारा कीर्तन, दुपारी एक ते तीन भोजन, दुपारी तीन तेसाडेतीन हरिपाठ, साडेतीन ते साडेपाच संत नामदेव महाराज जीवन चरित्र कथा, सायंकाळी सहाते आठ कीर्तन व रात्री आठ ते दहा हरिजागर होणार आहे. रोज सकाळी अकरा ते साडेबारा व सायंकाळी सहा ते आठ प्रवचन होणार आहे. शनिवारी



(१६ मे) राणा महाराज वासकर, रविवारी (१७ मे) सुधाकर महाराज इंगळे व चैतन्य महाराज देगलूरकर, सोमवारी (१८ मे) प्रभुराज महाराज वासकर, कृष्णा महाराज चवरे, मंगळवारी (१९ मे) भागवत महाराज शिरवळकर, बाळासाहेब महाराज देहूकर, बुधवारी (२० मे) श्रीराम महाराज झिंजुर्के, बंडातात्या महाराज कराडकर, गुरुवारी (२१ मे) माधव महाराज नामदास, शुक्रवारी (२२ मे) नामदेव महाराज लबडे, शनिवारी (दि.२३ ) ज्ञानेश्वरमाउली महाराज कदम यांचे कीर्तन व रविवार २४ मे रोजी काल्याच्या किर्तनाने सांगता होणार आहे.

#### या निमित्त सप्ताहाचे आयोजन

येणारा पुरुषोत्तम मास अर्थात अधिकमासनिमित्त तसेच संत ज्ञानेश्वर महाराज यांचा ७५० वा जन्मोत्सव, संत नामदेवमहाराज, संत जनाबाई आदी १४ संतांचा ७७५ वा समाधी सोहळा, संत तुकाराम महाराज यांच्या सदेह वैकुंठगमन सोहळ्यास ३७५ वर्ष झाल्यानिमित्त, संत सावता महाराज यांचा ७७५ वा जन्मोत्सव, संत जनार्दनपंत देशपांडे यांचा ४५० वा समाधी सोहळा तसेच नारायण महाराज देहूकर यांच्या ३७५ व्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त हा अखंड हरिनाम सप्ताह व संगीत संत नामदेव गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे.

#### सोहळ्याची वैशिष्टे

सोहळ्यामध्ये ३७५ धर्मध्वजधारी, ३७५ कलशधारी, ३७५ तुळशीधारी, ३७५ कीर्तनकार, ३७५ टाळकरी, मृदुंगसेवक, ब्रह्मविणाधारी, चोपदार तसेचसंत तुकाराम नावाच्या ३७५ व्यक्ती, ७५० संत ज्ञानेश्वर नावाच्या व्यक्ती, ६७५ संत नामदेव नावाच्या व्यक्ती, ६७५ संत जनाबाई नावाच्या महिला सहभागी होणार आहेत. यासह रोज अकरा हजार गाथावाचक, एक हजार टाळकरी २४ तास अखंड भजनप्रहरा राहणार आहे.

# पालकमंत्री गोरे यांच्या विरोधात खा. प्रणिती शिंदे यांची कायदेशीर नोटीस

**बदनामीकारक भाषा वापरुन स्त्रीत्वाचा अपमान केला**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे -**

सोलापूर : खासदार प्रणिती शिंदे यांचे चारित्र्यहनन आणि स्त्रीत्वाचा अपमान केल्याप्रकरणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना खा. शिंदे यांचे वकील ॲड. असीम सरोदे, ॲड. श्रीया आवले, ॲड. आर्या राजेभोसले यांच्यातर्फे नोटीस पाठवली आहे.



सोलापूरातील प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना खा. प्रणिती शिंदे यांना लक्ष्य करून गोरे यांनी केलेल्या विधानाचा सूर खा.प्रणिती शिंदे सोलापूरमधील विकासापेक्षा फक्त दिल्लीचा रस्ता आणि राहुल गांधी यांच्या घराकडेच लक्ष केंद्रित करतात असा होता. मोहोळ-वळसंग रस्त्यावरून सुरू असलेल्या श्रेयवादाच्या लढाईदरम्यान गोरे यांनी हे द्विअर्थी विधान केले. विधानामुळे खा.प्रणिती शिंदे यांच्या सामाजिक प्रतिष्ठेला हानी पोहोचली आहे. त्यांना फक्त राहुल गांधी यांच्या घराचा रस्ता माहित आहे असे म्हणताना जयकुमार गोरे यांचा स्पष्ट हेतू लैंगिक दृष्टिकोनातून टिप्पणीचा आणि एका महिलेचे चारित्र्यहनन करण्याचा होता. पत्रकाराच्या प्रश्नाशी त्यांचे विधान पुर्णपणे अप्रासंगिक आणि अनावश्यक होते असे ॲड. असीम सरोदे यांनी म्हटले आहे.

जयकुमार गोरे यांनी अनेकवेळा मर्यादा ओलांडून खा. प्रणिती शिंदे यांना वैयक्तिक दूषणे देण्याच्या पातळीवर लक्ष्य केले आहे. त्यांच्या अनेक अपमानास्पद विधानांकडे खा.शिंदेंनी दुर्लक्ष केले. परंतु, इतरांबद्दल बोलण्याची जयकुमार गोरे यांची असंस्कृत पद्धत आणि महिलांबद्दलचा दूषित दृष्टिकोन धक्कादायक रीतीने वाढला आहे. म्हणूनच,खा. शिंदे यांनी गोरे यांच्या या बेजबाबदार सार्वजनिक वर्तनाबाबत कायदेशीर पाऊल उचलण्याचा निर्णय घेतल्याचे म्हटले आहे.

#### सात दिवसांत बिनशर्त माफी मागावी

नोटीस मिळाल्यापासून सात दिवसात गोरे यांनी खा. शिंदे यांची बिनशर्त सार्वजनिक माफी मागावी. सामाजिक माध्यम तसेच मुद्रित माध्यमांमध्ये सार्वजनिक माफी प्रकाशित करावी, खा.प्रणिती शिंदे यांच्याविरुद्ध आणि सर्वसाधारणपणे महिलांविरुद्ध यापुढे कोणतीही बदनामीकारक विधाने करणे त्वरित थांबवावे, अन्यथा न्यायालयात जाण्याशिवाय पर्याय उरणार नाही असे नोटीशीत म्हटल्याचे ॲड. श्रीया आवले यांनी म्हटले आहे.



## ‘त्या’ चिमुकलीला न्याय मिळण्यासाठी कुंकुमार्चना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ मे -**

सोलापूर - शुक्रवार पेठेतील श्री रामलिंग चौडेश्वरी यात्रोत्सवास आजपासून सुरुवात झाली. यावेळी नसरापूर प्रकरणातील पीडित चिमुकलीला न्याय मिळावा यासाठी कुंकुमार्चनातून घालण्यात आले.

आज सकाळी श्रीरामलिंग चौडेश्वरी मंदिरासमोरील सभा मंडपाचे लोकार्पण झाले. सायंकाळी ५ वाजता श्री ललिता सहस्त्रनाम कुमकुम अर्चनाचे आयोजन केले होते. कार्यक्रमात हजारो महिलांनी नसरापूर प्रकरणातील चिमुकलीस न्याय द्यावा असे साकडे घातले. ‘‘मुली वाचवा स्त्रीचा सन्मान करा अत्याचार थांबवा’’ असे प्रबोधनात्मक संदेश लिहिलेले टी-शर्ट स्वयंसेवकांनी परिधान केले होते.

श्री रामलिंग चौडेश्वरी मंदिराचे ट्रस्टी अध्यक्ष गुरुनाथ निंबाळे यांनी नसरापूर अत्याचार प्रकरणांतील आरोपीवर सरकारने तात्काळ कारवाई करावी यासाठी देवीसमोर हजारो महिलांनी साकडे घातल्याचे सांगितले. श्री रामलिंग चौडेश्वरी यात्रा उत्सव काळात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले असून या कार्यक्रमाचा सोलापुरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अमर म्हेत्रे यांनी केले आहे.

# संस्कृती सातपुते यांच्या जनता दरबाराला गर्दी



**दहिगाव येथे पहिलाच जनता दरबार**

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर. दि. १४ मे-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते यांनी दहिगाव जि.प. गटात बुधवार १३ मे रोजी जनता दरबार घेतला. पहिल्याच जनता दरबाराला ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी अनेक प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

सभापती संस्कृती सातपुते यांनी प्रशासकीय कामात पारदर्शकता आणणे आणि शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजना पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे नमूद केले. यावेळी वैयक्तिक लाभाच्या योजना, दलित वस्ती सुधार योजना आणि मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठीच्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. रस्ते, पाणी आणि वीज आदी सुविधांबाबत तक्रारी मांडल्या. सभापतींनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेऊन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीच्या सूचना दिल्या.

दहिगाव गटातील हा सभापतींचा पहिलाच मोठा सार्वजनिक कार्यक्रम असल्याने सकाळपासूनच विविध गावांमधून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला आणि ज्येष्ठांची संख्या लक्षणीय होती. लोकप्रतिनिधी स्वतः गावात येऊन प्रश्न सोडवत असल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी स्थानिक पदाधिकारी, शासकीय अधिकारी उपस्थित होते.

# कांदा चाळ बांधणे फायद्याचे : सतीश कचरे

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि.१४ मे-**

सध्या बाजारात कांदा दर प्रति किलो १० रुपया आत आहेत. कांदा उत्पादकांना मोठा फटका बसत असून यातून वाचण्यासाठी कांदा चाळ बांधणे हाच सर्वोत्तम पर्याय असल्याचे मंडळ कृषि अधिकारी अकलूज सतीश कचरे यांनी सांगितले.



कांदा उत्पादन, बाजारपेठेतील मागणी व पुरवठा यावर कांदा पिकाचे दर अवलंबून असतात. कांदा हवेशीर शास्त्रीय तांत्रीक पद्धतीने साठवन केली तरच तो टिकतो. सध्याच्या परिस्थितीत शेतकरी बांधवांकडे तांत्रिक आधूनिक शास्त्रीय कांदा साठवन सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नुकसानाला सामोरे जावे लागते आहे. यावर उपाय म्हणजे राष्ट्रीय कृषि विकास योजना मधून महाडीबीटीवर शेतकरी व शेतकरी समुह यांनी सामंजस्य करारासह कांदा चाळ उभारणीला अर्ज करावा. १० टनासाठी १ एकर १५ टनासाठी दीड ते दोन एकर व २५ टनासाठी १ हेक्टर कांदा लागवड व नोंदीचा ७/१२, ८ अ, आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स व कांदा चाळ क्षमताचे नुसार प्लॅन व सविस्तर अंदाजपत्रक अपलोड केलेस पूर्व संमतीनंतर ३ महिने कालावधीत विहीत आकारमानाची कांदाचाळ उभारणी केलेस प्रति टन ४ हजार रुपये अनुदान दिले जाते. अधिक माहितीसाठी नजीकचे कृषी विभाग कार्यालय व कर्मचाऱ्यांशी संपर्क करण्याचे अवाहन मंडळ कृषि अधिकारी अकलूज कार्यालयाने केले.

#### युद्धामुळे कांदा निर्यात बंद

अमेरिका-इराक युध्दाने कांदा निर्यात बंद असल्यामुळे बाजारपेठेत कांदाचे दर पडले आहेत. पिकाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेती व्यवसाय करणे जोखमीचे झाले आहे.

**- बाळासाहेब इंगळे, कांदा उत्पादक, विजयवाडी**

# जिल्हा परिषद आरोग्य विभागातील ९८ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

## तीन दिवसांत एकूण १४० कर्मचाऱ्यांना नवी पदस्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील सात संवर्गातील ९८ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश प्रशासनाने जारी केले आहेत. यामध्ये ८१ प्रशासकीय तर १७ विनंती बदल्यांचा समावेश आहे. सलग तिसऱ्या दिवशीही बदली प्रक्रिया सुरू ठेवत जिल्हा परिषद प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर पदस्थापना बदल केल्याने कर्मचारी वर्गात चर्चा होत आहे.

औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहायिका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, कुष्ठरोग तज्ञ आदी पदांवरील कर्मचाऱ्यांचा या बदल्यांमध्ये समावेश आहे.



ग्रामीण आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी बदल्या केल्याचे प्रशासनाने सांगितले. जिल्हा परिषदेत दोन दिवसांपासून विविध विभागांतील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या दिवशी २५, दुसऱ्या दिवशी १७ कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या होत्या. तिसऱ्या दिवशी आरोग्य विभागातील तब्बल ९८ कर्मचाऱ्यांचे आदेश निघाल्याने आतापर्यंत एकूण १४० कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. सर्वाधिक बदल्या आरोग्य विभागात झाल्या असून त्यापाठोपाठ सामान्य प्रशासन विभागाचा क्रमांक लागतो. अनेक कर्मचाऱ्यांना नव्या ठिकाणी पदस्थापना मिळाल्या असून काहींनी विनंती बदल्यांमधून पसंतीच्या ठिकाणी बदली मिळवली आहे.

शासन नियमांचे पालन करुन बदल्या केल्याचा दावा प्रशासनाकडून होत असला तरी कर्मचाऱ्यांमध्ये समाधान व नाराजीचे सूरही उमटत आहेत.

# मोबाईलच्या बिलातील ७७ हजार रुपयांचा अपहार

**कामगारावर गुन्हा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे -**

मोबाईल विक्री केलेल्या बिलातील ७७ हजार रुपये मालकाकडे जमा न करता अपहार केल्याप्रकरणी एका कामगाराविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.





दत्ता सतीश गोडबोले (रा. महादेववाडी किणी खोते, ता. औसा, जि. लातूर ) असे आरोपीचे नाव आहे. याबाबत सुयोग कालाणी ( रा.५१/१, महेश कॉलनी, सम्राट चौक, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीचे उत्तर कसबा येथे श्रीजीत टेलिकॉम नावाचे मोबाईल दुकान आहे. फिर्यादीच्या दुकानात आरोपी दत्ता गोडबोले हा कामास असताना दि. ५ सप्टेंबर २०२५ ते दि.७ ऑक्टोबर २०२५ दरम्यान लातूर येथील रितेश मोबाईल व एस.के. मोबाईल या दुकानदारांना फिर्यादीच्या दुकानातून मोबाईल हॅन्डसेट ऑर्डरप्रमाणे नेनून दिले. परंतु त्या बिलाच्या रकमेपैकी ७७ हजार ६७४ रुपये फिर्यादीकडे आणुन जमा न करता स्वतःसाठी वापरून फिर्यादीची फसवणुक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार बावणे हे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### दिल्लीत दोन दिवस 'वर्क फ्रॉम होम'

**नवी दिल्ली :** इंधनाची बचत करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सरकारी कार्यालयात आठवड्यातून दोन दिवस 'वर्क फ्रॉम होम' योजना लागू करण्याचा निर्णय घेतला. रेखा गुप्ता यांनी इंधन बचत करण्याच्या दृष्टीने काही महत्वपूर्ण निर्णयांचीही घोषणा केली. यात दिल्ली सरकारच्या कार्यालयात आठवड्यातून दोन दिवस 'वर्क फ्रॉम होम' राहणार आहे. खाजगी कंपन्यांनीही आठवड्यातून दोनदिवस 'वर्क फ्रॉम होम' योजना लागू करण्याचे आवाहनही त्यांनी केले. सोमवार हा मेट्रो दिवस पाळण्याचे आवाहन त्यांनी केले. दिल्ली सरकारच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सोमवारी मेट्रोचा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहनही त्यांनी केले. दिल्ली महानगर पालिकेची सर्व कार्यालये आता सकाळी ८.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरु राहतील तर दिल्ली सरकारच्या कार्यालयाचा वेळ सकाळी १०.३० ते सायंकाळी ७ असा करण्यात आला आहे. ■

# होर्मुझ खुली ठेवण्यावर चीन-अमेरिका सहमत

## व्यापारी अडथळ्यांवर ट्रम्प-जिनपिंग यांच्यात चर्चा ● इराणच्या अण्वस्त्र धोरणाला विरोध

◆ **बीजिंग, १४ मे**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चीनच्या दौऱ्यावर आहेत. ट्रम्प आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात गुरुवारी इराण युद्ध आणि होर्मुझ सामुद्रधुनीबाबत चर्चा झाली. यावेळी दोन्ही नेत्यांनी होर्मुझ जलमार्ग कोणत्याही अडथळ्याशिवाय पूर्णपणे खुला करण्यावर सहमती दर्शवली. तसेच, इराणकडे कधीही अण्वस्त्रे असू नयेत, याला चीनने देखील समर्थन दिले. याशिवाय दोन्ही देशांतील व्यापारी अडथळ्यावर बैठकीत चर्चा झाल्याची माहिती व्हाईट हाऊसकडून देण्यात आली.

ट्रम्प आणि जिनपिंग यांच्यात दोन्ही देशांतील आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या विविध मार्गांवर चर्चा केली. अमेरिकी व्यवसायांना चिनी बाजारपेठेत अधिक संधी उपलब्ध करून देणे, अमेरिकेतील उद्योगांमध्ये चिनी गुंतवणूक वाढवणे याबाबत देखील सविस्तर चर्चा झाल्याची माहिती व्हाईट हाऊसने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकातून दिली. ऊर्जा वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी होर्मुझ सामुद्रधुनी खुली राहणे आवश्यक आहे, यावर दोन्ही देशांचे एकमत झाले. तसेच, होर्मुझमध्ये लष्करी बळाचा वापर करणे आणि तिथे कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारणी करणे चुकीचे असल्याचे मत जिनपिंग यांनी व्यक्त केले. भविष्यात अमेरिकेकडून अधिक तेल खरेदी करण्याची इच्छाही चीनने केली.



**तैवानचा मुद्दा संवेदनशील**

जिनपिंग म्हणाले, तैवानचा मुद्दा हा चीन-अमेरिका संबंधांमधील सर्वात संवेदनशील आणि महत्त्वाचा पैलू आहे. त्यांनी जर हा मुद्दा सावधगिरीने आणि विवेकबुद्धीने हाताळला गेला, तर दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये स्थिरता टिकवून ठेवता येईल. परंतु जर हस्तक्षेप वाढला किंवा चुकीची पावले उचलली गेली, तर संपूर्ण द्विपक्षीय संबंध धोक्यात येऊ शकतात. ◂(वृत्तसंस्था)

### भागीदार बना, स्पर्धक नाहीः जिनपिंग

बीजिंगमधील ग्रेट हॉल ऑफ द पीपल येथे ट्रम्प यांनी चीनच्या राष्ट्राध्यक्षांची भेट घेतली. त्यानंतर संयुक्त संबोधनात जिनपिंग म्हणाले, जग वेगाने बदलत आहे आणि जागतिक स्थिरतेसाठी अमेरिका-चीन संबंध महत्त्वपूर्ण आहेत. दोन्ही देशांनी प्रतिस्पर्धी नव्हे, तर भागीदार बनले पाहिजे. व्यापार युद्धात कोणीही जिंकत नाही हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. ■

### द्विपक्षीय संबंध बळकट करण्याला प्राधान्य : ट्रम्प

अमेरिका-चीन संबंध जागतिक इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या संबंधांपैकी एक आहे. अमेरिकेच्या स्थापनेपासूनच दोन्ही देशांतील लोकांमध्ये आदर आणि सहकार्याची भावना अस्तित्वात आहे. प्राचीन चिनी विद्वानांचे पुतळे आजही अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या इमारतीची शोभा वाढवतात. आमच्यात अनेक मुद्यांवर चर्चा झाली. ■

# सतीशन् केरळचे नवे मुख्यमंत्री

### काँग्रेसने दिल्लीत केली घोषणा

◆ **नवी दिल्ली, १४ मे**

केरळचे नवे मुख्यमंत्री म्हणून काँग्रेस पक्षाने मावळत्या विधानसभेतील विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतीशन् यांची निवड केली. संयुक्त लोकशाही आघाडीचे (युडीएफ) नेते म्हणून सतीशन मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहे. २४ अकबर रोड या काँग्रेस मुख्यालयात आयोजित पत्रपरिषदेत सतीशन् यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. केरळसाठी प्रभारी असलेले अजय माकन, मुकुल वासनिक आणि दीपा दासमुन्शी यांनी ही घोषणा केली.



केरळच्या मुख्यमंत्रिपदासाठी सतीशन् यांच्याशिवाय के. सी. वेणुगोपाल आणि रमेश चेन्नीथला यांच्या नावांची चर्चा होती. पण वेणुगोपाल आणि चेन्नीथला यांना मागे टाकत सतीशन् यांनी बाजी मारली. केरळचा मुख्यमंत्री निवडण्यासाठी मागील आठवड्यात अजय माकन आणि मुकुल वासनिक तिरुवनंतपूरमला गेले होते, त्याठिकाणी त्यांनी काँग्रेसच्या आमदारांची बैठक घेतली, तसेच आमदारांशी स्वतंत्रपणे चर्चाही केली. मात्र या बैठकांमध्ये कोणत्याच नावांवर एकमत न झाल्यामुळे नेता निवडीचा वाद दिल्लीत आला होता.

नेता निवडीचा अधिकार केरळच्या आमदारांनी काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाकडे सोपवला होता. गेल्या दोनतीन दिवसांपासून काँग्रेसमध्ये नेता निवडण्यासाठी बैठकी सुरु होत्या. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यात झालेल्या अनेक बैठकानंतर व्ही.डी. सतीशन् यांच्या नावावर मतैक्य झाले. काँग्रेस सांसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांनाही यात हस्तक्षेप करावा लागला, असे समजते. विशेष म्हणजे संयुक्त लोकशाही आघाडीतील मित्रपक्षांच्या नेत्यांची पसंतीही सतीशन् यांच्या नावाला होती, त्यामुळे त्यांचे पारडे जड झाले. ◂(तभा वृत्तसेवा)

# दिल्लीत पुन्हा 'निर्भया'

## स्लीपर बसमध्ये महिलेवर सामूहिक अत्याचार ● चालक-वाहकाला अटक

◆ **नवी दिल्ली, १४ मे**

वायव्य दिल्लीच्या मंगोलपुरी भागात कामावरून परतणाऱ्या एका महिलेला खाजगी स्लीपर बसमध्ये ओढून नेऊन बसचा चालक आणि वाहकाने तिच्यावर सामूहिक अत्याचार केला, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली. या प्रकरणातील दोन्ही नराधमांना अटक करण्यात आली.

देश हादरवून सोडणाऱ्या २०१२ मधील 'निर्भया' सामूहिक बलात्कार-हत्याकांडाची आठवण करून देणारा हा घृणास्पद प्रकार ११ मे रोजी झाला.

मंगोलपुरी येथील कारखान्यातून ही महिला रात्री घरी परतत असताना तिच्यावर बलात्कार झाला, अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली. सरस्वती विहारमधील बी-ब्लॉक बस थांब्यावर पोहोचल्यावर तिला आरोपींपैकी एक जण बसच्या दरवाजाजवळ उभा असलेला दिसला आणि तिने त्याला वेळ विचारली. त्यानंतर त्याने महिलेला बसमध्ये ओढले, वाहन नांगलोईच्या दिशेने नेले आणि तिच्यावर बलात्कार केला.

पीडितेच्या बयाणानुसार, ती विवाहित असून, तिला तीन मुले आहेत. बसमधील चालक आणि वाहकाने अत्याचार केला. गुन्ह्यासाठी वापरलेली बस जप्त करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले. एका महिलेवर बलात्कार झाल्याची माहिती राणी बाग पोलिस ठाण्यात मिळाली. कोणताही वेळ न दवडता तिचे बयाण घेऊन एफआयआर दाखल करण्यात आला, असे पोलिस उपायुक्त विक्रमसिंह यांनी सांगितले. पीडितेने दिलेल्या बयाणाच्या आधारे पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील कलम ६४ (१) (बलात्कार), ७० (१) सामूहिक बलात्कार, ३ (५) (सामान्य उद्दे) अंतर्गत एफआयआर दाखल केला, असे विक्रमसिंह यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

### सीसीटीव्ही फुटेजची तपासणी

या प्रकरणाच्या तपासासाठी विविध पथके तयार करण्यात आली आणि दोन आरोपींना अटक केली, असे विक्रमसिंह यांनी सांगितले. आम्ही या प्रकरणाचा प्रत्येक संभाव्य दृष्टिकोनातून तपास करीत आहोत आणि पीडितेच्या जबाबाची खातरजमा करण्यासाठी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करीत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. ■



# विधानपरिषदेत १० नव्या सदस्यांचे आगमन

◆ **मुंबई, १४ मे**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित १० सदस्यांचा शपथविधी सोहळा आज विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विधानपरिषद सभापती राम शिंदे यांनी सर्व सदस्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली.

यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोड, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई तसेच आमदार रविंद्र चव्हाण आदि उपस्थित होते. शपथ घेतलेल्या सदस्यांमध्ये विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, शेतकरी नेते बच्चू कडू, विरोधी पक्षातील प्रमुख चेहरा अंबादास दानवे, डॉ. प्रज्ञा सातव, प्रमोद जठार, झीशान सिध्दीकी, माधवी नाईक, सुनिल कर्जतकर, विवेक कोल्हे आणि संजय भेंडे यांचा समावेश होता. शपथविधीनंतर सभापती प्रा. राम शिंदे यांनी सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि विधानपरिषदेच्या कामकाजात सक्रिय व लोकाभिमुख भूमिका बजावण्याच्या शुभेच्छा दिल्या. ◂(तभा वृत्तसेवा)

# फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट; अनेक कामगार ठार

## शरीराचे अवयव २५ फूट दूरपर्यंत उडाले



◆ **देवास, १४ मे**

मध्य प्रदेशातील देवास जिल्ह्यातील टोंक कलान परिसरात गुरुवारी सकाळी फटाक्यांच्या कारखान्यात प्रचंड स्फोट झाला. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की, त्यामुळे आजूबाजूचा परिसर हादरला. या स्फोटात अनेक कामगार ठार झाले असून सुमारे २३ कामगार जखमी झाले आहेत. प्रशासनाने सध्या चार जणांच्या मृत्यूंची पुष्टी केली असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी ११:३० च्या सुमारास कारखान्यात अचानक आग लागली. त्यानंतर प्रचंड स्फोट झाला. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की शरीराचे अवयव २० ते २५ फूट दूरपर्यंत उडाले. प्रत्यक्षदर्शींच्या मते, स्फोटाचा आवाज अनेक किलोमीटर दूरपर्यंत ऐकू आला. त्यावेळी कारखान्यात मोठ्या संख्येने महिलांसह सुमारे ४०० ते ५०० लोक काम करत होते, असे सांगण्यात येत आहे.

**दोन रसायने मिसळताना झाला स्फोट**

स्थानिकांच्या मते, कारखान्यात दोन रसायने मिसळून गन पावडर तयार केली जात होती. यावेळी रसायनांचे प्रमाण चुकल्यामुळे मोठा स्फोट झाला. स्फोटाच्या ठिकाणी सुमारे २५ ते ३० कामगार काम करीत होते. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीच्या काही मिनिटे आधीच हा अपघात झाला. ◂(वृत्तसंस्था)

# बांगलादेश निर्यात शुल्क अनुदान योजना बंद

## संत्रा उत्पादकांसाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय

◆ **मुंबई, १४ मे**

राज्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेत बांगलादेशला निर्यात होणाऱ्या संत्र्यांसाठी लागू असलेली ५० टक्के आयात शुल्क परतावा योजना बंद करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला आहे.

राज्य सरकारने काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील संत्रा निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी बांगलादेशमधील आयात शुल्काच्या ५० टक्के रकमेवर अनुदान देण्याची योजना सुरू केली होती. मात्र, या योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचे सरकारच्या निदर्शनास आले. विविध शेतकरी संघटना आणि उत्पादकांनी ही योजना तांत्रिकदृष्ट्या क्लिष्ट असल्याची तक्रार करत ती बंद करण्याची मागणी केली होती.

याशिवाय, या योजनेचा प्रत्यक्ष फायदा शेतकऱ्यांपर्यंत मर्यादित प्रमाणात पोहोचत असल्याचेही समोर आले. त्यामुळे सरकारने आता थेट शेतकऱ्यांना लाभ मिळेल अशा योजनांवर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर राज्य सरकार संत्रा निर्यातीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करणार आहे. यामध्ये कोल्ड स्टोरेज, ग्रेडिंग आणि पॅकिंग केंद्रांची उभारणी, निर्यात प्रक्रियेतील सुलभता आणि नवीन बाजारपेठांचा शोध यांचा समावेश असेल.योजना बंद झाल्यानंतर वाचणारा निधी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी अधिक परिणामकारक आणि थेट लाभ देणाऱ्या योजनांवर खर्च करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, या निर्णयामुळे दीर्घकालीन स्तरावर महाराष्ट्रातील संत्रा अधिक स्पर्धात्मक बनण्यास मदत होणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

**मंत्रिमंडळ निर्णय**

### आश्रमशाळांतील उच्च माध्यमिक शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू

विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील उच्च माध्यमिक शिक्षकांना १२ व २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी लागू करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी देण्यात आली. राज्यात विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, ऊसतोड व विद्यानिकेतन अशा एकूण ९७७ आश्रमशाळा स्वंयसेवी संस्थामार्फत अनुदान तत्त्वावर चालविल्या जातात. या आश्रमशाळांमधील उच्च माध्यमिक शिक्षकांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होत नसल्याने १२ व २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या आश्रमशाळांतील ७८८ उच्च माध्यमिक शिक्षकांना ही वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी श्रेणी लागू होणार आहे. हा लाभ पुर्वलक्षी प्रभावाने लागू राहणार नाही, तसेच यात कोणतीही थकबाकी दिली जाणार नाही, या अटीसह या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. ■

# राहुल गांधींचे २२ वर्षांत ५४ विदेश दौरे

## खर्चाचा स्रोत जाहीर करण्याची मागणी

◆ **नवी दिल्ली, १४ मे**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या सातत्याने होत असलेल्या विदेश यात्रांवर भाजपाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राहुल गांधींनी आपल्या परदेश दौऱ्याच्या खर्चाचा स्त्रोत जाहीर करावा, अशी मागणी भाजपाने केली.



भाजपा मुख्यालयात आयोजित पत्रपरिषदेत भाजपा प्रवक्ते संबित पात्रा यांनी विदेश यात्रांच्या मुद्यांवरुन राहुल गांधी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. गेल्या २२ वर्षात राहुल गांधी ५४ वेळा विदेशात गेले, त्यांच्या या विदेश दौऱ्यावर ६० कोटी रुपये खर्च झाले, असा आरोप पात्रा यांनी केला. विशेष म्हणजे यातील एकही यात्रा शासकीय नव्हती, तर सर्व खाजगी होत्या, असे ते म्हणाले. २०१३ १४ ते २०२३ ३४ या काळात राहुल गांधी यांचे उत्पन्न ११ कोटी रुपये होते, मग त्यांनी आपल्या विदेश दौऱ्यावर ६० कोटी रुपये खर्च केले, असा आरोप करतांना त्यांच्या विदेश दौऱ्यांचा खर्च कोणी उचलला, अशी पात्रा यांनी केली.

राहुल गांधी यांनी ब्रिटन, इटली, कतार, मस्कट, ओमन, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, व्हियतनाम, संयुक्त अरब अमिरात आणि अन्य काही देशाचा दौरा केला, त्यांचे हे दौरे जगजाहीर असेल तरी या दौऱ्यांचा खर्च कोणी केला, हे अद्याप जाहीर नाही, असे पात्रा म्हणाले. २०१५ मध्ये राहुल गांधी दक्षिण पूर्व आशियाच्या दौऱ्यावर गेले होते, त्यांचा हा दौरा अतिशय गोपनीय होता, याकडे लक्ष वेधत पात्रा म्हणाले की, त्यांच्या या दौऱ्यावर ४.५ कोटी रुपये झाले, पण त्या वर्षातील त्यांचे उत्पन्न ८६.५५ लाख रुपये होते. आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या पाच पटीपेक्षा जास्त खर्च त्यांनी केला. त्यामुळे हा पैसा कुठून आला, हा प्रश्न आहे. कोणत्याही परदेश दौऱ्यांचा खर्च एकतर सरकार करते, वा त्यासाठी परदेशी निधी मिळत असतो, परदेशी निधीसाठी सरकारची परवानगी घ्यावी लागते. खाजगी पैशाने दौरे केले असतील तर आयकर विवरण पत्र दाखल करावे लागते. ◂(तभा वृत्तसेवा)

# शासनाचा 'काटकसरीचा' मास्टर प्लॅन जारी!

## परदेश दौरे रद्द, सरकारी खर्चावर निर्बंध ● आठवड्यातून एक दिवस 'बस-मेट्रो' प्रवास अनिवार्य

◆ **मुंबई, १४ मे**

पश्चिम आशियामध्ये उद्भवलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर आणि इंधन पुरवठ्यावर होणारे संभाव्य परिणाम लक्षात घेता, केंद्र सरकारच्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्र शासनाने राज्यात कडक उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री आणि प्रधानमंत्र्यांच्या आवाहनानुसार, राज्य प्रशासनात मोठी काटकसर करण्याबाबत परिपत्रक जारी केले आहे.

शासकीय कामात पारदर्शकता आणि बचतीचा मंत्र देताना राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. शासकीय अधिकाऱ्यांचे सर्व प्रस्तावित परदेश दौरे तात्पुरते स्थगित करण्यात आले असून, नवीन नियोजनावर पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. पुढील सहा महिन्यांसाठी कोणत्याही नवीन सल्लागारांची नियुक्ती न करण्याचे आदेश सर्व विभागांना देण्यात आले आहेत. मंत्रालय ते जिल्हा स्तरावरील सर्व बैठका, प्रशिक्षणे आणि सेमिनार आता प्रत्यक्ष न घेता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून घेण्यावर भर दिला जाणार आहे.

वाढत्या इंधन दरांचा धोका ओळखून सरकारने वाहतूक आणि ऊर्जा वापरात मोठे बदल सुचवले आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस सरकारी वाहन सोडून मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. वाहनांच्या वापरात कपात करून 'कारपूलिंग' आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य दिले जाईल. सर्व सरकारी कार्यालयांतील वातानुकूलन यंत्रणेचे तापमान २४ ते २६ अंशांदरम्यान राखण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच अनावश्यक दिवे बंद ठेवून नैसर्गिक प्रकाशाचा वापर वाढवण्यास सांगितले आहे. मुंबईसह मोठ्या शहरांतील हॉटेल आणि रेस्टॉरंटना पीएनजी गॅस वापरण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार असून, प्रलंबित प्रस्तावांना तातडीने मंजुरी दिली जाईल. शासकीय कॅन्टीन, अंगणवाड्या आणि रुग्णालयांमध्ये आता पाम किंवा सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा व मोहरीच्या तेलाचा वापर वाढवला जाणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)




### आरोग्य आणि शेतीवर विशेष लक्ष

खाद्यतेलाचा वापर कमी करून आरोग्य जपण्याचा हा प्रयत्न आहे. रासायनिक खतांवरील खर्च कमी करण्यासाठी राज्यात 'नैसर्गिक व सेंद्रिय शेती' मोहीम राबवली जाईल. माती परीक्षणावर आधारित खतांचा वापर करण्याचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना दिले जाणार आहे. ■

### मिरवणुका आणि रॅलींवर निर्बंध

इंधन बचत आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस विभागातर्फे काढल्या जाणाऱ्या वाहनांच्या मिरवणुका किंवा बाईक रॅलींना आता परवानगी नाकारण्यात येणार आहे. तसेच शासकीय जाहिरातींवरील अनावश्यक खर्च कमी करण्याचेही स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत. ■

# बॉम्ब निकामी करण्याची पुणे पोलिसांना घाई?

### एटीएसची वाट न पाहिल्याने आश्चर्य

◆ **पुणे, १४ मे**

हडपसर येथील रुग्णालयात बुधवारी सायंकाळी सापडलेली वस्तू ही आयईडी असल्याचे तपासात समोर आले आहे. बॉम्बसदृश वस्तू असल्याची माहिती समोर आल्यानंतर बॉम्बशोधक आणि निकामी पथकाने बॉम्ब निकामी केला. मात्र, दहशतवादविरोधी पथक (एटीएस) पोहोचण्यापूर्वीच बॉम्ब निकामी केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पुणे पोलिसांना बॉम्ब निकामी करण्याची एवढी घाई का झाली होती, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

बुधवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास हडपसरमधील रुग्णालयात बॉम्बसदृश वस्तू आढळल्याची माहिती बॉम्बशोधक पथकाला मिळाली होती. त्यानंतर साधारण एका तासात, म्हणजे रात्री ८ वाजता हे पथक घटनास्थळी पोहोचले. रात्री ९ वाजता ती निकामी करण्यात आली.

**... तर जीवितहानीची शक्यता**

या बॉम्बमध्ये जिलेटिन, टायमर, डेटोनेटर, वायर, ॲल्युमिनियम कव्हर आणि सेन्सर आढळून आले आहेत. हे सर्व साहित्य आयईडी तयार करण्यासाठी वापरले जाते, असे तपासात स्पष्ट झाले आहे. ही घटना जर रुग्णालयाच्या शौचालयात घडली असती, तर जीवितहानी होण्याची शक्यता असल्याचा अंदाज वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या प्रकरणात आयडीचा वापर करण्यात आला आहे. या ठिकाणी आयईडीचा वापर केला जातो तेथील तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून केला जातो. त्यामुळे एनआयएचे पथक लवकरच पुण्यात दाखल होऊ शकते. ◂(तभा वृत्तसेवा)

### घटनास्थळावरील नमुने ताब्यात

आयईडी अत्यंत सराईतपणे तयार करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे यामागे प्रशिक्षित किंवा स्फोटकांबाबत माहिती असलेल्या व्यक्तींचा हात असण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. पुणे पोलिस आयुक्तालयातील विविध तपास पथके या प्रकरणाचा समांतर तपास करत असून, फॉरेन्सिक विभाग आणि बीडीडीएसने घटनास्थळावरील नमुने ताब्यात घेतले आहेत. हे नमुने पुढील परीक्षणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# 'सहकार्य' पर्वाचा प्रारंभ

पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक सत्तांतरानंतर झालेल्या नव्या मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत शुभेन्दू अधिकारी सरकारने घेतलेले निर्णय हे केवळ प्रशासकीय स्वरूपाचे नसून ते ममता बॅनर्जी सरकारच्या गेल्या १५ वर्षांच्या राजकीय भूमिकेवर थेट भाष्य करणारे ठरले आहेत. सीमा सुरक्षा, केंद्राच्या योजनांची अंमलबजावणी, सरकारी भरती, कायदेव्यवस्था आणि प्रशासनातील केंद्र-राज्य संबंध या सर्वच मुद्द्यांवर 'दिशाबदल' करण्याचा नवा प्रयत्न नव्या सरकारने ठामपणे सुरू केला असून अराजकाच्या सावटाखाली सतत वावरत असलेले हे राज्य आता सुशासनाच्या दिशेने वाटचाल करेल, असे संकेतही मिळू लागले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांनी परस्परांच्या विरोधात भूमिका घेतली तर अंतिमतः राज्यांचेच नुकसान अधिक होते, हे ममता सरकारच्या काळातील हट्टाग्रहामुळे दिसून आले होते. केंद्र सरकारच्या अनेक जनहिताच्या योजनांनादेखील पश्चिम बंगालमध्ये प्रवेशबंदी करून ममता बॅनर्जी यांनी जनतेस अनेक योजनांच्या लाभापासून वंचित ठेवल्याचा आरोप केला जातो. पश्चिम बंगालमध्ये ममता सरकारने केंद्राच्या काही महत्त्वाच्या योजनांना पूर्णतः नकार दिला किंवा त्यांची अंमलबजावणी दीर्घकाळ लांबवली, हा आरोप केवळ राजकीय प्रचारापुरता मर्यादित नाही. त्यामागे काही वस्तुनिष्ठ उदाहरणेही आहेत. विशेषतः केवळ श्रेयवादातून ममता सरकारने केंद्राच्या काही योजना नाकारून राज्याच्या योजना लागू करण्याची भूमिका घेतल्याने, काही योजनांसाठी केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीस राज्य मुकले, काही योजना श्रेयवादाच्या गर्तेत गुरफटत राहिल्या तर काही योजनांच्या अंमलबजावणीवरील नियंत्रणाची भूमिका घेत ममता बॅनर्जी सरकारने केंद्राशी सातत्याने संघर्षाचाच पवित्रा ठेवला, असेही आरोप केले जातात. आयुष्मान भारत किंवा प्रधानमंत्री जनआरोग्य योजना ही केंद्राची आरोग्य विमा योजना ममता बॅनर्जी यांनी २०१९ मध्ये नाकारली आणि राज्याची स्वतःची स्वास्थ्य साथी योजना सुरू केली. त्यामुळे देशभरातील गरीब नागरिकांसाठी लागू असलेल्या आरोग्य विम्याचा लाभ पश्चिम बंगालमधील गरीब नागरिकांना मिळाला नाही. केंद्र सरकारला योजनेच्या श्रेयाचा लाभ नाकारण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये राज्याची स्वतःची योजना राबविणाऱ्या ममता सरकारने प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेबाबतही केंद्र सरकारशी असहकार पुकारल्याने पश्चिम बंगालचा शेतकरी दीर्घकाळ या योजनेपासून वंचित राहिला. पीएम आवास योजनेबाबतही भ्रष्टाचार, अपात्र लाभार्थींची निवड, अनियमितता असे आरोप होत राहिले.

आता सत्तांतरानंतर समन्वयाचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. शुभेन्दु अधिकारी सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत संघर्षाचा अध्याय संपवून सहकार्याचा नवा अध्याय सुरू करण्याची समंजस भूमिका घेण्यात आली आहे. नव्या सरकारने सुशासनाची घडी बसविण्यास प्राधान्य दिले आहे, असे संकेत पहिल्याच बैठकीत मिळाले आहेत. ममता सरकारने केंद्रासोबत संघर्षाचा पवित्रा घेतल्याने तेथील जनता केंद्राच्या योजनांपासून मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहिलीच; पण भारतातील केंद्र-राज्य संघर्ष, राजकीय श्रेयवादाची लढाई आणि संघराज्य व्यवस्थेतील मतभेद यांचे एक अप्रिय चित्रदेखील समोर आले होते. ते पुसण्याचा प्रयत्न आता सुरू झाला असून पश्चिम बंगाल सरकार आणि केंद्र सरकार यांच्या सहकार्यातून दीर्घकाळ रेंगाळलेल्या काही संवेदनशील समस्या मार्गी लागणार आहेत, ही समाधानाची बाब म्हणावी लागेल. बांगलादेश सीमेलगत कुंपण उभारण्याबाबत केंद्र सरकारच्या आग्रहाकडे ममता सरकारने सतत कानाडोळा केला आणि यासंदर्भातील न्यायालयाचे आदेशही नजरेआड केले, असा गंभीर आक्षेप सातत्याने ममता बॅनर्जी यांच्या सरकारविरोधात घेतला जात होता. शुभेन्दू सरकारने हा प्रश्न निकाली काढून एका महत्त्वाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी घेतलेला पुढाकार भविष्यातील अनेक समस्यांची पाळेमुळे खणून काढणारा ठरणार आहे. बांगलादेश सीमेलगत कुंपण घालण्यासाठी पुढच्या दीड महिन्यात सीमा सुरक्षा दलास जमीन हस्तांतरित करण्याचा मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत घेतलेला हा महत्त्वाचा निर्णय केवळ सुरक्षाविषयक मुद्दा नाही, हे खरेच आहे. ममता सरकारने सातत्याने घुसखोरीकडे केलेल्या दुर्लक्षावरील हे राजकीय प्रत्युत्तर आहे. सीमा प्रश्नास मानवतेच्या दृष्टिकोनाचा मुलामा देत घुसखोरांना कणव दाखविण्यामागील राजकारणाचा बेगडीपणा देशाच्या सुरक्षिततेसमोरील आव्हान ठरतो. या प्रश्नाकडे ममतेच्या दृष्टीने पाहणे योग्य नाहीच, हे शुभेन्दू सरकारने या प्रत्युत्तरातून दाखवून दिले आणि सीमा सुरक्षा हा राष्ट्रीय सुरक्षेचा मानला आहे. केवळ मोदी सरकारला राजकीय श्रेय मिळू द्यायचे नाही यासाठी 'आयुष्मान भारत' सारखी जनहिताची योजना नाकारून राज्याची स्वतंत्र योजना आणण्याची भूमिका घेत ममता बॅनर्जी यांनी केंद्राच्या योजनांपासून पश्चिम बंगालला अलग राखण्याचा अनाकलनीय अट्टहास जपला. आता नव्या सरकारने केंद्राच्या या योजना पश्चिम बंगालमध्ये लागू करून 'डबल इंजिन' या संकल्पनेचाही स्वीकार केला आहे. शिक्षक भरती घोटाळा आणि भरती प्रक्रियेतील कथित भ्रष्टाचारामुळे ममता सरकारची प्रतिमा मोठ्या प्रमाणावर मलिन झाली होती. अनेक तरुणांचे रोजगाराचे वय निघून गेले, अशी भावना राज्यात निर्माण झाली होती. सरकारी नोकऱ्यांसाठी वयोमर्यादा वाढविण्याचा निर्णय घेऊन शुभेन्दू सरकारने ममता सरकारच्या काळातील एका अन्यायाचे प्रायश्चित्त घेतले आहे. वयोमर्यादा वाढविण्याचा हा निर्णय राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहेच; पण ती केवळ प्रशासनिक सवलत नसून नाराज तरुण मतदारांना दिलेला राजकीय संदेश आहे. धार्मिक स्थळांच्या परिसराबाहेर आवाज जाणार नाही एवढी काळजी घेऊन ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यावरील निर्बंधांतून नव्या सरकारने धर्मस्वातंत्र्य रस्त्यावर आणण्याच्या हट्टाला लगाम घातला आहे. विशेष प्रसंग वगळता धार्मिक स्थानांच्या जवळपासचे रस्ते व्यापून जनतेची गैरसोय करण्यास पूर्ण बंदी घालण्याचा निर्णय अन्य राज्यांना अनुकरणीय ठरावा.

अर्थात, नव्या सरकारच्या या निर्णयांकडे पाहताना एक बाब विशेष लक्षणीय ठरते. ममता बॅनर्जी यांनी बंगालच्या राजकारणाला केवळ निवडणुकीच्या पातळीवर बदलले नाही, तर त्यांनी डाव्या आघाडीच्या ३४ वर्षांच्या सत्तेला समाप्त करून ग्रामीण महिला, अल्पसंख्यक, गरीब वर्ग आणि लाभार्थी योजनांवर आधारित नवे राजकीय समीकरण निर्माण केले. लक्ष्मी भांडार, स्वास्थ्य साथी, कन्याश्री यांसारख्या योजनांमुळे ममता बॅनर्जी यांना व्यापक जनाधार मिळाला होता. त्यामुळेच या योजना कायम ठेवण्याची घोषणा शुभेन्दू सरकारला करावी लागली आहे. कल्याणकारी राष्ट्रकारणाची दृष्टी असेल तर तेथे राजकारणाचा अडसर असू नये आणि त्यामध्ये नाहक सूडबुद्धी किंवा कुरघोडीचे डावपेचही असू नयेत, एवढा समंजसपणा या नव्या सरकारने निश्चितच दाखविला आहे. जनहिताच्या योजना अधिकाधिक पारदर्शकपणे राबविल्या तर जनाधार अधिकाधिक भक्कम होतो, हे उदाहरण या योजनांतून ममता बॅनर्जी यांनी सिद्ध केले होते. राजकारणावरच नवी कड मजबूत करावयाची असेल, तर तीच नीती वापरावी लागेल, याची जाणीवही असल्याचा संदेश या मंत्रिमंडळाने दिला आहे. बंगालमधील सत्तांतर म्हणजे केवळ पक्षबदल नाही; ममता बॅनर्जींचे सरकार गेले आणि जनतेने शुभेन्दू अधिकारी यांच्या भाजपाला सत्तास्थापनेचा कौल दिला एवढाच त्याच अर्थ नाही. हे दोन राजकीय दृष्टिकोनांतील संक्रमण आहे. एकीकडे ममता बॅनर्जींनी जोपासलेली प्रादेशिक अस्मिता, केंद्राविरोधी भूमिका आणि कल्याणकारी लोकाभिमुखता; तर दुसरीकडे भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सुरक्षेस सर्वोच्च प्राधान्य, राज्य व केंद्र सरकारांतील समन्वयाचे धोरण, प्रशासकीय पुनर्रचनेतून सुशासनाची पायाभरणी असा या सत्तापालटाचा अर्थ आहे. बंगालची जनता नेमक्या कोणत्या दिशेला दीर्घकाळ पाठिंबा देते, हे पुढील काही वर्षांत स्पष्ट होईलच; पण पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयांनी ममता युगावर राजकीय टीका करण्याची एकही संधी नव्या सत्ताधाऱ्यांनी सोडलेली नाही, हे मात्र पुरेसे स्पष्ट झालेले आहे. पश्चिम बंगालमध्ये सुरू झालेल्या या परिवर्तनाचे लाभार्थी अंतिमतः तेथील जनताच ठरणार असल्याने, नव्या सरकारच्या पहिल्या पावलांचे स्वागत झाले असेल, यातही शंका नाही.

## अर्थविशेष

हितेश पारसे

# आयकर रिटर्न भरायचाय्? अशी करा तयारी

दरवर्षी आयकर रिटर्न भरण्याच्या काळात अनेक करदाते घाईगडबडीत कागदपत्रे शोधू लागतात. काहींना फॉर्म १६ मिळालेला नसतो, काहींना शेअर्समधील नफा कसा दाखवायचा हे समजत नाही, तर काही जण एफडीवरील व्याज किंवा मालमत्ता विक्रीची माहिती रिटर्नमध्ये दाखवायची विसरतात. परिणामी चुकीचा रिटर्न भरला जातो, आजच्या डिजिटल युगात आयकर विभागाकडे करदात्यांच्या जवळपास सर्व आर्थिक व्यवहारांची माहिती उपलब्ध असते. बँक व्यवहार, शेअर्समधील गुंतवणूक, म्युच्युअल फंड, मालमत्ता व्यवहार, क्रेडिट कार्ड खर्च टीडीएस, जीएसटी माहिती, परकीय व्यवहार अशा अनेक गोष्टी एआयएस (वार्षिक माहिती विवरण) आणि फॉर्म २६एएस मध्ये दिसतात. त्यामुळे कोणतीही माहिती लपविणे किंवा चुकीची दाखविणे भविष्यात महागात पडू शकते. त्यामुळे आर्थिक वर्ष २०२५-२६ (मूल्यांकन वर्ष २०२६-२७) साठी आयकर रिटर्न भरताना कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, कोणत्या गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे आणि कोणत्या चुका टाळाव्यात हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

१. **मूलभूत माहिती** : प्रत्येक करदात्यासाठी आवश्यक : रिटर्न भरण्यापूर्वी खालील कागदपत्रे आणि माहिती तयार ठेवणे आवश्यक आहे- पॅन कार्ड, आधार कार्ड, आयकर पोर्टलचा लॉगिन पासवर्ड, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी, बँक पासबुक किंवा बँक स्टेटमेंट, कर्ज विवरण. याशिवाय खालील माहिती असल्यास ती कर सल्लागाराला सांगणे अत्यंत महत्त्वाचे आहे:

**अतिरिक्त खुलासे -** शेअर्स किंवा म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक, कंपनी किंवा एलएलपीमध्ये संचालक/भागीदार असणे, परदेशातील बँक खाते, मालमत्ता किंवा गुंतवणूक, परदेशी उत्पन्न, क्रिप्टो व्यवहार अनेक वेळा करदाते या गोष्टी 'महत्त्वाच्या नाहीत' असे समजून सांगत नाहीत. परंतु ए.आय.एस मध्ये माहिती दिसत असल्यामुळे सूचना येऊ शकते.

२. **पगारदार कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक कागदपत्रे** : फॉर्म १६, पगाराच्या पावत्या, थकबाकी वेतनची माहिती, नियोक्ता प्रमाणपत्र. फॉर्म १६ उपलब्ध नसल्यास? काही वेळा कंपनीकडून फॉर्म १६ वेळेत मिळत नाही. अशा वेळी वेतन क्रेडिट दिसणारे बँक स्टेटमेंट, पगाराच्या पावत्या, नियोक्ता पत्र, स्वतःच्या पगाराची गणना यांच्या आधारे रिटर्न भरता येतो.

**नोकरी बदलल्यास...:** एका आर्थिक वर्षात दोन किंवा अधिक नोकऱ्या केल्यास सर्व कंपन्यांचे उत्पन्न एकत्र दाखवणे आवश्यक असते. अनेक करदाते एका फॉर्म १६ वरच रिटर्न भरतात; नंतर कर मागणी येते.

३. **घराची मालमत्ता आणि गृहकर्ज संबंधित माहिती** : मालमत्तेचा संपूर्ण पत्ता, भाडे करार, वर्षभरात मिळालेले भाडे, मालमत्ता कर पावती, गृह कर्ज व्याज प्रमाणपत्र. गृहकर्जावर मिळणाऱ्या करसवलती : कलम २४: गृहकर्जावरील व्याज वजावट. कलम ८०सी : वजावटीवर मुद्दल परतफेड. भाडे मिळत नसले तरी माहिती द्यावी : स्वतः राहत असलेले घर, रिकामी मालमत्ता किंवा भाड्याने दिलेली मालमत्ता माहिती योग्य प्रकारे दाखविणे आवश्यक.

४. **व्यावसायिक आणि व्यावसायिक उत्पन्न** : सर्वाधिक तपासणी होणारा विभाग- व्यवसायिक, डॉक्टर, वकील, सीए, आर्किटेक्ट, कंत्राटदार, सल्लागार, फ्रिलान्सर यांनी अत्यंत काळजीपूर्वक रिटर्न भरावा. हिशेबाची पुस्तके सांभाळावी लागतात- ताळेपत्रक, नफा-तोटा पत्रक, रोकड पुस्तक, खातेवही, जीएसटी रिटर्न, बँक स्टेटमेंट. खाते मुख्य खाते : विक्रीची माहिती, खर्चाची माहिती, कर्जदार/कर्जदार, स्टॉक तपशील, रोख आणि बँक शिल्लक बंद करणे. जीएसटी नोंदणीकृत व्यवसायांनी विशेष लक्ष द्यावे : जीएसटी रिटर्न आणि आयकर परतावामधील विक्री जुळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ: जीएसटीमध्ये १ कोटी विक्री दाखवले आणि आयटीआरमध्ये ८० लाख दाखवले तर सूचना येण्याची शक्यता वाढते.

५. **भांडवली नफा** : शेअर्स, म्युच्युअल फंड, मालमत्ता, सोने, क्रिप्टो यांवरील व्यवहार योग्य प्रकारे दाखवणे अत्यंत आवश्यक आहे.

**ए.** शेअर्स/सिक्युरिटीज/म्युच्युअल फंड्स : आवश्यक कागदपत्रे- ब्रोकरचा नफा/तोटा अहवाल, शेअरनिहाय प्रवेश आणि निर्गमन तारखा, वार्षिक होल्डिंग स्टेटमेंट, लाभांश विवरण. विशेष लक्ष द्याः इंट्राडे ट्रेडिंग, एफ अँड ओ व्यवहार, सट्टेबाजी उत्पन्न, दीर्घकालीन/अल्पकालीन भांडवली नफा, तोटा समायोजन अनेक वेळा ब्रोकर ॲपमध्ये नफा दिसतो, पण कर गणना वेगळी असते. **बी.** स्थावर मालमत्ता विक्री मालमत्ता विक्रीमध्ये पुढील कागदपत्रे आवश्यक असतात- खरेदी करार, विक्री करार, मुद्रांक शुल्क मूल्यांकन, ब्रोकरेज आणि विक्री खर्च, सुधारणा खर्चाचे पुरावे. अनुक्रमणिकाचा फायदा : जुनी मालमत्ता विकताना अनुक्रमणिकामुळे कॅपिटल गेन टॅक्स मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. **सी.** सोने/दागिने/क्रिप्टो व्यवहार : आज क्रिप्टो व्यवहार आयकर विभागाच्या विशेष लक्षात आहेत. त्यासाठी खरेदीची बिले, विक्रीची बिले, वॉलेट स्टेटमेंट, एक्सचेंज रिपोर्ट जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

६. **इतर उत्पन्न विसरू नका** : बचत बँकेवरील व्याज, मुदत ठेवीवरील व्याज, लाभांश उत्पन्न, शेती उत्पन्न, कमिशन उत्पन्न, बॉण्डवरील व्याज, फ्रिलान्सिंग उत्पन्न, इतर व्याज उत्पन्न, ए.आय.एस.मध्ये ही माहिती दिसत असल्यामुळे ती दाखवणे आवश्यक आहे.

७. **करबचत गुंतवणूक आणि खर्च** : करसवलतीसाठी खालील गुंतवणुकींचे पुरावे आवश्यक असतात: एलआयसी प्रीमियम, मुलांची शाळेची फी, गृहकर्जाचे मुद्दल, कर बचत एफडी, पीपीएफ गुंतवणूक, एनपीएस गुंतवणूक, सुकन्या समृद्धी, एनएससी गुंतवणूक, मेडिक्लेम प्रीमियम, अपंगत्व कपातीची कागदपत्रे, शैक्षणिक कर्ज व्याज प्रमाणपत्र, देणगीच्या पावत्या, भाड्याच्या पावत्या, इलेक्ट्रिक वाहन कर्जावरील व्याज

८. **कलम ८७अ अंतर्गत सवलत** : नवीन करप्रणालीमध्ये पात्र व्यक्तींना कलम ८७अ अंतर्गत करसवलत मिळू शकते. परंतु भांडवली नफा उत्पन्न, विशेष दर उत्पन्न, लॉटरी किंवा सट्टेबाजी उत्पन्न असल्यास सूटवर परिणाम होऊ शकतो.

**रिटर्न भरण्याच्या महत्त्वाच्या तारखा** : गैर-व्यावसायिक करदाते (व्यक्ती/हिंदू अविभक्त कुटुंब) अंतिम तारीख : ३१ जुलै २०२६. व्यावसायिक करदाते (व्यवसाय/व्यावसायिक/एलएलपी) अंतिम तारीख : ३१ ऑगस्ट २०२६

**उशिरा रिटर्न भरल्यास दंड** : विलंब शुल्क : उत्पन्न ५ लाखांपर्यंत - १,०००, उत्पन्न ५ लाखांपेक्षा जास्त - ५,००० याशिवाय परतावा देऊ शकतो, तोटा पुढे नेत नाही, व्याज लागू होऊ शकते, सूचना येण्याची शक्यता

**कोणाला आयकर रिटर्न भरणे आवश्यक आहे?**

मूलभूत सूट मर्यादा जास्त असल्यास, टी.डी.एस. वजावट, भांडवली नफा किंवा क्रिप्टो व्यवहार असल्यास, व्यवसाय किंवा व्यावसायिक उत्पन्न असल्यास, कर्ज/व्हिसा/टेंडर उत्पन्नाचा पुरावा आवश्यक असल्यास, विदेशी मालमत्ता किंवा परकीय उत्पन्न असल्यास उदयत आणि योग्य रिटर्न भरण्याचे फायदे : बँक कर्ज मंजुरी होते, व्हिसा प्रक्रियेमध्ये मदत होते, आर्थिक विश्वासार्हता, भविष्यातील सूचना, कर नियोजन योग्य प्रकारे. 'वेळेत रिटर्न भरा, कायदेशीररीत्या करबचत करा आणि भविष्यातील अडचणी टाळा' हे प्रत्येक जबाबदार करदात्याने लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# ...तुला देतो ई-पैसा

कोणतेही तंत्रज्ञान स्वीकारताना काही मापदंड तपासून पाहावे लागतात. नव्या तंत्रज्ञानामुळे वेळ वाचणार आहे का, श्रम कमी होणार आहेत का, उत्पादन क्षमता वाढणार आहे का, खर्च कमी होणार आहे का, ते वापरणे सोपे जाणार आहे का, अशा प्रश्नांचे उत्तर 'हो' असेल तर ते तंत्रज्ञान स्वीकारावे, असा नियम आहे. या कसोट्यांवर मोबाईल तंत्रज्ञान तपासून पाहिले तर ते 'सौ प्रतिशत खरा' ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये मोबाईल तंत्रज्ञानामुळे शक्य आणि लोकप्रिय झालेल्या 'युपीआय'चाच विचार केला तरी त्याचे अगणित फायदे सांगता येतील.

कॉम्प्युटर, इंटरनेट, स्मार्टफोनसारख्या घटकांमुळे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. बदलत्या तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी परिवर्तन होणार आहे. त्यामुळेच या तंत्राचे व्यावहारिक उपयोग वाढताना दिसणार आहेत. 'येरे येरे पावसा तुला देतो पैसा' हे गाणे सर्वश्रुत आहेच. आता पाऊस येईल, पण त्याला द्यायला लागणारे पैसे हळूहळू भौतिक जगातून नाहीसे होत आहेत. पूर्वी पैसा म्हणजे हातात असणारी नाणी, नोटा, खिशात ठेवलेले पाकीट हे सर्व आपल्याला परिचित होते. पण २०२६ च्या जगात हा पैसा हळूहळू अदृश्य होत आहे. ई-पैसा म्हणजेच डिजिटल पैसा आता आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालला आहे. भारतात पैशाच्या व्यवहारांमध्ये मोठी क्रांती घडली आहे. मोबाईलच्या साहाय्याने क्षणात पैसे पाठवणे, बिले भरणे, खरेदी करणे अगदी सहज झाले आहे. आज शहरांपासून गावांपर्यंत प्रत्येक ठिकाणी मोबाईलद्वारे व्यवहार होताना दिसतात. आज भारतात युपीआयने अक्षरशः आर्थिक क्रांती घडवून आणली आहे. गावोगावी छोट्या विक्रेत्यांकडेही क्यूआर कोड दिसतो. रिक्षावाले, फळविक्रेते, अगदी मंदिरातील देणग्याही डिजिटल पद्धतीने स्वीकारल्या जात आहेत. २०२६ मध्ये ही सवय इतकी अंगवळणी पडली आहे की, रोख पैसे नसले तरी व्यवहार थांबत नाहीत. स्मार्टफोन केवळ बोलण्यासाठीचे साधन राहिलेला नाही, तर एक प्रकारचे डिजिटल पाकीट बनला आहे. आपले बँक खाते, पैसे, व्यवहारांची माहिती सर्व काही या एका उपकरणात साठवलेले असते. बँकेत जाण्याची गरज कमी झाली आहे. याचबरोबर 'नियर फिल्ड कम्युनिकेशन' म्हणजेच फोन किंवा कार्ड फक्त यंत्राजवळ नेले की व्यवहार पूर्ण होतो, ही पद्धत वाढत आहे. बस, मेट्रो, दुकाने, रुग्णालये अशा सर्व ठिकाणी ही सुविधा उपलब्ध होत आहे. व्यवहार अधिक जलद आणि सोपे झाले आहेत. तंत्रज्ञानाची ही घोडदौड इथेच थांबणारी नाही. २०३० पर्यंत आपण वेअरेबल टेक्नॉलॉजी म्हणजे घड्याळ, चष्मा किंवा अगदी शरीरात बसवलेली सूक्ष्म चिप यांच्याद्वारे व्यवहार करताना पाहू शकतो. काही देशांमध्ये तर अशा चिप्सची चाचणी सुरूही झाली आहे. आपल्याला पाकीट, कार्ड, अगदी मोबाईलही बाळगण्याची गरज नाही. फक्त आपल्या ओळखीनेच (रेकग्निशन) व्यवहार होणार! ॲप्सचा उद्योग तर प्रचंड वेगाने वाढत आहे. खरेदी, बिले भरणे, गुंतवणूक, कर्ज घेणे सर्व काही ॲप्समधून होत आहे. त्यामुळे व्यापार, विपणन आणि ग्राहक सेवा यांचे स्वरूप पूर्णपणे बदलत आहे. आठवड्याचे सातही दिवस २४ तास सेवा ही आता अपेक्षा बनली आहे. जैविक ओळख तंत्रज्ञान (बायोमेट्रिक) म्हणजे बोटांचे ठसे, चेहऱ्याची ओळख, डोळ्यांचे स्कॅन यांचा वापर वाढत आहे. यामुळे व्यवहार अधिक सुरक्षित होत आहेत. आज अनेक मोबाईलमध्ये बोट ठेवून किंवा चेहरा दाखवून फोन उघडता येतो. उद्या कदाचित पैशांचा व्यवहारही अशाच पद्धतीने होईल. बँकिंग क्षेत्रातही मोठे बदल होत आहेत. व्यवसाय क्षेत्रात या बदलांचा मोठा प्रभाव पडत आहे. दुकानदार डिजिटल पद्धतीने पैसे स्वीकारत आहेत. या पद्धतीमुळे ग्राहकांना जलद सेवा मिळते, व्यवहारांची नोंद आपोआप राहते, त्यामुळे पारदर्शकता वाढते. छोट्या व्यवसायांनाही मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. शिक्षण क्षेत्रातही बदल दिसत आहेत. विद्यार्थी मोबाईलद्वारे फी भरतात, अभ्यासक्रम घेतात. त्यामुळे लहान वयातच आर्थिक व्यवहारांचे ज्ञान मिळते. डिजिटल साक्षरता वाढते. डिजिटल व्यवहारांमध्येही भारताने गेल्या काही काळात मोठी झेप घेतली. हे एक असे युग आहे, जिथे तंत्रज्ञानाचा वापर सर्व क्षेत्रात वाढत आहे. या युगात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामुळे आपल्या जगण्याची आणि काम करण्याची पद्धत बदलत आहे. आता अशी बरीचशी कामे 'ऑनलाईन' होऊ घातल्याने येत्या फक्त १० ते २० वर्षांमध्ये



आपल्याला कल्पनाही करता येणार नाही, इतक्या बाबी संगणकाद्वारे हाताळता येणार आहेत. परंतु या सगळ्या सोयींसोबत काही आव्हानेही आहेत. सर्वात मोठा प्रश्न म्हणजे सुरक्षितता. फसवणूक, बनावट संदेश, ओटीपी चोरणे या गोष्टी वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने सतर्क राहणे गरजेचे आहे. आपली माहिती सुरक्षित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच समाजात डिजिटल दरी ही समस्या आहे. तरुण पिढी तंत्रज्ञान सहज वापरते, पण वृद्धांना अडचणी येतात. त्यामुळे सर्वांना तंत्रज्ञानाचे शिक्षण देणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिक डिजिटल व्यवहार समजू शकेल असे वातावरण तयार करणे गरजेचे आहे. एक महत्त्वाची बाब म्हणजे खर्चाची जाणीव. पूर्वी आपण नोटा मोजून खर्च करीत असल्याने व्यवहारावर नियंत्रण राहायचे. आता मोबाईलद्वारे सहज पैसे जातात. त्यामुळे कधी कधी अपेक्षेपेक्षा जास्त खर्च होतो. आर्थिक शिस्त राखणे आवश्यक आहे.

भविष्यात आवाजाने व्यवहार करणे, हाताच्या हालचालीने पैसे देणे अशा नवीन पद्धती येऊ शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या खर्चावर लक्ष ठेवेल, सल्ला देईल, बचत वाढवेल. 'येरे येरे पावसा, तुला देतो ई-पैसा' ही ओळ एका नव्या युगाची सुरुवात दर्शवेल. पैसा दिसणार नाही, पण तो प्रत्येक ठिकाणी असेल. आपल्या मोबाईलमध्ये, आपल्या ओळखीत, आपल्या प्रत्येक व्यवहारात. पाकीट हरवले तरी नुकसान होणार नाही, पण आपली डिजिटल ओळख सुरक्षित ठेवणे सर्वात महत्त्वाचे ठरेल. तंत्रज्ञानाने आपले जीवन सुलभ केले आहे, पण त्याचा योग्य वापर करणे आपल्या हातात आहे. म्हणूनच या नव्या युगाला स्वीकारून, त्याचा योग्य उपयोग करून, सुरक्षित आणि सजग राहून पुढे जाणे हेच शहाणपणाचे आहे. एकंदरीत, कालाय तस्मै नमः काळाच्या या प्रवाहाला अभिवादन करून, डिजिटल भविष्याचा आत्मविश्वासाने स्वीकार करायला हवा. परिवर्तन हाच निसर्गाचा नियम आहे आणि या परिवर्तनाशी जुळवून घेणाराच उद्याचा विजेता असेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# गर्लफ्रेंड कल्चरचा 'खेळ'!

'जेण्टलमन्स गेम' म्हणून ओळखला जाणारा क्रिकेटचा खेळ सध्या भलत्याच कारणांमुळे चर्चेत आला आहे. मैदानावर बॅट आणि बॉलच्या सामान्यातील रंगत फिकी पडून, पॅव्हेलियनमधील दृश्ये 'रसभरीत' ठरू लागली आहे. किमान यंदाचा आयपीएल सिझन तरी एवढ्याचसाठी आणि विशेषत्वाने 'गर्लफ्रेंड कल्चर'साठी लक्षात राहणार आहे. कॅमेऱ्यासमोर जे दिसतंय त्यापेक्षा कितीतरी जास्त कॅमेऱ्यामागे खरोखर घडतंय आणि हे सगळं इतकं गंभीर आहे की, नियामक मंडळाला त्यासाठी धोरण आखण्याची गरज भासते आहे.

क्रिकेटचा खेळ भारतीयांसाठी केवळ मनोरंजन नाही तर प्रत्येक युवा पिढी घडविणारा एक धर्म आहे. प्रश्न खेळभावनेचा तर आहेच; सोबतच खेळातील नीतिमूल्यांचा आणि संयमाचा आहे. आज लहानशी दिसणारी ही समस्या वास्तवात हाताबाहेर गेलेलं प्रकरण आहे. मुंबई इंडियन्सच्या कर्णधारापासून सुरू झालेलं हे प्रकरण पॅव्हेलियनमध्ये बसून वेपिंग करण्यापर्यंत गेलं आहे. मालिकेदरम्यान, पत्नी किंवा अगदी कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला खेळाडूसोबत हॉटेलमध्ये राहण्याची परवानगी होती. पण, अलिकडे खेळाडूंच्या गर्लफ्रेंड्सचे प्रस्थ वाढलेले दिसू लागले. मैदानावर खेळाडूंना घेऊन जाणारी बस या गर्लफ्रेंड्ससाठी थांबू लागली, आयपीएलच्या संपूर्ण प्रक्रियेतील गोपनीयता चव्हाट्यावर येऊ लागली. बहुतांश 'गर्लफ्रेंड्स' सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असल्यामुळे स्टेडियमच्या आत-बाहेरचं सगळंच रील्समध्ये झळकू लागलं. विशेषतः हार्दिक पांड्याच्या प्रकरणानंतर हे विशेषत्वाने उघड झालं. आयपीएलपूर्वी एकदिवसीय सामन्यांच्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यातही 'खुल्लम खुल्ला' प्रेमाची चर्चा झालीच.

गर्लफ्रेंड्स सोबत मिरवण्यामुळे संघशिस्तीचा भंग, खेळामध्ये एकाग्रता नसणे आणि सुरक्षा नियमांचं उल्लंघन वारंवार घडू लागलं आणि यातून 'गर्लफ्रेंड कल्चर'चा उदय झाला. युवापिढीसाठी 'रोल मॉडेल' असणारे खेळाडू सामना सुरू असताना, कॅमेऱ्यांसमोर ई-सिगारेट ओढून वेपिंग करत असतील, तर चाहते म्हणून आपल्यालाच क्रिकेटचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. कोणत्याही खेळाडूसाठी शिस्त हा दागिना असावा, ओझं नाही. डग आऊटमध्ये बसून किंवा व्लॉग्ज्मध्ये, खेळाविषयीच्या चर्चेपेक्षा नशेच्या धुराची वलयं दिसत असतील तर हे केवळ नियमांचे उल्लंघन नाही तर, कोट्यवधी भारतीयांच्या विश्वासाची उघडउघड केलेली हत्या आहे. क्रिकेटचे मैदान पब किंवा क्लब नाही की, खेळाडू तिथे बसून नशा करतील. मैदान तर खेळाडूंच्या घामाच्या थेंबांची शाई करून इतिहास लिहिण्यासाठी आहे. कॅमेऱ्यासमोर नशेडी क्रिकेटपटूंना बघणाऱ्या लोकांच्या मनात साहजिकच प्रश्न येतो की, कॅमेऱ्यासमोर हे असं आहे तर मागे काय सुरू असेल?

'नो गर्लफ्रेंड' आणि नशा रोखण्यासाठी कठोर सुरक्षा यंत्रणा लावणाऱ्या बीसीसीआयला आज कोणी बुरसटलेल्या विचारांचे म्हणत असले, तरी क्रिकेटला सोशल मीडियाचा 'कंटेंन्ट' बनविण्यापासून रोखण्यासाठी अशी कार्यवाही आवश्यक आहे. या सगळ्या गोंधळात आरोप-प्रत्यारोप झाले आणि त्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून क्रीडा पत्रकारांवरही ठपका ठेवला गेला. पण, यथावकाश ट्विट डिलीट झाल्या आणि बदलल्याही गेल्या. खेळभावनेतून जय-पराजय स्वीकारावा, हे तर क्रीडातंत्राचे मूळ आहे. आताशा लोकतंत्रातही पराभव स्वीकारून पद सोडणे, किती कठीण आहे हे आपण पश्चिम बंगालमध्ये बघत आहोतच. पैसा आणि यश डोक्यात जाणार असेल तर आयपीएलच्या सगळ्या युवा खेळाडूंनी थोडं थांबून विचार करण्याची आणि त्यांच्या पाठीशी असलेल्या भारतीय क्रिकेटच्या धुरंधरांच्या 'लीगसी'कडे वळून बघण्याची गरज आहे. आयपीएलची खरी ताकद त्यात असलेल्या पैसा आणि ग्लॅमरच फक्त नाही तर लोकांचे प्रेम आहे. क्रिकेटचा तो खेळ आहे ज्याने गल्लीबोळांपासून भव्य स्टेडियमपर्यंत भारतीयांची मनं जोडली आहेत.

क्रिकेट म्हणजे निर्जीव व्हिडीओ गेम नाही. त्यातील थरार, जिंकण्याची धडपड, पराभवानंतरचा मोकळेपणा आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे 'हिरो' म्हणून असलेली खेळाडूंची प्रतिमा क्रिकेटधर्मीयांना हवी आहे. आयपीएलची व्ह्युअरशिप घसरण्यामागे हेदेखील एक कारण आहे. आयपीएलचे ग्लॅमर, खेळाडूंचा 'सेलिब्रिटी' बनण्याचा झटपट झालेला प्रवास, सुमार परफॉर्मन्समध्येच हाती खेळणारा पैसा आणि त्यातून आलेला वैयक्तिक अहंकार 'इतिहास' घडवू शकणार नाही. क्रिकेटचा आत्मा वाचविण्यासाठी खेळाडूंना शिस्त आणि संयम बाळगून 'गर्लफ्रेंड कल्चर'मधून बाहेर पडावं लागेल. ब्रॅण्ड व्हॅल्यू, स्पॉन्सरर्सचा पैसा 'सुपरस्टार कल्चर' निर्माण करायला पुरेसे आहेत. पण, वैयक्तिक जीवन बाजूला ठेवून, कॅमेरा अँगल्सकडे दुर्लक्ष करून मैदानावर उतरले तरच 'जण्टलमन स्पिरीट' कायम राहणार आहे. साबरी ब्रदर्सची कव्वाली इथे आवर्जून आठवते,

*'संसार में बाजे ढोल, ये दुनिया मेरी तरह है गोल, कि पैसा बोलता है...'*

९८५०३३९२४०

## वाचक पत्रे

### विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी खेळ

नीट प्रवेश परीक्षेचा पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करून पुन्हा घेण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. नीटसारख्या महत्त्वाच्या आणि राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षेचा पेपर फुटणे ही बाब चिंतनीय आहे. परीक्षा रद्द झाल्याने अंदाजे १० लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. गेली दोन वर्षे रात्रीचा दिवस करून परीक्षा देणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांना या निर्णयाचा मोठा फटका बसणार आहे. भ्रष्ट व्यवस्था आणि काही लोकांनी केलेल्या चुकीची शिक्षा लाखो गुणी आणि मेहनती विद्यार्थ्यांना मिळणार आहे. काहीही चूक नसताना या विद्यार्थ्यांना याचा मनस्ताप सहन करावा लागत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीची भावना पसरली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कठीण आर्थिक आणि मानसिक परिस्थितीतून नीटच्या परीक्षेची तयारी केली होती. परीक्षा चांगली गेल्याने चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळेल या आशेवर असणाऱ्या विद्यार्थ्यांवर याचा मोठा मानसिक ताण येणार आहे. खेडेगावातून शहरात आलेल्या विद्यार्थ्यांना आणखी आर्थिक झळ सोसावी लागणार आहे. त्यांना पुन्हा शहरात जाऊन राहणे, वसतिगृहाचा खर्च करणे, क्लासेस, टेस्ट सिरिज यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थीच नाही तर पालकही चिंतेत आहेत. दोन वर्षांची मेहनत सफल झाली असे वाटत असतानाच पुन्हा परीक्षा देण्याची वेळ आल्याने विद्यार्थ्यांवर मानसिक ताण आला आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### त्यांनी राज्यात येता कामा नये

पश्चिम बंगालमध्ये अपेक्षित परिवर्तन झाले. ममता बॅनर्जी केवळ या रोहिंग्यांच्या मतांवरच निवडून येत होती, हे स्पष्ट झाले आहे. आता भाजपा सरकार व मुख्यमंत्री शुभेन्दु अधिकारी लवकरच या रोहिंग्यांना बांगला देशात वापस पाठवणार. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात ज्या ज्या भागात विशिष्ट धर्माचे लोकं मोठ्या प्रमाणात राहतात तेथे चौकशी, पाळत ठेवणे गरजेचे आहे. नागपूरसारख्या ठिकाणी सर्व्हे झाला पाहिजे. २०११ नंतर गेल्या १४ वर्षांत किती लोकं बाहेरून आले व ते नेमके काय करीत आहेत, याची माहिती पोलिस विभागाजवळ असलीच पाहीजे. भारतातील प्रत्येक राज्याने आपल्या सीमेवर विशेष निगराणी ठेवली पाहीले. घुसखोर बांगला देशी हे त्यांच्याच देशात वापस जायला हवे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### चोराच्या उलट्या बोंबा

काँग्रेस शासन काळात, विशेषतः राजस्थानात बऱ्याच स्पर्धा परीक्षांची पेपरफूट प्रकरणे घडली. २०२० मधील 'वनरक्षक भरती बाडमेर' परीक्षेच्या पेपरफूट प्रकरणात एनएसयुआयचा माजी अध्यक्ष नरेश देव सारणला अटक झाली होती. २०२१ मध्ये झालेल्या शिक्षक भर्ती परीक्षेतील घोटाळ्यात बऱ्याच काँग्रेसजनांचा सहभाग होता. नीट-२०२६ परीक्षा सुरक्षित होण्यासाठी विविध उपाय करण्यात आले होते. इतकंच काय, प्रश्नपत्रिका वाहून नेण्यासाठी जीपीएस ट्रॅक्ड वाहनांची सोयसुद्धा होती. इतके सगळे करूनही पेपर फुटलाच. पेपरफूट समर्थनीय नाहीच. यातले झारीतले शुक्राचार्य शोधून शासनाने त्यांना धडकी बसेल अशी शिक्षा करावी.

**कल्पना माहुरकर**/नागपूर

### विशेष गाड्या वेळेवर धावाव्यात

कधी कधी विशेष गाड्यांना पाच ते सहा तासांचा विलंब होतो. भाडेही जास्त असते, मग विशेष गाड्यांना इतका उशीर का होतो? रेल्वे विभाग जर कोणत्याही विशेष गाड्या चालवत असेल, तर त्यांनी सर्वप्रथम त्या गाड्या वेळेवर धावतील, याची खात्री करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. उदाहरणार्थ, जर एखादी विशेष गाडी धावत असेल, तर कोणत्याही सुपरफास्ट गाडीने त्या गाडीला ओव्हरटेक करू नये. दुरंतो एक्सप्रेस आणि राजधानी एक्सप्रेस वगळता इतर कोणत्याही गाडीने विशेष गाडीला ओव्हरटेक करू नये. कारण त्यांचे भाडे जास्त असते. अनेकदा असे दिसून येते की, विशेष गाड्यांमध्ये पाण्याची कमतरता असते, ज्यामुळे प्रवाशांची गैरसोय होते. प्रत्येक प्रमुख स्थानकावर पाणीपुरवठ्याची तपासणी केली पाहिजे. विशेष गाड्यांमधील स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक डब्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे. कारण गाड्यांमध्ये वारंवार चोऱ्या होतात. रेल्वे विभाग याकडे लक्ष देईल का?

**राजेश कारिया**/अकोला

### उन्हाळ्याला हलक्यात घेऊ नका

उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाच्या तीव्र झळा त्रासदायक ठरत आहेत. उन्हात फिरल्याने पटकन थकवा येतो, चक्कर येतात, हातापायाला गोळे येतात, डोळ्यांना भयंकर त्रास होतो, कानात व नाकात उन्हाच्या झळा शरीरात प्रवेश करतात. याचे प्रमाण वाढले की, उष्माघाताची शक्यता असते. मेंदू व हृदयावर या वाढत्या उन्हाचा विपरीत परिणाम होतो. उन्हाळ्यात शरीराचे तापमान उच्च पातळीवर जाते. यामुळे उन्हात फिरणे, श्रमाची कामे करणे टाळावीत. गरजेचेच असेल तर कान, नाक व डोके हे पूर्णपणे कापडाने झाकावे. पांढरे व सैल कपडे वापरावे, भरपूर पाणी प्यावे. उन्हाळ्याला हलक्यात घेऊ नका.

**धोंडीरामसिंह राजपूत**/वैजापूर ९४२१३१२२४४

## तहसील कार्यालय, कळंब

**बार्शी रोड कळंब- पीन कोड ४१३५०७**
दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

जा.क्र.२०२६/मह/दंडणीय/ज.मृ./कावी-३९५ दिनांक ०५/०५/२०२६

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांचेमार्फत **अमर नजमोद्दीन मुल्ला रा. कळंब जि. धाराशिव** यांनी स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक **अमर नजमोद्दीन मुल्ला रा. कळंब** यांचे गाव कळंब हे असून सदर व्यक्तीचा कळंब जि.धाराशिव या ठिकाणी **दि.०५/०२/१९८७** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांनी **दि.२२/०४/२०२६** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

# प्रवेश शुल्काची माहिती फलकावर लावणे महाविद्यालयांना आता बंधनकारक

## उच्च शिक्षण संचालनालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १४ मे -**

राज्यात इयत्ता १२ वीचा निकाल लागल्यानंतर आता पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर, उच्च शिक्षण संचालनालयाने १३ मे २०२६ रोजी एक महत्त्वाचे परिपत्रक काढून सर्व महाविद्यालयांना प्रवेश शुल्काबाबत पारदर्शकता राखण्याचे निर्देश दिले आहेत.

उच्च शिक्षण संचालक (प्र.) डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी पत्राद्वारे स्पष्ट केले आहे की, विद्यापीठ किंवा शुल्क नियामक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या नियमानुसार ट्युशन फी, डेव्हलपमेंट फी आणि इतर शुल्काची अद्ययावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावणे आता अनिवार्य आहे. तसेच, ही सर्व माहिती महाविद्यालयाच्या प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये असणेही या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात आले आहे.

प्रवेश घेण्यापूर्वी सर्व इच्छुक विद्यार्थ्यांना शुल्काबाबत संपूर्ण माहिती करून देण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची असेल. महाविद्यालयांनी ही माहिती सूचना फलकावर आणि माहितीपुस्तिके मध्ये दिल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव आणि विभागीय सहसंचालक यांची राहील. प्रवेश प्रक्रियेदरम्यान शुल्काबाबत कोणतीही तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता महाविद्यालयांनी घ्यावी, अन्यथा उद्भवणाऱ्या तक्रारीस संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील, असा इशाराही संचालनालयाने दिला आहे. या निर्णयामुळे प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता येऊन विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय टळणार आहे.

## तहसील कार्यालय, कळंब

**बार्शी रोड कळंब- पीन कोड ४१३५०७**
दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

जा.क्र.२०२६/मह/दंडणीय/ज.मृ./कावी-३९७ दिनांक ०५/०५/२०२६

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब, जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांचेमार्फत **मुनाफ यासीन शेख रा. कळंब जि. धाराशिव** यांनी मुलगा इरफान मुनाफ शेख यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक **इरफान मुनाफ शेख रा.कळंब** यांचे गाव कळंब हे असून सदर व्यक्तीचा कळंब जि.धाराशिव या ठिकाणी **दि.१६/०५/१९७४** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांनी **दि.०५/०३/२०२६** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

## तहसील कार्यालय, कळंब

**बार्शी रोड कळंब- पीन कोड ४१३५०७**
दुरध्वनी क्र. ०२४७३- २६२२५४ Email id-tahkalambgmail.com
**(संकलन विभाग- दंडणीय)**

जा.क्र.२०२६/मह/दंडणीय/ज.मृ./कावी-४०६ दिनांक ०६/०५/२०२६

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते को, या कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांचेमार्फत **रौफ मुनाफ शेख रा. कळंब** यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक **रौफ मुनाफ शेख रा. कळंब** यांचे गाव कळंब हे असून सदर व्यक्तीचा कळंब जि.धाराशिव या ठिकाणी **दि.०५/०७/१९७९** रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात मुख्याधिकारी नगर परिषद कळंब यांनी **दि.०६/०५/२०२६** रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

## Classifieds

### Vacancy

Vacancy available for Sales Engineer / Marketing Executive. Swaraj Pneumatics mobile: 8380050483

### पाहिजेत

**जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात घरगुती काम करण्यासाठी २५ ते ३५ वयोगटातील महिला पाहिजे. संपर्क: ९४२३५९००३६/ ९४२०८८५६०७**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील म जकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

# भरारी करिअर मार्गदर्शन मेळाव्याचे रविवारी आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

सोलापुरातील ब्रेन शैक्षणिक सल्ला व समुपदेशन केंद्र व लायन्स क्लूब सोलापूर मेट्रो या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने रविवार १७ मे रोजी दुपारी ३ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात भरारी करिअर मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन केल्याची माहिती शलाका कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इयत्ता दहावी व बारावी परीक्षांचा निकाल लागला असल्याने पालक व विद्यार्थ्यांची योग्य शाखा निवडून प्रवेश मिळविण्यासाठी याचे आयोजन केले आहे. यात डॉ. चंद्रकांत वाघमारे (मेडिकल क्षेत्रातील संधी व प्रवेश प्रक्रिया), पंडीत समीर दलाल (सर्व क्षेत्रातील करीयरच्या संधी), प्राचार्य सत्यम दुधनकर (फायर इंजिनियरिंग क्षेत्रात करियर), प्रा. अमर गोरंठी (आयटी/कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील करीयरच्या संधी), अनिल बनसोडे (आर्ट्स कॉमर्स क्षेत्रातील करीयरच्या संधी) सौरभ कुलकर्णी (सायबर सेक्युरिटी क्षेत्रात करीयरच्या संधी) प्राचार्य श्रीकांत जोशी (इंजिनीरिंग, डिप्लोमा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया व शिष्यवृत्ती ) प्रा. डॉ. अंबादास भासके (पत्रकारिता व माध्यम क्षेत्रातीलसंधी) श्री. किरण कुलकर्णी (शैक्षणिक क्षेत्रात समुपदेशनाची आवश्यकता) आदींची मार्गदर्शन मिळणार आहे.

## जामश्री रिअलटी लिमिटेड

सीआयएन: L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालय : फत्तेचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३ ००१
इमेल आयडी : jammill1907@gmail.com

### सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवार दि. २१ मे २०२६ रोजी ६०१-बी, ६वा मजला, मोतीमहल, १९५ जे. टी. रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२० येथे संध्याकाळी ६.३० वाजता (भाप्रवे) इतर गोष्टीसह ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या चौथ्या तिमाही आणि वर्षाच्या कालावधी करीताचा कंपनीचे लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष ग्राह्य धरण्यासाठी आणि संमत करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

जामश्री रिअलटी लिमिटेड करिता
तारीख : १३.०५.२०२६ सही/-
ठिकाण : सोलापूर राजेश दमाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ७३/२०२६

१. गयाबाई ऊर्फ ललिता सुब्राव शेंडगे -- अर्जदार
रा. खांडवी ता. बार्शी जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील रेश्मा आर मांजरे)

**विरुद्ध**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
तथा ग्रामपंचायत अधिकारी ग्रा. पं. खांडवी -- गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. खांडवी ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे खांडवी ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ जानेवारी १९६३ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जानेवारी १९६३ रोजी मौजे खांडवी ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलांमार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकत न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसीलदार बार्शी**

## भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर

**ICAR - National Research Centre On Pomegrante**

(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

### WALK-IN-INTERVIEW

A Walk in interview will be held on 22.06.2026 11:00 AM at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sr. no | Name of the Project | Name of Post | Number of Post |
|---|---|---|---|
| 1. | National Agriculture Innovation Fund Scheme (IPR) | Young Professional-II | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrepomegranate.icar.gov.in.

Sd/-
**DIRECTOR**

## महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

### सूचना

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांना लॉटरी पद्धतीने कामे वाटपाची योजना महापारेषण कंपनीचे परिपत्रक MSETCL/CO/TRO&M/SE-II/EE-VIII/12883 Dt-05.12.2016 अन्वये लागू केली आहे. या योजनेअंतर्गत महापारेषणमध्ये सोलापूर जिल्हा अंतर्गत नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांना स्थापत्य कामे वाटपासाठी लॉटरी दि.२२.०५.२०२६ रोजी कॉन्फरन्स हॉल, ४०० के. व्ही उपकेंद्र लांबोटी, सोलापूर येथे आयोजित केली आहे. सदरील ई-प्रकटन हे दि. १५.०५.२०२६ रोजी प्रसिद्धीस देण्यात येत असून प्रसिद्धीच्या दिनांकापासून कंपनीच्या संकेतस्थळावर व तसेच अउदा स्थापत्य बां. नि. सु. मंडळ रास्ता पेठ पुणे या कार्यालयांच्या सूचना फलकावर उपलब्ध असेल.

For further details visit our website **http://mahatranso.in**

सही/- **अधीक्षक अभियंता (स्था), (प्र)**
**अउदा स्था. बां.नि.सु.मंडळ पुणे**

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 141010647 | मालमत्तेवर कर्ज | 1. औदुंबर धोंडिराम सुतार<br>2. संगिता औदुंबर सुतार | 20/03/2026 | INR 5,63,975..35/- |
| **मालमत्तेचा पत्ता:** आल दॅट प्लेस अँड पार्कल ऑफ द प्रॉपर्टी बेअरिंग ग्रामपंचायत मिळकत नं. ३०५/१, ग्रामपंचायत राजुरी, उप दिव सांगोला, दिव सोलापूर मध्ये, सुत्तर गल्ली जवळ, सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०७, एकूण जाहिरात-मापन क्षेत्र १२०३. फूट, आणि सीमा: उत्तर: शिवाजी धोंडिबा सुतार, दक्षिण: शंकर सोपान भिसाळे, पूर्व: भीमराव आत्माराम भिसाळे, पश्चिम: काँक्रीट रोड | | | | | |
| 2 | 109333114 | मालमत्तेवर कर्ज | 1. सचिन पोपट भोसले<br>2. पोपट भगवान भोसले | 14/03/2026 | INR 6,03,838.42/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्र. २१५ चा तो संपूर्ण भूखंड आणि जागा, एकूण क्षेत्रफळ ५९५ चौ. फूट, ठिकाण: नन्नज, ग्रामपंचायत नन्नजच्या हद्दीत, तालुका: उत्तर सोलापूर, जिल्हा: सोलापूर, आणि सीमा खालीलप्रमाणे: पूर्व: रस्ता, पश्चिम: दिनेश झारेकर, दक्षिण: शहाजी गोफणे, उत्तर: राजू गवळी | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 15/05/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

## जाहीर नोटीस/प्रसिध्दीकरण

नि.न. ५

सि.एम.ए.क्र. ३७/२०२६

### बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात

पल्लवी आनंद साडेकर - वगैरे -- अर्जदार

विरुध्द

महाराष्ट्र सरकार - वगैरे २) आनंद प्रल्हाद साडेकर
रा-पांडूरंग नगर, करमाळा, जि. सोलापूर -- सामनेवाले

हिंदू मायनर ॲण्ड गाडीयनशिप ॲक्ट १९५६ चे कलम ८(२) अन्वये अज्ञानाची मालमत्ता लीजवर देण्यास परवानगी मिळण्याबाबतः-

ज्याअर्थी, वरील अर्जदार पल्लवी आनंद साडेकर, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, व अर्जदार क्र. २ पवनराज आनंद साडेकर, वय : १७ वर्ष, धंदाः शिक्षण, दोघे रा.मु. पो. पांडे, ता. करमाळा, जि. सोलापूर यांनी बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**मिळकतीचे वर्णन :-** डि व सब डि सोलापूर पैकी तालुका करमाळा येथील मौजे पांडे ग्रामपंचायत हद्दीतील गट क्र. ३३६/९/ब यांसी क्षेत्र २ हे. ०० आर यांसी पो.ख. क्षेत्र ००.२६ आर. यांसी एकूण क्षेत्र २ हे. २६ आर. यांसी आकार रु.३=४८ पैसे ही शेतजमीन अ.पा.क. अर्जदार क्र. १ यांचे अज्ञान पालक अर्जदार क्र. २ यांचे हक्काची व वहिवाटीची शेतजमीन यांसी चतुः सिमा खालीलप्रमाणेः-

पूर्वेस - गट क्र. ३३६/२ व खांबेवाडी ते पांडे रस्ता
पश्चिमेस - गट क्र.३३६/१ब चे उर्वरीत क्षेत्र
दक्षिणेस - गट क्र. ३३६/८ अ पैकी
उत्तरेस - गट क्र.३४० ते ३४४ व ३३७

येणेप्रमाणे चतुःसिमेतील दगड, माती, झाडे-झुडपे, उरळ्या वगैरे तदंगभूत वस्तूसह

(२) सदर अर्जातील अर्जदार क्र.१ ही अ.पा.क. अर्जदार क्र.२ यांची जनक माता/आई असून, सदर सामनेवाला हे अर्जदार क्र.१ चे पती व अ.पा.क अर्जदार क्र.२ याचे पिता आहेत. सदर अर्जदार क्र.१ व २ आणि सामनेवाला वरील पत्यावरील कायमचे रहिवाशी आहेत.

(३) वर कलम १ मधील मुळ मिळकत आनंद प्रल्हाद साडेकर यांना त्यांच्या वडिलांकडून वारसा पध्दतीने मिळालेली मिळकत आहे. सदरील शेतजमीनीमधून २ हे. २६. आर. इतकी जमीन ही सामनेवाला क्र.२ यांनी अर्जदार क्र.१ यांच्या नांवे फेरफार क्र.८८६६ रजि. क्र.२५००/२०१२, दि. ०६/०५/२०२२ रोजी विनामोबदला स्वखुशीने बक्षीसपत्राने अ.पाक. अर्जदार क. २ यांच्या नांवे दिलेली आहे.

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द व मालमत्तेबाब कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास /कोणाचाही बोजा, गहाण, हक्क वारसा, कोर्ट हुकूमनामा, सावकारी तथा निमसरकारी कर्ज वगैरे असल्यास अर्जदारांचे सर्व नातलग व हिसंबंधी आणि सर्वत्र लोकांस जाहीर नोटीस देण्यात येते की, त्यांनी दि. २०/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे. वर नमूद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास निकाल दिला जाईल.

आज दि. १३/०५/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्दसाठी दिला असे.

**सही/-**
**आदेशानुसार**
**प्र. अधिक्षक,**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**

## करमाळा नगर परिषद

करमाळा, जि. सोलापूर ४१३२०३

दूरध्वनी क्रमांक: (०२१८२)-२२०३१५ E-Mail-comckarmala@gmail.com
जावक क्रमांक: मिळकत विभाग/६८६/२०२६ दिनांक: १३/५/२०२६

### जाहिर फेर लिलाव प्रसिध्दीकरण

याद्वारे सर्व नागरिकांना कळविणेत येते की, करमाळा नगरपरिषद मालकीचे दुकान गाळ्यांचा जाहिर लिलाव वार- शुक्रवार, दि. २२/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. नगरपरिषदेच मिळकत विभागात आयोजित करणेत आला आहे. तरी इच्छुकांनी खाली दर्शविल्याप्रमाणे बोली बयाणा रक्कम भरुन लिलावात भाग घ्यावा, बोली रक्कमे शिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. बोली बयाणा रक्कम भरण्याची मुदत दि. २१/०५/२०२६ रोजी दुपारी ५.०० वा. पर्यंत राहील. लिलावाच्या शर्ती व अटी मिळकत विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. लिलाव मंजूर व अथवा ना मंजूर करण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता न.प.ने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | शॉपींग सेंटरचे नाव | गाळा नं. | अनामत रक्कम | लिलाव बोलीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपींग सेंटर | ५०, ५१, ५२, ५८ | ३५,०००/- | ५०००/- |
| २ | न. प. दवाखाना शॉपींग सेंटर | ३, ४, १३, १४, १५, १६, १७ | १०,०००/- | २०००/- |
| ३ | कै. दे. ना. म. जगताप शॉ. सें. | ४६ | ८१,०००/- | ५०००/- |
| ४ | जुनी न. पा. इमारत मधील खोली | ८ | ४५,०००/- | ५०००/- |

**सही/-**
**(सचिन तपसे)**
**मुख्याधिकारी,**
**करमाळा नगर परिषद**

## विक्री अधिकारी यांचे कार्यालय, बार्शी

**श्री. भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. बार्शी**
**पत्ता - ७३९/७/१७ पाटील प्लॉट निकिता हॉटेल शेजारी, कुर्डुवाडी रोड, बार्शी. जि. सोलापूर पिन - ४१३४११**
**संपर्क - ९०११६९२८५८ / ९८८१९२६२९६ / ८८०५३७५९५९**

**जा.क्र. कायदा विभाग/२९/२०२६-२७** **दिनांक ०७/०५/२०२६**

### स्थावर मालमत्ता विक्रीसाठी विक्री सुचना

**(बहुराज्यीय सहकारी संस्था नियम २००२ मधील नियम ३७ (११) व या मधील इतर तरतुदी पहा)**

बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ व नियमामधील तरतुदीनुसार कलम ९७ व नियम २ (१०) नुसार शक्ती प्रदानित विक्री अधिकाऱ्याने जप्त केलेली स्थावर मालमत्तेची विक्रीची जाहिर सूचना याद्वारे सामान्यतः जनतेला आणि विशेषतः कर्जदार / जामीनदारांना नोटीस देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सदर कायद्याअंतर्गत कलम ९७ व नियम २ (१०) नुसार शक्ती प्रदानित विक्री अधिकारी यांनी कर्जदाराकडून / जामीनदारांकडून थकबाकी रक्कमेच्या वसुलीसाठी थकबाकीदारांच्या स्वतःच्या नावाने असलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यात आला आहे. मालमत्ता जशा व जेथे आहेत तशा आणि ज्या परिस्थितीत आहेत तशा आणि ज्ञात व अज्ञात बोजासह त्याची जाहिर लिलावाने विक्री करण्यात येत आहे. खाली नमुद केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव सदर अधिनियम व त्या खालील नियमामधील अटी व शर्ती व नियमातील तरतुदीनुसार करण्यात येईल. खाली स्थावर मालमत्तेचा तपशील, लिलाव विक्रीची तारीख, वेळ व ठिकाण देण्यात येत आहे. लिलाव खालील अटी व शर्तीवर करण्यात येईल.

| कर्जदार/ जामीनदार / तारण मिळकतदार यांचे नाव पत्ता | दिनांक ०७/०५/२०२६ अखेर येणे बाकी | मिळकत क्रमांक | तारण स्थावर मालमतेचा तपशील | राखीव किंमत | लिलावाचे ठिकाण, लिलाव तारीख, लिलाव वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **श्री. विशाल रमेश मोरे,** मौजे बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | २५,७२,५३५/- | गट नं. ९८३/२/अ/पै | बिनशेती प्लॉट क्षेत्र ००.०५ हे. आर. | **रु. ३०,००,०००** | दिनांक :- १०/०६/२०२६<br>वेळ :- सकाळी ११.००<br>ठिकाण : मुख्य कार्यालय ७३९/७/१७, पाटली प्लॉट, निकिता हॉटेल शेजारी, कुर्डुवाडी रोड, बार्शी |
| **श्री. वर्धमान ज्ञानेश्वर विभुते,** मौजे - बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | रुपये २५,७२,५३५/- | नगर भूमापन क्र. ३०९/ब | निरंक | निरंक | |
| **सौ. श्वेता विशाल मोरे,** बार्शी, जि. सोलापूर | रुपये २५,७२,५३५/- | गट नं. १४०८/१/६६ | निरंक | निरंक | |
| सहदुय्यम निबंधक वर्ग - २ बार्शी यांच्या मुल्यांकन प्रमाणपत्राप्रमाणे जमिनीचा शासनदराप्रमाणे बाजार भाव दर **रु. ६,८०,०००/-** | | | | | |
| **खाजगी /संस्था नियुक्त मूल्यांकनकार** श्री. साहिल शरद खडके (B.Tech (Civil) यांनी या मालमत्तेत बाजारभावाप्रमाणे दिलेली आजची किंमत बाजारभाव दर **रु. ३०,००,०००/-** | | | | | |

बहुराज्यीय सहकारी अधिनियम २००२ व नियम ९७ नुसार विक्रीसाठी वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना गहाणखत करणार / कर्जदारांना लिलावापूर्वी पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची शेवटची संधी दिली जात आहे. तसे न झाल्यास वरील वेळापत्रकानुसार जप्त केलेली मालमत्ता विकली जाईल.

**सुचना :** सर्वांना असे ही सुचित करण्यात येते की, धनको उपरोक्त संस्थेचे विक्री अधिकारी यांनी कर्जदार व जामीनदार यांना (ज्यांच्या मालमत्ता लिलावाने विक्री करावयाच्या आहेत त्यांना) नोंदणीकृत पोष्टाने नोटीसा पाठविल्या आहेत. ज्यांना नोटीस प्राप्त झाली. त्यांनी इतर कर्जदार व जामीनदार यांना त्याची कल्पना द्यावी. त्याच प्रमाणे व्यापक प्रसिद्धी म्हणून ही नोटीस नामांकीत दैनिकामध्ये देखील प्रकाशित करण्यात येत आहे.

**अटी व शर्तीः**

१) लिलावात भाग घेणाऱ्यांना / लिलाव बोली बोलणाऱ्यांना लिलाव सुरु होण्यापूर्वी राखीव किंमतीच्या १०% अनामत रक्कम भरावी लागेल.
२) स्थावर मालमतेच्या राखीव किंमती पेक्षा कमी रक्कमेत विक्री केली जाणार नाही.
३) ज्या व्यक्तिच्या नावे लिलाव पूर्ण होईल जो व्यक्ती सर्वापेक्षा जास्त बोली बोलेल त्या व्यक्तीस लिलाव बोलीच्या २५% रक्कम लिलावाच्या नंतर त्याच दिवशी ताबडतोब भरावी लागेल किंवा बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ मधील तरतुदीनुसार कालावधी दिला जाईल, लिलाव बोलीची बाकी राहिलेली ७५% रक्कम व मुद्रांक शुल्काची रक्कम विक्री कायम केलेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत भरावी लागेल. न भरल्यास खरेदीदाराने भरणा केलेली २५% रक्कम व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच अशा परिस्थितीत खरेदीदाराचा संबंधित मालमतेवर कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.
४) लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना स्थावर मालमत्तेची पाहणी संस्थेच्या कामकाजाच्या दिवशी आठवड्यातून दोन दिवस मंगळवार व बुधवार या दिवशी दुपारी ३ ते ४ च्या वेळेत करता येईल, त्याकरिता आमच्या शाखेचे शाखाधिकारी श्री. सूरज उत्तरेश्वर कुंभारे, मो.नं. ९८८१९२६२९६, ८८०५३७५९५९ यांच्याशी संपर्क साधावा.
५) कोणतीही पूर्व सूचना न देता, लिलाव, विक्री स्थगित व रद्द करण्याचे अधिकार, विक्री अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
६) वरील मालमत्तेवरील शेतसारा, नगर परिषद कर, लोकल कर, लाईट बिल व इतर कराची जबाबदारी खरेदीदारावर राहील.
७) स्थावर मालमतेची विक्री '**जेथे आहे, जशी आहे, जशा परिस्थितीत आहे तशी**' या तत्वावर करण्यात येणार आहे. जर या मालमतेवर काही बोजा असेल तर त्यासह ही विक्री करण्यात येईल.
८) यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्रीचा व्यवहार कर्ज देणाऱ्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या अनुमतीनंतर पूर्ण केला जाईल.
९) लिलाव प्रसंगी मोबाईल वापरण्यास प्रतिबंध राहील, तसेच बयाणा रक्कम भरलेल्या भागधारकांनाच प्रवेश देण्यात येईल. नियमाचे उल्लंघन, आर्थिक क्षमता, लिलावाच्या वेळी गोंधळ घालणे, सार्वजनिक शांततेचा भंग करणे इ. कारणास्तव कोणत्याहीक्षणी लिलाव तहकूब करण्याचा अधिकार **विक्री अधिकारी** यांनी राखून ठेवला आहे.

**बहुराज्यीय सहकारी कायदा २००२ अंतर्गत वैधानिक सुचना :-**

कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे अशी ही संधी देण्यात येते की, त्यांनी उपरोक्त संस्थेची एकूण थकबाकी लिलावाची बोली बोलण्यापूर्वी अदा करावी. त्यात ते अयशस्वी झाल्यास तसेच थकबाकीच्या वसुलीसाठी विक्रीच्या रक्कमेतून वसुल न झाल्यास शिल्लक रक्कम जर असेल तर कर्जदार / जामीनदार यांच्याकडून शिल्लक पूर्ण येणे बाकी व पुढील व्याज आणि खर्चासह वसुल केली जाईल, याची नोंद घ्यावी.

**टिपः-** अधिक माहितीसाठी विक्री अधिकारी **श्री. नवनाथ गुणवंत भोसले** मो. नं. ९०११६९२८५८ / ९८८१९२६२९६
**पत्ता :** मुख्य कार्यालय, ७३९/७/१७, पाटील प्लॉट, निकिता हॉटेल शेजारी, कुईवाडी रोड, बार्शी. जि. सोलापूर. पिन - ४१३४११ यांच्याशी संपर्क करावा.

**दिनांक : ०७/०५/२०२६**
**ठिकाण :- बार्शी**

शिक्का

**सही/-**
**विक्री अधिकारी**
**(कलम - ९७ मधील तरतूदी प्रमाणे नियुक्त)**
**श्री. भगवंत मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि, बार्शी**




## महत्त्वाचे

### खाशाबा जाधवांना पद्मविभूषण द्या; प्रस्ताव सादर

**मुंबई** : भारतासाठी पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक जिंकणाऱ्या कुस्तीपटू खाशाबा दादासाहेब जाधव यांना मरणोत्तर पद्मविभूषण सन्मान बहाल केला जावा, अशा आशयाचा प्रस्ताव याआधीच पाठविण्यात आला आहे, अशी माहिती महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात आली. शासनाने उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाला गेल्या आठवड्यात सांगितले की, ३१ जुलै रोजी नामांकन दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या खूप आधीच 'पद्म पुरस्कार २०२७'साठी एक नवीन प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. भारतासाठी पहिले ऑलिम्पिक पदक जिंकणाऱ्या खाशाबा जाधव यांना मरणोत्तर पद्मविभूषण बहाल केले जाणार आहे की नाही, अशा प्रश्न न्या. माधव जामदार व प्रवीण पाटील यांच्या खंडपीठाने गेल्या महिन्यात केंद्र आणि राज्य सरकारला विचारला होता. न्यायालयाने ७ मे रोजी राज्य सरकारचे मत नोंदवून घेतले असून पुढील सुनावणीसाठी ३० जून तारीख ठरविण्यात आली आहे. न्यायालयात खाशाबाचे पुत्र रणजित जाधव यांनी 'कुस्तीवीर खाशाबा जाधव फाऊंडेशन'च्या वतीने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर ही सुनावणी सुरू आहे. खाशाबा जाधव यांनी १९५२ साली हेलसिंकी ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.

### बुद्धिबळ : प्रज्ञानानंदची पहिली लढत फिरोजाविरुद्ध

**बुकारेस्ट** : भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानानंद याची सुपर बुद्धिबळ क्लासिक स्पर्धेतील पहिल्या फेरीची लढत फ्रान्सच्या अलीरजा फिरोजाविरुद्ध होणार आहे. ग्रॅण्ड बुद्धिबळ टूरची या वर्षीची ही पहिलीच क्लासिक स्पर्धा आहे. विश्वविजेता डी. गुकेश याने क्लासिक प्रकारच्या स्पर्धेतून आपले नाव परत घेतल्यामुळे या स्पर्धेत आता प्रज्ञानानंद हा एकमेव भारतीय खेळाडू शिल्लक राहिला आहे. दहा खेळाडूंच्या या स्पर्धेत नऊ फेऱ्यांमध्ये प्रज्ञानानंद याला पाच फेऱ्यांमध्ये पांढऱ्या सोंगट्यांसह खेळण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेची एकूण बक्षीस राशी ३५ लाख डॉलर असून १ लाख २५ हजार डॉलर बोनस राहणार आहे. स्पर्धेतील पहिला पुरस्कार १ लाख डॉलर आहे. स्पर्धेत अमेरिकेचा फॅबियानो कारुआना याला अग्रमानांकन प्राप्त झाले असून त्याची पहिली लढत हॉलंडच्या जॉर्डन वान फोरिस्टविरुद्ध होणार आहे. गुकेशने नाव मागे घेतल्यामुळे त्याच्या जागी विश्व अजिंक्यपद स्पर्धेतील त्याचा चॅलेंजर उझबेकिस्तानचा जावोखिर सिंडारोव याला स्थान देण्यात आले आहे. त्याची पहिली लढत रुमानियाच्या डीक बोगडेन डॅनियलविरुद्ध होईल.

### ज्युनियर हॉकी संघाच्या प्रशिक्षकपदी श्रीजेशच्या जागी सोयेज

**नवी दिल्ली** : फ्रान्सचे फ्रेडरिक सोयेज यांची भारतीय ज्युनियर पुरुष हॉकी संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दोन वेळेचा ऑलिम्पिक पदक विजेता पी. आर. श्रीजेशच्या जागी ही नवी नियुक्ती झाली आहे. माजी स्टार गोलरक्षक श्रीजेशचा करार गेल्या वर्षी चेन्नई आणि मदुराई येथे झालेल्या एफआयएच ज्युनियर विश्वचषक स्पर्धेत भारताने कांस्यपदक जिंकल्यानंतर समाप्त झाला होता. हॉकी इंडियाने त्याच्या कराराचे नूतनीकरण केलेले नाही. माझ्या कार्यकाळात पाच स्पर्धांमध्ये सहभागी होत भारतीय संघाने पाच पदके प्राप्त केल्यानंतरही माझा करार वाढविण्यात आला नाही, अशा शब्दात श्रीजेशने आपली निराशा सोशल मीडियावर व्यक्त केली आहे. दुसरीकडे, हा निर्णय २०३६ साली भारताच्या ऑलिम्पिक यजमानपदाच्या दृष्टीने भारताच्या महत्त्वाकांक्षेच्या अनुरूप एक स्थिर आणि उच्चस्तरीय कामगिरीची इकोसिस्टिम लावण्याच्या दीर्घकालीन दृष्टिकोनातून घेतलेला आहे, असे हॉकी इंडियाने म्हटले आहे. युरोपियन हॉकीमधील एक उत्कृष्ट हॉकी प्रशिक्षक म्हणून ओळख असलेले सोयेज यांच्याकडे प्रशिक्षकाचा १५ वर्षांचा मोठा अनुभव आहे. १९९५ ते २०१० या कार्यकाळात त्यांनी फ्रान्स संघाचे प्रतिनिधित्व करताना १९६ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १९५ गोल केले होते. त्यानंतर त्यांनी फ्रान्स आणि स्पेनचे प्रशिक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली होती.

### ४८ ॲथ्लेट्सचे भारतीय पथक आशियाई स्पर्धेत खेळणार

**नवी दिल्ली** : लांब उडीचा प्रतिभावान खेळाडू शाहनवाज खान याचा २८ मे पासून हाँगकाँग येथे होणाऱ्या २० वर्षे गट आशियाई ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होणाऱ्या ४८ सदस्यीय भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. देशांतर्गत आयोजित विविध स्पर्धांतील कामगिरीच्या आधारे भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाने या संघातील खेळाडूंची निवड केली आहे. शाहनवाजच्या नावे २० वर्षे गटातील ८.२३ मीटर लांब उडीचा राष्ट्रीय विक्रम नोंदला गेला आहे. मोहम्मद अशफाक (४०० मीटर आणि रिले), नितीन गुप्ता (५ हजार मीटर दौड) आणि पूजा (उंच उडी) या देशातील अव्वल व नावाजलेल्या खेळाडूंचाही या पथकात समावेश करण्यात आला आहे.

# चेन्नईसमोर प्लेऑफचे लक्ष्य

## आज लखनौविरुद्ध महत्त्वपूर्ण लढत

**आजचा सामना**

**लखनौ सुपर जायंट्स**
**वि. चेन्नई सुपर किंग्ज**
**स्थळ** : भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी इकाना क्रिकेट स्टेडियम, लखनौ
**वेळ** : सायं. ७.३० वाजता
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

◆ **लखनौ, १४ मे**

कामगिरी फारशी प्रभावी होत नसतानाही चेन्नई सुपर किंग्जच्या प्लेऑफच्या आशा अजूनही कायम आहेत. उद्या येथील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी इकाना क्रिकेट स्टेडियमवर होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेतील साखळी सामन्यात यजमान लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध झुंज देताना चेन्नईसमोर प्लेऑफचे लक्ष्य राहणार आहे. प्लेऑफच्या शर्यतीतून आधीच बाद झालेल्या लखनौ संघासाठी हा सामना केवळ एक औपचारिकता राहणार आहे. मात्र, याउलट चेन्नईसाठी ही एक प्रतिष्ठेची लढत ठरणार आहे. हा सामना जिंकला तर चेन्नईचे स्पर्धेतील आव्हान कायम राहणार आहे. अन्यथा लखनौपाठोपाठ चेन्नईलाही स्पर्धेतून बाद व्हावे लागेल.

स्पर्धेतील दुसऱ्या टप्प्यात चेन्नईने वेळोवेळी सामने जिंकल्यामुळे त्यांची स्पर्धेतील घोडदौड कायम आहे. मात्र, गचाळ कामगिरीमुळे लखनौच्या आशा मावळल्या आहेत. पुढील फेरीच्या प्रवेशाच्या शर्यतीत कायम राहण्यासाठी चेन्नईला आता आपले उर्वरित सर्व सामने जिंकावे तर लागतीलच शिवाय इतर सामन्यांच्या निकालांकडेही लक्ष ठेवावे लागेल. चेन्नई संघ आतापर्यंत झालेल्या ११ सामन्यांपैकी सहा सामने जिंकून गुणतालिकेत पाचव्या स्थानी आहे. सामन्याच्या शेवटाला अपेक्षित चांगली कामगिरी होत नसल्यामुळे पाच वेळेचा विजेता चेन्नई संघ सध्या टीकाकारांचे लक्ष्य ठरला आहे. तरीही या संघाने संजू सॅमसन, उर्विल पटेल, कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि काही उदयोन्मुख खेळाडूंच्या चांगल्या कामगिरीच्या जोरावर स्पर्धेतील आव्हान कायम राखण्यात यश मिळविले आहे. उर्विलच्या आघाडीच्या फळीतील कामगिरीमुळे चेन्नईला पॉवरप्लेमध्ये चांगल्या धावा गोळा करता आल्या असल्यातरी शिवम दुबे, कार्तिक शर्मा व डेवाल्ड ब्रेविस यांना शुक्रवारच्या सामन्यात मधल्या फळीत चांगली फलंदाजी करावी लागणार आहे. पायाला झालेल्या दुखापतीमुळे अष्टपैलू जॅमी ओवर्टन स्पर्धेबाहेर झाल्यामुळे चेन्नईची गोलंदाजी थोडी कमजोरी झालेली दिसून येते. दहा सामन्यांत १४ फलंदाज बाद केल्यामुळे ओवर्टनवर चेन्नई संघाच्या गोलंदाजीची धुरा होती. अकील हुसेन, मुकेश चौधरी, अंशुल कम्बोज आणि अफगाणिस्तानचा फिरकीपटू नूर अहमद प्रभावी गोलंदाजी करीत आहेत.

दुसरीकडे लखनौचा कर्णधार ऋषभ पंत सूर गवसण्यासाठी धडपड करीत असून त्याला अद्याप सूर गवसलेला नाही, त्याचा फटका संघाला सहन करावा लागत आहे. त्याचे गोलंदाजही प्रतिस्पर्धी संघाच्या फलंदाजांवर दबाव टाकण्यात यशस्वी झालेले नाही. पहिल्या टप्प्यातील साखळी सामन्यात लखनौला चेन्नईकडून २०३ धावांच्या मोठ्या फरकाने मात खावी लागली होती. जोश इंगलिस, निकोलस पूरन आणि मिचेल मार्श यांनाही चांगल्या कामगिरीचे सातत्य राखता आले नाही. त्यांनी टप्प्याटप्प्यात चांगली कामगिरी केली आहे. मात्र, सांघिक खेळाचे प्रदर्शन न केल्यामुळे त्याचे नुकसान लखनौ संघाला भोगावे लागले आहे. (वृत्तसंस्था)

# शून्यावर बाद झाल्याने निराश होतो, शतकाने समाधान : विराट

◆ **रायपूर, १४ मे**

इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेतील आधीच्या दोन सामन्यांत शून्यावर बाद झाल्यामुळे मी थोडा निराश झालो होतो. त्यामुळे मी थोडा अस्वस्थही होतो. चांगल्या कामगिरीचे माझ्यावर दडपण होते, अशातच मला शतकी धावा काढता आल्यामुळे मी आता समाधानी आहे, अशी प्रतिक्रिया भारताचा सुपरस्टार फलंदाज विराट कोहली याने व्यक्त केली. ३७ वर्षीय कोहलीने काल बुधवारी कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळताना ६० चेंडूंमध्ये नाबाद १०५ धावांची फलंदाजी केली. सहा फलंदाज राखून मिळालेल्या या विजयामुळे बंगळुरूचा संघ आयपीएलच्या गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचला आहे. कोहलीचे आयपीएलमधील हे नववे शतक ठरले. कोहली हा महेंद्रसिंह धोनी आणि रोहित शर्मा (२७९) यांना मागे टाकून सर्वाधिक आयपीएल सामने खेळणारा खेळाडूही ठरला आहे. प्लेअर ऑफ द मॅच ठरलेला कोहली सामन्यानंतर बोलताना म्हणाला की, आधीच्या दोन सामन्यांमध्ये शून्यावर बाद झाल्यामुळे मी काहीसा निराश झाला होतो. मात्र, मला माहीत होते की मी चांगले खेळू शकतो, जास्तीत जास्त धावा काढू शकतो. जेव्हा आपण धावा काढू शकत नाही, आपल्या संघासाठी काही योगदान देऊ शकत नाही, अशा परिस्थिती अस्वस्थ होणे स्वाभाविक आहे. संघासाठी भरीव कामगिरी करावी, यावर माझा जोर राहिलेला आहे. मी सातत्याने चांगली कामगिरी पार पाडण्याचा प्रयत्न करीत असतो, जेणेकरून आपल्या सर्वोत्कृष्ट संघासाठी काही तरी देऊ शकू.

शून्यावर बाद झाल्यामुळे मी निराश झालो होतो, हे मान्य करून कोहली म्हणाला की, नैराश्यही कधी कधी तुमच्या चांगल्या कामगिरीसाठी प्रोत्साहन ठरू शकते. शतक काढल्यानंतर जल्लोष जास्त मोठा नव्हता. कारण, आम्हाला गुणांची किंमत कळते. आम्ही सर्वजण संघासाठी खेळायला प्राधान्य देतो. दबाव चांगली बाब असते, त्यामुळे तुम्हाला चांगला खेळ खेळण्यासाठी मदत होत असते, असेही कोहली म्हणाला. (वृत्तसंस्था)



विराट कोहलीच्या नाबाद १०५ धावांच्या जोरावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने बुधवारी रायपूर येथे झालेल्या आयपीएल क्रिकेटच्या साखळी सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा सहा गडी आणि पाच चेंडू राखून पराभव केला. विराटने ६० चेंडूंची फलंदाजी करताना ११ चौकार हाणले आणि तीन षटकार ठोकले.

# तिरंगी स्पर्धेसाठी भारतीय अ संघात वैभव सूर्यवंशीला संधी

◆ **नवी दिल्ली, १४ मे**

श्रीलंकेत येत्या जून महिन्यात होणाऱ्या एकदिवसीय सामन्यांच्या तिरंगी क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भारत अ संघाची घोषणा केली असून या संघाच्या नेतृत्वाची धुरा तिलक वर्माकडे सोपविण्यात आली आहे. या १५ सदस्यीय संघात युवा खेळाडू वैभव सूर्यवंशीलाही संधी देण्यात आली आहे.

रियान पराग या संघाचा उपकर्णधार असणार आहे. १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीसह पंजाब किंग्जचा आक्रमक फलंदाज प्रियांश आचार्य याचाही या संघात समावेश करण्यात आला आहे. या तिरंगी स्पर्धेत भारतासह यजमान श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांचेही अ संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा दंबुला येथे खेळली जाणार आहे. या स्पर्धेनंतर भारत अ आणि श्रीलंका अ संघात मालिका खेळली जाईल. गॅले येथे होणाऱ्या या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा नंतर केली जाईल. मंडळाने जाहीर केलेल्या संघात देशांतर्गत क्रिकेट आणि आयपीएल २०२६ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या युवा क्रिकेटपटूंचा समावेश करण्यात आला आहे. प्रभसिमरन सिंग आणि कुमार कुशाग्र यांची यष्टिरक्षक म्हणून निवड केली गेली आहे. (वृत्तसंस्था)

# ४५ वर्षीय व्हीनस फ्रेंच ओपनमध्ये खेळणार

◆ **पॅरिस, १४ मे**

अमेरिकेचे एकेकाळची दिग्गज टेनिसपटू व्हीनस विल्यम्स पुन्हा एकदा ग्रॅण्डस्लॅम स्पर्धेत खेळताना दिसणार आहे. ४५ वर्षीय ही टेनिसपटू लवकरच सुरू होणाऱ्या फ्रेंच ओपन स्पर्धेच्या निमित्ताने लाल मातीच्या टेनिस कोर्टवर खेळताना दिसणार आहे. स्पर्धेत ती महिला दुहेरीत भाग घेणार आहे. तिच्यापेक्षा २१ वर्षांनी लहान असलेल्या अमेरिकेच्या हेली बॅप्टिस्टसोबत ती जोडी करून खेळणार आहे. फ्रेंच ओपन स्पर्धेच्या आयोजकांनी महिला दुहेरी स्पर्धेसाठी टेनिसपटूंची यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये व्हीनस आणि हेली यांच्या जोडीचा समावेश आहे. रोलॅण्ड गॅरोसवरील ही प्रतिष्ठेची क्ले कोर्ट स्पर्धा २४ मे पासून सुरू होत आहे. दुहेरीत सहभाग नोंदविणारी व्हीनस एकेरीत मात्र खेळणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. (वृत्तसंस्था)

# बार्शीत उद्या भगवंत श्री शरीरसौष्ठव स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे -**

सोलापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशनच्या वतीने आणि बार्शी शहर व तालुका मध्यवर्ती छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती व शिवराज सेना यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी येथे भगवंत श्री शरीर सौष्ठव स्पर्धा शनिवार, १६ मे रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

ही स्पर्धा सोलापूर, धाराशिव, लातूर जिल्हा मर्यादित असून, ५५, ६०, ६५, ७०, ७५ आणि ७५ किलोवरील अशा सहा वेगवेगळ्या वजनी गटांत होईल. प्रत्येक गटातील पहिल्या चार विजेत्या खेळाडूंना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येईल. या स्पर्धेसाठी एकूण ७५ हजार रुपयांची रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. तसेच, मुख्य भगवंत श्री २०२५ हा किताब पटकावणाऱ्या खेळाडूला ११ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले जाणार आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना एका बाजूचा एसटी प्रवास खर्च दिला जाईल, तसेच त्यांच्या रात्रीच्या भोजनाचीही सोय करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या यशस्वी नियोजनासाठी ॲड. हर्षवर्धन पाटील परिश्रम घेत आहेत. अधिक माहितीसाठी प्रमोद काटे (९४२२३८००३३) अथवा नझीर शेख (९३२५२३८६१८) अशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे यांनी केले आहे.

# केंद्र सरकारच्या मान्यतेने 'खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया' अधिकृत

## खो-खोला सरकारी शिक्कामोर्तब!

## अनधिकृत खो-खो संघटनांना जबरदस्त दणका

**नवी दिल्ली/मुंबई, दि. १४ मे-**

'खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया' ही भारतातील मान्यताप्राप्त, अधिकृत व भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाकडे वर्षोनुवर्ष नोंदणीकृत असलेली क्रीडा संस्था आहे. पण काही अनधिकृत व नियमबाह्य कार्य करणाऱ्या व खेळाडूंचे नुकसान करणाऱ्या व्यक्तींकडून मूळ खो-खो संघटना अनधिकृत असल्याचा अपप्रचार केला जात होता व त्याला ही मोठी चपराक असल्याचे महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी व्यक्त आहे.

भारतीय खो-खो क्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या अधिकृततेच्या संघर्षावर अखेर केंद्र सरकारने निर्णायक शिक्कामोर्तब केले असून, 'खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया' (केकेएफआय) हीच देशातील अधिकृत राष्ट्रीय खो-खो संघटना असल्याचे स्पष्ट झाले आहे. युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने २०२६ वर्षासाठी केकेएफआयला अधिकृत मान्यता बहाल करताच देशभरातील अनधिकृत संघटनांचे धाबे दणाणले आहेत. या निर्णयामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील खो-खो क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, आता पारंपारिक महाराष्ट्र खो-खो असोसिएशन हीच राज्यातील अधिकृत संस्था असल्याचेही अधोरेखित झाले आहे.

**केंद्र सरकारचा अधिकृत निर्णय**

भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने जारी केलेल्या अधिकृत पत्रानुसार, 'खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया' यांनी केलेल्या अर्जाला सक्षम प्राधिकाऱ्यांनी मंजुरी देत २०२६ वर्षासाठी वार्षिक मान्यतेचे नूतनीकरण केले आहे. मंत्रालयाच्या या निर्णयामुळे केकेएफआय आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या राज्य संघटनांनाच अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे.

**३१ डिसेंबर २०२६ पर्यंत फेडरेशनला मान्यता वैध**

क्रीडा मंत्रालयाच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, ही मान्यता ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वैध राहणार आहे. तसेच ही मान्यता दरवर्षी नूतनीकरण करून घ्यावी लागते. त्याप्रमाणे या वर्षी सुध्दा हि मान्यता खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाला मिळाली आहे. तसेच न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणांच्या अंतिम निकालाच्या अधीन राहून ही मान्यता लागू असेल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे केकेएफआयची अधिकृतता अबाधित असल्याचे निश्चित झाले आहे.

**अनधिकृत संघटनांना मोठा झटका**

गेल्या काही काळात महाराष्ट्रासह देशभरात काही अनधिकृत खो-खो संघटना सक्रिय झाल्या होत्या. यांच्याकडून अधिकृत दर्शवत केकेएफआय आणि संलग्न संघटनांबाबत संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, केंद्र सरकारच्या या पत्रामुळे अशा दिशाभूल करणाऱ्या संघटनांना मोठा धक्का बसला आहे. खो-खो क्षेत्रातील अनेक खेळाडू, प्रशिक्षक आणि पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

**खेळाडूंना मिळणार मोठा दिलासा**

या पत्राची प्रत भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई), रेल्वे बोर्ड आणि इतर संबंधित विभागांनाही पाठवण्यात आली आहे. त्यामुळे अधिकृत स्पर्धांचे आयोजन, खेळाडूंना मिळणाऱ्या सवलती, शासकीय मान्यता, नोकरीतील लाभ आणि राष्ट्रीय स्तरावरील संधी याबाबतचा संभ्रम दूर होणार आहे. अधिकृत संघटनांमार्फत खेळणाऱ्या खेळाडूंना आता अधिक सुरक्षित आणि पारदर्शक वातावरण मिळणार आहे.



**महाराष्ट्र खो-खो असोसिएशनलाच अधिकृत मान्यता**

केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रात महाराष्ट्र खो-खो असोसिएशन हीच अधिकृत राज्य संघटना असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. त्यामुळे राज्यातील जिल्हा संघटना, खेळाडू, प्रशिक्षक आणि आयोजकांनी अधिकृत संघटनेच्या माध्यमातूनच कामकाज करण्याचे आवाहन महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी केले आहे. यापुढे अनधिकृत खो-खो संघटनेत काम करणाऱ्या प्रशिक्षक/कार्यकर्त्यांवर कडक कारवाई करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे.

**खो-खो क्षेत्रात पारदर्शकतेची नवी सुरुवात**

या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतीय खो-खो क्षेत्रात पारदर्शकता, शिस्त आणि अधिकृततेचा नवा अध्याय सुरू झाला आहे. खऱ्या खेळाडूंना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, भविष्यातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठीही अधिकृत संघटनांचे महत्त्व अधिक बळकट झाले आहे. केंद्र सरकारच्या या भूमिकेमुळे खो-खो खेळाला संघटनात्मक स्थैर्य मिळाल्याची भावना खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल, सरचिटणीस उपकार सिंह व खजिनदार गोविंद शर्मा यांनी स्पष्ट केले आहे.

# मुंबई, लातूरची विजयी घोडदौड सुरू

## छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा : अटीतटीच्या लढतीत पुण्याची नाशिकवर मात

**तभा वृत्तसेवा,**
**बदलापूर, दि. १४ मे-**

छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत यजमान मुंबईसह कोल्हापूर, लातूरच्या संघानी अपेक्षेप्रमाणे विजयी सलामी दिली. १८ वर्षांखालील मुलांच्या गटात पुणे संघाने नाशिक विरूध्द चिवट झुंज देत विजय खेचून आणले. पुण्याच्या मुलींच्या दोन्ही संघाने चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवित दिवस गाजवला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा बदलापूर जिमखाना मैदानावर रंगली आहे. कडक उन्हामुळे संध्याकाळी विघुतप्रकाश झोतात रंगलेल्या या स्पर्धेचा पहिला दिवस पुणे संघाने गाजविला. पुणे संघाच्या मुलींच्या दोन्ही संघाने विजयश्री प्राप्त केली. १८ वर्षांखालील मुलांच्या गटातील अटीतटीच्या लढतीत पुणे संघाने नाशिकचा २५-२०, २५-२१ गुणांनी पराभव करून गटात अव्वल स्थानावर झेप घेतली आहे. साखळी पध्दतीने १८ व २१ वर्षांच्या मुला-मुलींच्या स्पर्धेत दोन गटात स्पर्धा सुरू रंगली आहे. २१ वर्षांखालील मुलांच्या गटात यजमान मुंबईने नाशिकला २५/१०,२५/१२ गुणांनी नमवले. सामन्यात मुंबई संघाने सुरूवातीपासून आपली पकड कायम राखत विजयी वाटचाल सुरू केली आहे. या गटातील दुसऱ्या साखळी लढतीत लातूरने कोल्हापूरवर २५/१५,२५/१० गुणांनी मात करीत विजयाचा झेंडा रोवला. १८ वर्षांखालील मुलींच्या गटातही लातूरने नाशिकचा २५/६,२५/११ गुणांनी धुव्वा उडवित मैदान गाजवले. मुलांच्या १८ वर्षांखालील गटातील पुणे विरूध्द नाशिक ही लढत शेवटच्या मिनिटापर्यंत चुरशीची झाली. सुरूवातीपासून पुणे संघाने आक्रमक खेळ करीत आघाडी घेतली. पुण्याचा कर्णधार अनुज जोशीने मध्यरेषेवरून खेळताना जोरदार स्मॅशेस मारून गुणांची खाते उघडले. पाठोपाठ ओम झगडेने जोरदार प्रतिकार करीत तर स्वानंद राजोपाध्येने सुरेख पास करीत सामन्यावर वर्चस्व कायम राखले. नाशिक संघाने चिवट झुंज दुसऱ्या सेटमध्येही अपुरी ठरली. पुणे संघाच्या मुलींनी १८ व २१ वर्षांखालील दोन्ही गटातील लढती जिंकून आपली विजयाची दावदारी दाखवली. २१ वर्षांखालील गटात पुणे संघाने लातूरवर २५/११,२५/१६ गुणांनी सहज मात केली. १८ वर्षांखालील गटात गटात पुणे संघाने संभाजीनगरवर २५/८,२५/१० गुणांनी एकतर्फी विजय संपादन केला.



बदलापूर : लातूर विरुद्ध कोल्हापूर या २१ वर्षांखालील मुलांच्या सामन्यातील टिपलेला क्षण

**खेळाडूंसाठी चक्क रिसोर्टमध्ये निवासव्यवस्था**

शासकीय स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच सर्व खेळाडूंची निवासव्यवस्था ही चक्क रिसार्टमध्ये करण्यात आली आहे. बदलापूरमधील सर्वच रिसोर्ट व्हॉलीबॉल स्पर्धेमुळे बुक झाले आहे. प्रथमच उत्तम दर्जाची निवास व्यवस्थेमुळे खेळाडू बदलापूरच्या पाहुणचाराचे कौतुक करीत आहेत. क्रीडा व युवक सेवा संचालनालय व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद हे एकत्रितपणे हा रिसार्टसाठी खर्च करणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर आरामदायी निवास व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे.

**डिजीटल वॉटर बॉटलने भारावले खेळाडू**

बदलापूरमधील राज्य व्हॉलीबॉल स्पर्धातील सहभागी सर्व ३२ संघाच्या ३८४ खेळाडूंनी स्मरणीय भेटवस्तू देत स्वागत करण्यात आले. डिजीटल डिजीटल वॉटर बॉटलसह सॅक, कॅम आणि ओआरएसची पाकिटे खेळाडूंना देण्यात आली. तापमान दर्शविणाऱ्या डिजीटल वॉटर बॉटलने खेळाडू भारावून गेले होते. प्रथमच तापमान दर्शविणारी पाण्याची बाटली खेळाडूंच्या हाती आली होती. भर उन्हाळ्यात बदलापूरचे तापमान किती हे क्षणात खेळाडूंना समजून आले. तसेच उन्हापासून सरंक्षण होण्यासाठी ओआरएसची पाकिटे दिल्याने खेळाडू खुश असल्याचे दिसून येत होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### सांगोल्यात श्री शनैश्वर जयंती उत्सवाचे आयोजन



**सांगोला, दि. १४ मे -**
शनैश्वर युवक संघटना, शनिगल्ली, सांगोला यांच्यावतीने शनिवार दि.१६ मे रोजी श्री शनैश्वर जयंती उत्सव २०२६ चे आयोजन केले आहे. त्यानिमित्त गुरुवार दि.१४ व शुक्रवार दि.१५ मे रोजी दुपारी ४ वा. विविध भजनी मंडळांची सेवा तसेच शनिवार दि.१६ मे रोजी सकाळी १० वा. हभप.श्रीपाद वांगीकर यांचे किर्तन, दुपारी १२ वा. पुष्पवृष्टी व त्यानंतर महाप्रसाद आदी कार्यक्रमाचे आयोजन श्री शनैश्वर मंदिर, शनिगल्ली, सांगोला येथे केले आहे. सांगोला तालुक्यातील सर्व भाविक व शनैश्वर भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन शनैश्वर युवक संघटनेने केले आहे.

### अर्वाच्य भाषा वापरल्याप्रकरणी महिला कर्मचाऱ्याला नोटीस

**मंगळवेढा, दि. १४ मे -**
मंगळवेढा येथील भूमिअभिलेख कार्यालयातील एका महिला कर्मचाऱ्यास कामानिमित्त आलेल्या एका पक्षाच्या पदाधिकाऱ्यास अर्वाच्य भाषेत बोलल्याबद्दल कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागण्यात आला आहे. भूमी अधिक्षक विद्या तांगडे यांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आशा मेटकरी या कामानिमित्त भूमी अभिलेख कार्यालयात गेल्या होत्या. यावेळी महिला कर्मचारी उमा कुंभार (दप्तरबंद) यांनी अरेरावी व अर्वाच्च भाषा वापरली. मेटकरी यांनी याबाबत लेखी तक्रार भूमी उपअधिक्षक विद्या तांगडे यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी महिला कर्मचाऱ्यास कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागवला होता. खुलासा वेळेत व समाधानकारक प्राप्त न झाल्यास शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असेही आदेशात नमूद केले आहे.



### शिवाजी महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून आंदोलन

**बार्शी, दि. १४ मे-**
राज्य शासनाकडे असलेल्या प्रलंबित मागण्यासाठी येथील शिवाजी महाविद्यालयाच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून निषेध आंदोलन केले. महाराष्ट्र राज्य विद्यापीठे व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या निर्णयानुसार दिनांक १४ मे पासून टप्प्याटप्प्याने आंदोलन कार्यक्रम राबवित आहे. त्यामध्ये निषेध नोंदविणे, काळ्या फिती लावून काम करणे, कामबंद इत्यादी उपाययोजनांचा समावेश राहील. गुरुवारी या आंदोलनाच्या वेळी कर्मचारी संघटनेचे जिल्हा सचिव भीम मस्के, जिल्हा कार्यकारणी सदस्य शरद मस्के, महाविद्यालय कर्मचारी हनुमंत घावटे, शहाजी महाडिक, सचिन मोरे, दिनेश स्वामी, मोहन जाधव, आनंद देशमुख, शिवाजी हाके, उत्तरेश्वर राऊत, विक्रांत काकडे, गणेश फपाळ, सुनिता शिंदे व कैलास चव्हाण आदी उपस्थित होते. त्यांनी काळ्या फिती लावून घोषणा देऊन राज्य शासनाविरुद्ध निषेध आंदोलन केले.

### अरविंद संमोहनशास्त्र मंडळातर्फे आज हिप्नॉटिझम कार्यक्रम

**सोलापूर, दि. १४ मे-**
येथील अरविंद संमोहनशास्त्र मंडळातर्फे शुक्रवार, दि. १५ मे रोजी सायंकाळी सहा वाजता रंगभवननजीकच्या समाजकल्याण हॉलमध्ये हिप्नॉटिझम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष ॲड.हेमंतकुमार माळी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी चेअरमन संचालक ड.मिलिंद थोबडे, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव, सुर्या हॉटेलचे संचालक मनिष सुरवसे तसेच ॲड. व्ही. एस. आळंगे होणार आहे. याशिवाय, शनिवार दि. १६ मे रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत स्वसंमोहन (सेल्फ-हिप्नोसिस) शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, इच्छुक नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक रविंद्र जोगीपेठकर यांनी केले आहे.

## निधन वृत्त...

### पांडुरंग कदम



**वेळापूर, दि. १४ मे-**
उघडेवाडी ता. माळशिरस गावचे माजी सरपंच, सहकारमहर्षी कारखान्याचे माजी संचालक व सुरभी पतसंस्थेचे संचालक पांडुरंग भगवान कदम यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. ते इंग्लिश स्कूल वेळापूरचे क्रीडाशिक्षक सतीश कदम यांचे वडील होत.

### शाम गंभीरे



**सोलापूर, दि. १४ मे-**
माशाळ वस्ती येथील सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शाम गंभीरे अण्णा यांचे १४ मे रोजी १२.२० वाजता निधन झाले. . त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. होणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### अकेला जमादार



**सोलापूर, दि. १४ मे-**
बुऱ्हाणपूर (ता. अक्कलकोट) येथील अकेला निसार जमादार (वय ७०) यांचे निधन झाले. त्यांच्यामागे एक मुलगा, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. पोलिस बॉईज संघटनेचे गौश जमादार यांच्या त्या मातोश्री होत.

### विष्णू गरड



**मोहोळ, दि.१४ मे-**
येथील विष्णू महादेव गरड( वय ८९ ) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली,सूना, नातवंडे असा परिवार आहे. महाराष्ट्र प्रदेश एनएसयूआयचे माजी उपाध्यक्ष यशवंत सुरवसे यांचे ते सासरे होत.

# वाखरी ते देगाव या नवीन ४-पदरी रिंग रस्त्याला मंजूरी

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची मोठी घोषणा

- पंढरपूरची वाहतूक कोंडीतून सुटका
- मा.आ. प्रशांत परिचारक यांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ मे -**
वाखरी-कोर्टी-लक्ष्मीटाकळी-कासेगाव-अनवली-मुंढेवाडी ते देगाव या नवीन ४-पदरी बाह्यवळण रस्त्याला केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी आज तात्काळ मंजूरी दिली. परिणामी पंढरपुरकरांची चाहतुक कोंडीतून सुटका होणार आहे. मा. आ. प्रशांत परिचारक यांच्या पाठपुराव्यामुळे पंढरपुरकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.



केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी परिचारक यांच्या निवासस्थानी भेट दिली असता, या प्रस्तावित चार पदरी बाह्यवळण रिंग रोडचे काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) यांच्या मार्फत करण्याची मागणी केली. या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्याला तात्काळ निधी मंजूर करण्याची घोषणा गडकरी यांनी यावेळी केली. वेणेगाव-पंढरपूर आणि पंढरपूर-मंगळवेढा या मार्गांवर सध्या आंतरराज्यीय जड वाहतुकीचा प्रचंड ताण आहे. उत्तर भारताकडून अहिल्यानगर, करमाळा आणि टेंभुर्णी मार्गे येणारी मल्टी-एक्सल वाहने पंढरपुरातून दक्षिण भारताकडे जातात. यामुळे शहरातील अंतर्गत रस्ते अपुरे पडत असून, लाखो वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा आणि स्थानिक वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला होता. माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मंत्री गडकरी यांच्याकडे या रस्त्याची मागणी लावून धरली होती. हा रस्ता पूर्णपणे ग्रीन फिल्ड अलायमेंटनुसार होत असल्याने शहराबाहेरून जड वाहतूक वळवणे सुलभ होणार आहे.

### पंढरपूरच्या विकासात गेम चेंजर

पंढरपूरचे भौगोलिक महत्त्व आणि वारकऱ्यांची होणारी ओढाताण लक्षात घेता, हा रस्ता पंढरपूरच्या विकासात गेम चेंजर ठरेल, असे माजी आमदार परिचारक यांनी यावेळी पटवून दिले. दरम्यान परिचारक यांच्या मागणीची दखल घेत नितीन गडकरी यांनी संबंधित विभागाला या रस्त्याचा तातडीने डीपीआर तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकल्पासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.समाधान आवताडे व भाजपचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाटोद्याचे आदर्श सरपंच पेरे पाटील मंगळवारी मंद्रूपमध्ये

### चौडेश्वरी यात्रेनिमित्त शुक्रवारपासून विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १४ मे-**
मंद्रुप येथील चौडेश्वरी देवीच्या यात्रेस शुक्रवार १५ मे पासून प्रारंभ होत आहे. धार्मिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. मंगळवारी १९ मे रोजी पाटोद्याचे आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील यांचे व्याख्यानही होणार आहे.

शुक्रवार १५ मे रोजी सकाळी 'श्री' ची प्रतिष्ठापना आहे. रात्री ११.०० वाजता बाळबट्टल मिरवणूक निघणार आहे. शनिवार १६ मे रोजी 'श्री' स नैवेद्य अर्पण, सदभक्ताकडून बाशिंग बांधणी, ओटी भरणे तसेच सवाद्य मिरवणूक काढणार आहे. रविवार १७ मे रोजी सुवासिनींना ओटी भरण्यात येणार आहे. शंकरलिंग महिला मंडळ प्रस्तुत आध्यात्मिक नाटक व लोककवी डॉ. सिद्धप्पा बिदरी यांच्या लोकगीतांचा कार्यक्रम होणार आहे.





१८ मे रोजी गायिका भाग्यश्री म्हेत्री व गायक सुधाकर काळे यांच्याकडून कलगी-तुरा माळी गल्ली सभागृहासमोर होणार आहे. सायंकाळी जगद्गुरू डॉ. सिद्धलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामी यांचे प्रवचन आहे. एमपीएससी परिक्षेत यश प्राप्त केलेल्या मैथिली कुमठेकर व ग्रामसेवक सविता कुंभार यांचा सत्कार होणार आहे. संमोहनतज्ञ राज गोंधळी यांच्याकडून विविध प्रयोग सादर होणार आहे.

कार्यक्रमास भिमाशंकर म्हेत्रे, आप्पाराव कोरे, रमेश नवले, बक्षुभाई मुल्ला, नजीर आवटे, संतोष शहा, अनंत म्हेत्रे, रविशंकर म्हेत्रे, आंबण्णा काळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मंगळवार १९ मे रोजी सायंकाळी ७ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील पाटोदाचे आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील यांचे माझा गाव, आदर्श गाव या विषयावर व्याख्यान होणार आहे. बुधवार २० मे रोजी सकाळी ९ वाजता बडगी आटा होणार आहे. दुपारी ५ वाजता जंगी कुस्त्या होणार आहे. कोल्हापूर येथील सुतार बंधू प्रस्तुत माऊली संगीत सोंगी भजनी मंडळ यांच्या कार्यक्रमाने यात्रेचा समारोप होणार आहे. कार्यक्रमास अप्पर तहसिलदार विष्णू बुटे, मंद्रुप पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शंकर पटवारी, फौजदार अमितकुमार करपे, राजकुमार डांगे, उद्योगपती लक्ष्मण सुतार, सतीश वेर्णेकर, मोतीराम चव्हाण, संतोष बरूरे, म्हाळप्पा घाले, महादेव शिंगडगाव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास परिसरातील भाविक व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन यात्रा कमिटीचे अध्यक्ष मळसिद्ध शिंगडगाव, गुरूसिद्ध म्हेत्रे, राजेश देशमुख, न्यासचे अध्यक्ष महादेव कुंभार, दयानंद ख्याडे, भगवान सुतार, विशाल केवटे, शिवानंद लोभे, पंचप्पा लच्याणे, मलकण्णा कुंभार, सिद्धाराम कुंभार, रमेश कुंभार, राजेश स्वामी आदींनी केले आहे.

## प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्या वाढदिनी ३ दिवस रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १४ मे -**
सांगोल्याचे माजी नगराध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त ३ दिवस रक्तदान शिबिर होत आहे. उपक्रमाचे तेवीसावे वर्ष असून, दरवर्षी १००० पेक्षा जास्त रक्तदाते या मानवतेच्या कार्यात सहभागी होतात.



एप्रिल आणि मे महिन्यात रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण होतो. हीच सामाजिक गरज ओळखून रक्तदान हेच श्रेष्ठ दान या भावनेतून सांगोला तालुक्यातील विविध ठिकाणी या शिबिरांचे नियोजन केले आहे. सांगोला शहर व तालुक्यातील सर्व शैक्षणिक, साहित्यिक, राजकीय, सामाजिक व सेवाभावी संस्थांनी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करून मानवतेचे महान कार्य करावे, असे आवाहन विद्यामंदिर परिवार व लायन्स क्लब सांगोला यांनी केले आहे.

### रक्तदान शिबिरांचे स्थळ

बुधवार दि.२० मे - लोणविरे हायस्कूल लोणविरे,
गुरुवार दि.२१ मे - नाझरा विद्यामंदिर प्रशाला नाझरा,
शुक्रवार दि.२२ मे - पांडुरंग कॉम्प्लेक्स कोळा, जि.प. मुलींची शाळा नं.१ सांगोला.
वेळ- सर्व ठिकाणी सकाळी ८ ते सायं.६ पर्यंत राहील.



सोलापुरात आज गुरुवारी धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भगवंत चौक येथे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन ध्येयमंत्र व प्रेरणामंत्र घेण्यात आला. यावेळी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## वेळापूर व परिसरात छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १४ मे-**
वेळापूर ता माळशिरस येथे आज सकाळी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

श्री अर्धनारी नटेश्वर मंदिरासमोर शिवशंभो प्रतिष्ठान व डीजे कंपनी ४६ यांच्यावतीने जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने-देशमुख, मदनसिंह माने-देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाईंजे यांच्यासह शिवशंभो प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

वटेश्वर मंदिर येथेही छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. पालखी चौक येथे तथागत भगवान गौतम बुद्ध व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी पंचशील नगर, शिवशंभो प्रतिष्ठान, रमापती प्रतिष्ठान, रौद्रशंभो प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पिसेवाडी येथे मावळा प्रतिष्ठान व सत्यशोधक प्रतिष्ठान पिसेवाडी यांच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज जयंतीचा कार्यक्रम झाला. यावेळी पिसेवाडी व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## कुरूल येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त ८६ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**कुरूल, दि. १४ मे-**
रक्तदान हा सर्वश्रेष्ठ समाजोपयोगी उपक्रम असून सामाजिक मंडळे व युवक संघटनांनी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करावे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे मोहोळ तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पाटील यांनी केले.

कुरूल येथील मारुती मंदिर परिसरात छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त स्वाभिमानी शेतकरी संघटना व नितीन मस्के यांच्या पुढाकारातून भव्य रक्तदान शिबिर पार पडले. शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मोहोळ तालुका युवक अध्यक्ष नितीन मस्के, पप्पू पाटील, व महादेव कदम यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भीमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक चंद्रसेन (बापू) जाधव यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे मोहोळ तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पाटील , पंचायत समिती सदस्य धनाजी माळी, प्रगतशील बागायतदार गुरुदेव पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मोहोळ तालुकाध्यक्ष श्रीपती डुणे, पोलीस पाटील वैभव जाधव, प्रा. माऊली जाधव, दत्ता निकम, पांडुरंग घोडके, राहुल पाटील, माणिक घोडके, विकास पवार, रवी शिंदे, बाळू शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

सोलापूर रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. एकूण ८६ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. तसेच युवकांनी समाजोपयोगी उपक्रमांमध्ये पुढाकार घ्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## बार्शी तालुक्यातील सरपंच पदांच्या आरक्षणाची सोडत जाहीर

### अनुसूचित जातींसाठी ११, अनुसूचित जमातींसाठी १, नामाप्रसाठी ३४ आरक्षणे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ मे -**
बार्शी तालुक्यातील सन २०२५ ते २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सरपंच पदांच्या आरक्षणाची सोडत प्रक्रिया बुधवार दि. १३ मे रोजी पार पडली. जिल्हाधिकारी सोलापूर (ग्रामपंचायत शाखा) यांच्या आदेशानुसार अनुसूचित जातींसाठी ११, अनुसूचित जमातींसाठी १, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी ३४ तर उर्वरित पदे सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव केली आहेत. महिलांसाठी स्वतंत्र आरक्षणाचाही समावेश आहे.

दि. १५ जुलै २०२५ रोजी निश्चित केलेले आरक्षण अधिक्रमित करुन नव्याने आरक्षण सोडत काढण्यात आली. तालुक्यातील १२९ ग्रामपंचायतींसाठी आरक्षण निश्चित केले आहे. त्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सुचनेनुसार नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी चिठ्ठीद्वारे सोडत प्रक्रिया राबवली. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी यापूर्वी निश्चित केलेले आरक्षण कायम ठेवले आहे.

अनुसूचित जाती आरक्षण - वांगरवाडी, गौडगाव, मोडेगाव, मळेगाव, सावरगाव. अनुसूचित जाती महिला आरक्षण - जामगाव (पा), दडशिंगे, तांदुळवाडी, गोरमाळे, धामणगाव (आ) आणि दहिटणे ही गावे अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव. अनुसूचित जमाती आरक्षण - शेलगाव (मा) हे गाव अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव ठेवले असून अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी कोणतेही आरक्षण नाही. नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण- डकोणी, भानसळे, वाणेवाडी, घारी, कापशी, महागाव, पिंपळगाव (पानगाव), बोरगाव (झाडी), हळदुगे, मुंगशी (आर), रातंजन, ज्योतीबाचीवाडी, सुर्डी, पुरी, इले, उंबरगे तसेच हत्तीज, चिंचखोपन, हिंगणी (आर) ही गावे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव आहेत. कोरेगांव, काटेगांव, भोयरे, चिंचोली-ढेंबरेवाडी, ममदापूर, अरणगांव, घाणेगांव, ढोराळे, मालेगांव, संगमनेर, तुळशीदासनगर, तडवळे, आंबेगांव, कारी, चिखर्डे, नांदणी आणि जामगांव (आ) या गावांचा समावेश नागरिकांच्या मागास प्रवर्ग महिला आरक्षण आहे.

सर्वसाधारण पुरुष- आगळगांव, पिंपळगांव (आ), गाडेगांव, बाभुळगांव, चारे, पिंपळवाडी, उक्कडगांव, वाघाचीवाडी, शिराळे, धानोरे, जहानपूर, पांगरी, पांढरी, घोळवेवाडी, नारी, नारीवाडी, सौंदरे, कव्हे, कळंबवाडी (पा), गाताचीवाडी, फपाळवाडी, खांडबी, गोडसेवाडी, श्रीपतपिंपरी, साकत, मानेगांव, इर्लेवाडी, तुर्कपिंपरी, यावली, मुंगशी (वा), भातंबरे, उपळे (दु.), झरेगांव, सर्जापूर,भांडेगांव, सारोळे, लाडोळे, पिंपरी आर, नागोबाचीवाडी, लक्ष्याचीवाडी, कासारवाडी, गुळपोळी, रस्तापूर, राळेरास, रऊळगाव, कासारी, धोत्रे. सर्वसाधारण महिला आरक्षण- चुंब,कळंबवाडी (आ), बेलगांव, देवगांव, बोरगांव (खुर्द), वालवड, पाथरी, पिंपळगांव (पा.), येळंब, खामगांव, इंदापूर, ताबडी, बळेवाडी, बावी, पानगांव, कोरफळे, अलिपूर, उपळाई (ठोंगे), शेंद्री, उंडेगांव, काळेगांव, मालवंडी, सासुरे, तांबेवाड, हिंगणी (पा), निंबळक, शेळगांव (आर), धामणगांव (दु), भालगांव, अंबाबाईचीवाडी, आळजापूर, ताडसौंदणे, रुई, खडकलगाव, कांदलगाव, शेलगाव व्हळे, कुसळंब, भोईंजे, पिंपरी (पान), झाडी, मिर्झनपूर.

## शिवदारे मंगल कार्यालयाबाहेरील वाहनातून ड्रायव्हरचा मोबाईल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ मे-**
पार्किंग केलेल्या गाडीच्या उघड्या खिडकीतून १० हजार रुपये किमतीचा मोबाईल लंपास केल्याची घटना जोडभावी पेठ येथील शिवदारे मंगल कार्यालया बाहेर १३ मे च्या पहाटे घडली .याबाबत वाहन चालक सोमनाथ गोविंद क्षीरसागर (रा .गुळसंडी, ता. करमाळा) यांनी फिर्याद दिली असून जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .फिर्यादी हे १२ मे रोजी लग्न कार्याला शिवदारे मंगल कार्यालयाला आले होते . रात्री गाडी पार्क करून ते झोपले असता चोरट्याने त्यांचा मोबाईल लंपास केला . पोलीस हवालदार आरेनवरू या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# ‘प्रबळ इच्छाशक्ती’मुळेच ‘अन्नछत्र’चा प्रचंड विस्तार : ना. गडकरी

## पर्यावरणपूरक वसुंधरेची जपणूक

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १४ मे-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु केलेल्या महाप्रसादाच्या सेवेबरोबरच विविध उपक्रम हे उल्लेखनीय आणि धाडशी नेतृत्व व प्रबळ इच्छाशक्ती मुळेच न्यासाचा प्रचंड विस्तार होत आहे. अन्नछत्र मंडळ हे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात लौकिक, धार्मिक व सांस्कृतीकतेचे प्रतिक असल्याचे मनोगत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री ना.नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.

श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र (ट्रस्ट) मंडळात आले असता न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, प्रतिमा,



कृपावस्त्र व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले, आम्ही गडकरी कुटुंबिय श्रीक्षेत्र अक्कलकोट निवासी स्वामी भक्तच. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, हे स्वामींची अनुभूतीच आहे, हे आमचे श्रध्देय स्थळ आहे. न्यासाच्या वतीने पर्यावरण पूर्वक वसुंधरेची जपणूक केली जात असल्याचे पाहून समाधान वाटते.

यावेळी खासदार प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, सोलापूरचे महापौर विनायक कोंड्याल, जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, ना.नितीन गडकरी यांचे स्वीय सहायक बाळासाहेब ठेंग, मनोज वाडेकर, दीपक शिंदे, अमोल बिराजदार, एनएचए-पुणेचे प्रकल्प संचालक संजय कदम, सोलापूरचे स्वप्नील कासार, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांच्यासह प्रदीप पाटील, दीपक वाघमारे, गुरुशांत धुत्तरगांवकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, सौरभ मोरे, मनोज निकम, पुरोहित अप्पू पुजारी, प्रवीण देशमुख, विजय माने, सुमित घाडगे, शुभम सावंत, प्रसाद मोरे, साहिल सय्यद, सागर जाधव, किरण साठे, ज्ञानेश्वर भोसले, बाळासाहेब पोळ, धानाप्पा उमदी, विनायक भोसले, नुर खासबागदार, स्वामिनाथ बाबर, मल्लिकार्जुन गवळी, बसवराज निंबाळे, विलासराव रेड्डी, बसवराज क्यार, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, सिद्धराम कल्याणी, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, मल्लिकार्जुन बिराजदार, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, समर्थ चव्हाण, कल्याण देशमुख, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, गोरख माळी, पप्पू कोल्हे उपस्थित होते.

### इलेक्ट्रिक बग्गीतून प्रवास

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी ना.नितीन गडकरी यांना श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर येथून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आणण्यासाठी इलेक्ट्रिक बग्गीची सोय केलेली होती. दोन इलेक्ट्रिक बग्गीच्या माध्यमातून ना.गडकरी व त्यांच्या समवेत असणाऱ्या पदाधिकाऱ्यांना अन्नछत्र मंडळात आणण्यात आले. ही सोय पाहून ना.नितीन गडकरी यांनी अन्नछत्र मंडळाच्या कार्याची कौतुक करून, पंतप्रधान ना.नरेंद्र मोदी यांच्या आवाहनास श्री स्वामी समर्थ नगरीतून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे सांगत अन्नछत्र मंडळाचे कौतुक केले.

## महत्वाचे...



### शिस्त आणि सुसंस्कृतपणा हे दयानंद महाविद्यालयाचे वैशिष्ट्य : शटगार

**सोलापूर, दि. १५ मे-**

शिस्त आणि सुसंस्कृत होणार हे दयानंद बीएड कॉलेजचे वैशिष्ट्य असून या शिक्षण शास्त्र महाविद्यालयात अनेक नामवंत विचारवंत विद्यार्थी शिक्षण घेतलेले आहेत आणि ते उच्चस्त पदावर आहेत, असे मत दयानंद शिक्षण शास्त्र महाविद्यालयाची माजी विद्यार्थी तथा दत्तप्रशाला ज्युनियर कॉलेज माजी प्राचार्य सातलिंग शटगार यांनी व्यक्त केले. दयानंद कॉलेजला सदिच्छा भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. प्राचार्य जी. एस. क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. यावेळी त्यांच्यासमवेत माजी विद्यार्थी आरती भूमकर, पोलीस कर्मचारी विनायक भूमकर आदी उपस्थित होते. आपण कितीही मोठे झालो तरीही आपल्यावर संस्कार झालेली जागा किंवा शाळा, कॉलेज, शिक्षक, प्राध्यापक, आई व वडील यांना आपण विसरू शकत नाही. हेच संस्कार आणि संस्कृती या देशाचे वैशिष्ट्य आहे, असेही ते म्हणाले.



### धर्मवीर छत्रपती संभाजीराजे जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळात मूर्तीची प्रतिष्ठापना

**सोलापूर, दि.१४ मे-**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त धर्मवीर छत्रपती संभाजीराजे जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ, सोलापूर येथे महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना खा. डॉ.ज्योती वाघमारे यांच्या शुभहस्ते पूजन करून करण्यात आली. याप्रसंगी संस्थापक तथा शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे युवानेते ज्ञानेश्वर आप्पा सपाटे, प्रकाश अवस्थी, संजय सरवदे, उज्वल दीक्षित, विजय नवले, महादेव गवळी, बाळासाहेब पवार, माजिद बागवान, शिरीष चव्हाण, शिरीष जगदाळे, बाबा शेख, गणेश कुलकर्णी, दिनेश जगताप, हेमंत ढवळशंख, महादेव सावंत, अमोल कदम, सतीश भोसले, बंटी सोनके, राहुल दहीहंडे, समर्थ कदम, ज्ञानेश्वर लामकाने, शशी शिंदे, बबलू सावंत आदी उपस्थित होते.



### छत्रपती संभाजी महाराज यांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**सोलापूर, दि.१४ मे-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिकाचे सहाय्यक आयुक्त मनीषा मगर व मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा झोन तीनचे अधिकारी हानिफ बक्षी, मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजनबी शेख, पर्यवेक्षक मनीष बांगर, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, आम्रपाल वाघमारे, राजेश दासरी, संतोष कळमणकर, सारंगा अंजीखाने, अबरार डोंगरी, गुरुप्रसाद तलवार, तरंगिणी कोंडा, अश्विनी लामपुरे, सायली ढोले, भालचंद्र साखरे आदी उपस्थित होते.



### बाळे येथे मृदंगनाद कार्यक्रम उत्साहात; शूर छावा महामंडळाचा उपक्रम

**सोलापूर, दि. १४ मे-**

शिवमुद्रा प्रतिष्ठान संचलित शूरछावा महामंडळाच्या वतीने बाळे येथे मृदंगनाद कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शूर छावा महामंडळ यांच्यावतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदायिक मृदंग वादन शिक्षण संस्था यांचा हभप ज्योतीराम महाराज चांगभले यांच्या मार्गदर्शनाखाली मृदंगनाद कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी वारकरी सांप्रदायिक नियमाने पंचपदी घेऊन गायक दत्तात्रय महाराज सरवदे, प्रणिती चांगभले, संजय महाराज पवार, सूरज साळुंके यांनी अभंग व गौळण सादर केले. यशांक सुरवसे याने छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर केला. उद्घाटनप्रसंगी हभप सुधाकर महाराज इंगळे, हभप बळीराम महाराज जांभळे, नगरसेवक बिज्जू प्रधाने, बापू वाडेकर, नगरसेविका मंदाकिनी तोडकरी, सुरेश तोडकरी, बाबासाहेब भंवर, नगरसेविका अलकाताई भंवर, मदन क्षीरसागर, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संकेत क्षीरसागर, मंडळाचे उत्सव अध्यक्ष तुषार जाधव, उपाध्यक्ष ऋषिकेश पिंगळे, उपाध्यक्ष किरण नलवडे, गणेश कांबळे, सोनू कांबळे, खजिनदार आशिष प्रधाने उपस्थित होते.

## भारतरत्न इंदिरा गांधी इंजीनियरिंगमध्ये फुल कॅम्पस इंटरव्यू ड्राईव्हचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ मे-**



भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग केगाव. सोलापूर .येथे सॉफ्टवेंजर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड. यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ व २० मे २०२६ रोजी सकाळी दहा वाजता फुल कॅम्पस इंटरव्यू ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. हा ड्राईव्ह २०२५ व २०२६ मध्ये पदवी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला आहे.

या भरती प्रक्रियेसाठी सिव्हिल इंजिनिअरिंग व बाय मेडिकल इंजिनिअरिंग वगळता सर्व अभियांत्रिकी शाखातील विद्यार्थी तसेच बीसीए. एमसीए .आणि बीएससी कम्प्युटर ./आय टी शाखेतील विद्यार्थी पात्र राहणार आहेत. उमेदवारांना कोणत्याही बॅकलॉग किंवा इयर डाऊन नसणे आवश्यक असल्याचे महाविद्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

सदर भरती प्रक्रियेपूर्वी १८ मे रोजी ऑनलाईन पद्धतीने ओरिएंटेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यामध्ये विद्यार्थ्यांना कंपनीची माहिती व निवड प्रक्रिया बाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.( एक) एटीट्यूड टेस्ट (दोन )ग्रुप डिस्कशन. (तीन)एच आर. मुलाखत घेणार असून याबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने आपले मत व्यक्त करताना म्हणाले की विद्यार्थ्यांना दर्जेदार रोजगारच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. अशा फुल कॅम्पस ड्राईव्हमुळे विद्यार्थ्यांना नामांकित कंपनीमध्ये घडवण्याची उत्तम संधी मिळत असून विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आव्हान त्यांनी केले.

महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत विविध महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना या भरती प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## आयशर टेम्पोच्या धडकेत दुचाकीवरील दोघे जागीच ठार

**सोलापूर, दि.१४ मे-**

आयशर टेम्पोने पाठीमागून धडक दिल्याने दुचाकीवरील दोघे मित्र जागीच ठार झाल्याची घटना सोलापूर-मंगळवेढा मार्गावरील कामती बु. येथील ब्रिजवर घडली. बालाजी यल्लप्पा खरात (वय-४२), सुरेश अण्णा व्हनमाने (वय-४५, दोघेही रा.वटवटे, ता.मोहोळ) अशी त्यांची नावे आहेत. ते दोघे गुरुवारी दुपारी कामानिमित्त गावाहून कामतीकडे दुचाकीवरुन आले होते. त्यानंतर पुन्हा ते गावाकडे परतत असताना कामती येथील ब्रिजवर पाठीमागून येणाऱ्या आयशर टेम्पोने त्यांना जोराची धडक दिली. यात ते दोघे जागीच ठार झाले.

## शेतीच्या वादातून कोयता, काठी, लाथाबुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर, दि.१४ मे-**

शेतीच्या वादातून एका व्यक्तीला कोयता, काठी व लाथाबुक्याने मारहाण करून जखमी करण्यात आल्याची घटना पंढरपूर तालुक्यातील नेपतगाव फाटा येथे घडली. प्रकाश महादेव कदम (वय-४९, रा.आंबेचिंचोली) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. ते बुधवारी रात्री नेपतगाव फाटा जवळअसताना वैभव कदम, अभिषेक अवताडे व इतर चार जणांनी मिळून कोयता, काठी व लाथाबुक्क्याने मारहाण केली. पंढरपूरच्या आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी ते स्वतः दाखल झाले.

## पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभाग सतर्क

**शिक्षक संवाद, सुनावण्या ऑनलाईन**

**कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची गरज नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांनी महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे. नागरिकांनी इंधन बचत, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, अनावश्यक खर्च टाळणे आणि डिजिटल पद्धतीने कामकाज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शासन निर्णय व सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालयाने आता बहुतांश कामकाज ऑनलाईन पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांना कोणत्याही कामासाठी कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

कार्यालयाशी संपर्क साधण्यासाठी ई-मेल व व्हॉट्सॲपचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित तालुक्यांनुसार उपशिक्षणाधिकाऱ्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक जाहीर करण्यात आले असून प्रस्ताव, अर्ज व तक्रारी व्हॉट्सॲप किंवा ई-मेलद्वारे सादर कराव्यात, असे सांगण्यात आले आहे.

विविध तक्रारींवरील सुनावण्या आता प्रत्येक मंगळवारी ऑनलाईन पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. संबंधितांनी आपले म्हणणे ई-मेलवर सादर करून विभागाकडून देण्यात येणाऱ्या लिंकद्वारे ऑनलाईन सहभागी व्हावे लागणार आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या गुरुवारी ‘शिक्षक संवाद दिन’ ऑनलाईन पद्धतीने आयोजित केला जाणार असून शिक्षकांनी आपल्या तक्रारी व प्रस्ताव सायंकाळी ५ वाजेपर्यंत ई-मेलवर पाठवावेत, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## भांडवली मूल्य आधारित कर प्रणाली संदर्भातच्या निर्णयाकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ मे-**

सोलापूर महापालिका प्रशासनाने भांडवली मूल्य आधारित कर प्रणाली लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पुढे ठेवला असून, या निर्णयाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. यापूर्वी या प्रस्तावावरून राजकीय स्तरावर जोरदार विरोध झाला होता. मात्र सत्ताधारी भाजप पदाधिकाऱ्यांनी नागरिकांवर तत्काळ कोणतीही कर किंवा दरवाढ होणार नसल्याचे स्पष्ट केले होते. आता याच ‘भांडवली मूल्य आधारित कर प्रणाली’चा प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे अधिकृतपणे सादर करण्यात आला आहे.

महापालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार, दि.१५ मे रोजी बोलावण्यात आली आहे. या सभेपुढे भांडवली मूल्य आधारित कर प्रणाली संदर्भातील विषयासह इतर ४ विषय देखील मान्यतेसाठी पाठविले आहेत. मात्र या भांडवली मूल्य आधारित कर प्रणालीच्या माध्यमातून भविष्यात शहरातील मिळकतदारांना कर आणि दरवाढीचा फटका बसणार असल्याची ओरड पुन्हा एकदा सुरू झाली असून अशा स्थितीत स्थायी समितीमध्ये या प्रस्तावावर कोणता निर्णय होणार याकडे लक्ष लागले आहे.

सोलापूर शहराचा वाढता विस्तार आणि स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेले विकास प्रकल्प पाहता, महापालिकेच्या उत्पन्नाचे स्रोत अधिक



बळकट आणि पारदर्शक करणे आवश्यक आहे. सोलापूर महापालिका क्षेत्रात सध्या भाडे मूल्यावर आधारित कर प्रणाली मालमत्तेच्या प्रत्यक्ष बाजारभावाशी सुसंगत नाही. त्यामुळे महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील तरतुदीनुसार 'भांडवली मूल्य आधारित कर' प्रणाली स्वीकारण्याचा हा प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे प्रस्तावात नमूद आहे.

सध्याच्या प्रणालीतील त्रुटीमध्ये एकाच भागात असलेल्या जुन्या आणि नवीन मालमत्तांच्या करात मोठी तफावत आहे. भाडे मूल्यावर आधारित करामुळे महापालिकेच्या उत्पन्नात अपेक्षित वाढ होत नसल्याची आणि भाडे निश्चितीमध्ये मानवी हस्तक्षेत जास्त असल्याने त्यात मानवीय चुकांचा संभव असल्याचे दाखवत महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम १२९ नुसार कर योग्य मूल्यावर किंवा भांडवली मूल्यावर बसवता येण्याजोगे मालमत्ता कर व त्यांच्या दरांची तरतूद करण्यात आलेली आहे.

नियमामध्ये मालमत्ता करात सुसूत्रता आणण्यासाठी भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणालीनुसार मालमत्ता कर आकारणी बाबतचा पर्याय उपलब्ध करण्याबाबतची तरतूद समाविष्ट करणारा अधिनियम यापूर्वी आम्हालाच आणला आहे. त्यानुसार ही कर प्रणाली अमलात आल्यास महापालिकेला विविध बाबींचा फायदा होणार आहे. स्थायी समिती आणि त्यानंतर महापालिका सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यास या नवीन पध्दतीची कार्यवाही चालू आर्थिक वर्ष सन २०२६-२७ पासून अंमलात आणता येईल.

### मंडईतील खोके धारकांचे नियोजनबध्द पुनर्वसन

सोलापूर शहरातील अनधिकृत फेरीवाल्यांचे तसेच मंडई येथील खोके धारकांचे नियोजनबद्ध पुनर्वसन करणे आवश्यक आहे त्यामुळे शहरातील गर्दीच्या रस्त्यावरील अशा पद्धतीचे छोटे मोठे व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्यांचा व्यापार करता येईल व महापालिकेकडे नियोजनबद्ध पुनर्वसन केल्याने त्यापोटी महसूल देखील जमा होण्यास मदत होईल. तसेच रस्त्यावरील गर्दी कमी होऊन वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास मदत देखील होईल याबाबत धोरण निश्चित करण्यासंबंधी व नियोजनासाठी निर्णय घेण्यासंबंधीचा प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे मंडई विभागाकडून पाठविण्यात आला आहे.



सोलापूर : छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त संभाजी महाराजांच्या पुतळ्याला गुरुवारी अशारितीने सजावट करण्यात आली होती. (छाया : केवल तिवारी)

## पंढरपूर शहर हद्दीत बालविवाह रोखण्यात यश

**आठवडयात दुसरा तर दोन महिन्यात सलग चौथा बालविवाह रोखला**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ मे-**

निर्भया पथकच्या पंढरपूर विभागाला बालविवाह रोखण्यात यश आले आहे. विशेष म्हणजे, या पथकाने एका आठवडयात दुसरा तर दोन महिन्यात सलग चौथा बालविवाह रोखला आहे.

याबाबतचे वृत्त असे की, पंढरपूर शहर हद्दीत एका मोठ्या नामांकित हॉलमध्ये एक बालविवाह होत असल्याचे बातमी मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार निर्भया पथक सदर ठिकाणी तात्काळ जावुन चौकशी केली असता तिथे मुलगी व तिचे नातेवाईक मिळून आले.

दरम्यान, नातेवाईक यांनी विवाह होत असलेबाबत नकार दिला. मात्र निर्भयापथकाने चौकशी करुन त्यांनी छापलेल्या पत्रिका नातेवाइकांना दाखवली व सोक्षमोक्षलावत विवाह तत्काळ थांबिवला. ती शिकत असलेल्या शाळेतुन बोनाफाईड प्रमाणपत्र घेवून आले असता तिचे वय हे १७ वर्षे १ महिने असल्याचे स्पष्ट झाले. त्या बालिकेच्या आईवडिलांना समज देवुन बालविवाह रोखण्यात आला. सदर मुलीस बालकल्याण समिती, सोलापूर यांचे समक्ष पुढील कार्यवाही करिता हजर करण्यात आले.

जिल्हा पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर, सहाय्यक पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथकाचे प्रमुख महिला पोलिस उपनिरीक्षक सुप्रिया यादव (रावण), पोकॉ शशिकांत सावंत, पोकॉ लक्ष्मण कुचेकर, महिला पोकॉ निर्मला वाघमारे, महिला पोकॉ काझी, पोना भगत, पोकॉ चव्हाण आदींनी ही कामगिरी पार पाडली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | शुक्रवार, १५ मे २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली १४०० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी

## वाहतूक कोंडीतून सुटका; अपघातांचे प्रमाण कमी

**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि.१४ मे-**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज आळंदी-पंढरपूर पालखी महामार्गाची पाहणी केली. दरम्यान, या महामार्गावरील विविध कामांसाठी १४०० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात देत असल्याचे त्यांनी पत्रपरिषदेत सांगितले.

जेजुरी येथे २ कि.मी.लांबीच्या उड्डाणपुल करण्यात येणार असून त्यासाठी २५० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली. या पुलामुळे खंडोबा देवस्थान येथे येणाऱ्या भाविकांची वाहतूक कोंडीतून सुटका, अपघातांचे प्रमाण कमी होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या मागणीनुसार फलटण शहरासाठी ९७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून त्याची निविदा प्रक्रिया सुरु आहे. टेंभुर्णी-पंढरपूर असा ४८ किलोमीटर लांबीचा व ९५० कोटी रुपये किंमतीचा महामार्गास मंजुरी देण्यात आली. टेंभुर्णी-पंढरपूर या ४८ कि.मी.च्या महामार्गमध्ये पंढरपूर बायपास रोडचा समावेश आहे. पंढरपूरचा पूर्ण



रिंगरोड ज्याची एकूण लांबी ४० किलोमीटर इतकी असून त्यापैकी १३ किलोमीटर पूर्ण झाला असून ९.५ किलोमीटर हा टेंभुर्णी पंढरपूर या मार्गात प्रस्तावित केला आहे.

शिर्डी, अहिल्यानगर व टेंभुर्णीकडून येणारी वाहतूक विजापूर, मंगळवेढा मार्गे पंढरपूर शहराच्या बाहेर जाईल. उर्वरित १८ कि.मी.चे डीपीआरचे काम हाती घेण्यात आले. वाखरी ते सातारा रोड, सांगोला रोडला क्रॉस करुन मंगळवेढा रोडला मिळवण्यात येणार आहे.

माळशिरस तालुक्यातील तोंडले याठिकाणी संतांच्या पालख्यांचा बंधुभेट सोहळा संपन्न होत असतो. तसेच दोन्ही पालखी महामार्ग एकत्र येत आहेत. याठिकाणी नवीन उड्डाणपूल करण्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली, असेही त्यांनी सांगितले.

### ना.गडकरींकडून मोठा निधी; नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या आजच्या दौऱ्याने जिल्ह्यासह पालखी मार्गासाठी व नजीकच्या कामांसाठी मोठा निधी व नवीन कामे मंजूर झाल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महत्वाचे...

### पोलिसात तक्रार दिल्याच्या कारणावरुन चौघांकडून मारहाण

**सोलापूर, दि.१४ मे-**

पोलिसात तक्रार का दिला म्हणून एका तरुणाला चौघाजणांनी चाकू व लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याची घटना नई जिंदगी येथे घडली. नवीद नासिर जमादार (वय-२९, रा.रिगल हॉटेलजवळ, नई जिंदगी, सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. तो गुरुवारी घरामध्ये असताना पोलिसात तक्रार का दिला म्हणून शाहिद मुल्ला, शादाब मुल्ला व इतर दोन जणांनी त्याला चाकू, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. उपचाराकरिता शहानूर विजापुरे यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### ९० वर्षांच्या इसमाचा कुजलेला मृतदेह आढळला

**सोलापूर, दि.१४ मे-**

एका ९० वर्षाच्या इसमाचा कुजलेला मृतदेह जुळे सोलापूर येथील अंबर हॉटेल समोरील मोकळ्या मैदानावरील काटेरी झुडपात बुधवारी रात्री १० वाजता आढळला. गोरख निवृत्ती गायकवाड (रा.भीम नगर, वडाळा, ता.उत्तर सोलापूर) असे त्या वृध्दाचे नाव आहे. येथील मोकळ्या मैदानात मृतदेह असल्याची खबर विजापूर नाका पोलिसांना समजली असता पोलिस हवालदार एस.बी. फुलारी यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला.

### ट्रॅक्टर धडकेत जखमी झालेल्या पाटकुल येथील शाळकरी मुलाचा मृत्यू

**सोलापूर, दि.१४ मे-**

ट्रॅक्टरच्या धडकेत जखमी झालेल्या दुचाकी वरील पंधरा वर्षाच्या शाळकरी मुलाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात गुरुवारी पहाटेच्या सुमारास मृत्यू झाला. मयूर मुरलीधर बेसरे (वय-१५, रा.पाटकुल, ता.मोहोळ) असे मयत मुलाचे नाव आहे. तो ३० एप्रिल रोजी संध्याकाळी दुचाकीवरून पाटकुल-खरसुळी गावाकडे निघाला असताना वाटेत फुलचिंचोली जवळ समोरून येणाऱ्या ट्रॅक्टरने दुचाकीला धडक दिली होती. यात तो गंभीर जखमी झाल्याने एका खासगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात वडील मुरलीधर यांनी पुढील उपचारसाठी दाखल केले होते.उपचारादरम्यान गुरुवारी पहाटे मृत्यू झाला.

### वडील व मुलास कुऱ्हाडीचा दांडा, लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि.१४-**

मागील भांडणाचा राग मनात धरुन एका वडील व मुलाला कुऱ्हाडीचा दांडा व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना माढा तालुक्यातील शिंगेवाडी येथे घडली. ज्ञानेश्वर उर्फ शंकर अनंता मिसाळ (वय-४२), नागेश ज्ञानेश्वर उर्फ शंकर मिसाळ (वय-१३) असे मारहाण झालेल्या वडील व मुलाचे नाव आहे. बुधवारी रात्री ते दोघे घरात असताना मागील भांडणाचा राग मनात धरुन गजेंद्र शिंदे, प्रदीप शिंदे आणि अभिजीत शिंदे या तिघांनी मिळून कुऱ्हाडीचा दांडा व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात दोघांना मुकामार लागल्याने त्यांना कुर्डुवाडी येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन नातेवाईक सुरज हिबाळे यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले.

# 'श्री शक्ती सेवा'च्या वतीने ऐश्वर्य लक्ष्मी सुवर्ण कुबेर महोत्सव

**सोलापूर, दि. १४ मे-**

विश्वकल्याण, ऐश्वर्य आणि धनसमृध्दीच्या अनुषंगाने श्री शक्ती सेवा समितीच्या वतीने शुक्रवार, दि.२२ ते रविवार, २४ मे २०२६ कालावधीत अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील महालक्ष्मी बॅंक्वेट हॉल येथे ऐश्वर्य लक्ष्मी सुवर्ण कुबेर महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती वैशाली गाजूल यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या महोत्सव अंतर्गत श्री ऐश्वर्य लक्ष्मी सुवर्ण कुबेर होम, श्री चित्रलेखा समेत कुबेर कल्याण व पट्टाभिषेक, सौभाग्य लक्ष्मी पूजा या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परमपूज्य माताजी श्री श्री श्री रम्यानंद भारती स्वामिनीजी यांच्या सान्निध्यात हा महोत्सव पार पडणार आहे.महोत्सवात गुरुपाद पूजा, मंत्रोपदेश, पूज्य माताजींचे अनुग्रह भाषण, उत्सवकाळात दररोज दुपारी आणि सायंकाळी महाप्रसाद देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी ९०७५३३४९०२, ७८९२०८८२३४, ९०२१५६७५६८, ९९२१७२७४५० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहनही त्यांनी केले. या पत्रकार परिषदेला उमेश गाजूल, डॉ.सनतकुमार अनुमल्ला, तेजस्विनी इराबत्ती आदी उपस्थित होते.

# पालखीतून मिरवणूक काढून शंभुराजांना मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त संभाजी आरमारच्या वतीने प्रतिवर्षी शंभू अभिवादन रॅली काढली जाते. मात्र यंदा प्रथमच पालखीतून छत्रपती संभाजी महाराजांची मिरवणूक काढून शंभू छत्रपतींना मानवंदना देण्यात आली. सजवलेल्या पालखीत सिंहासनारुढ शंभूराजांची मूर्ती विराजमान झाली होती. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक या मार्गावरून पुष्पवृष्टी करत ही मिरवणूक काढण्यात आली.



महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस, पालखीतील शंभूराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करुन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी माजी उपमहापौर पद्माकर काळे, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर, संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष तथा नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डोक्यावर भगवा फेटा परिधान केलेल्या शेकडो माता-भगिनींनी पालखी वाहत संभाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज चौक येथे मावळ्यांनी मर्दानी खेळांचे सादरीकरण केले. या मिरवणुकीत शशिकांत शिंदे, गजानन जमदाडे, सागर ढगे, अमित कदम, संध्या हेब्बाळकर, उमा रजपूत, रेखा व्हनकडे, जानवी पतंगे, वर्षा ढगे, अनिता मोटे, अर्चना बंडगर, संतोष कदम, राज जगताप, रेवण कोळी, सागर दासी, द्वारकेश बबलादीकर, तेजस चौधरी, अर्जुन शिवसिंगवाले, प्रमोद जगताप, राजु रच्चा, तानाजी जाधव, गणेश वनस्कर, संजय मस्के, वासुदेव होनकोंबडे, पिंटू औरंगे, अविनाश विटकर आदी सामील झाले होते.

# पुढील एका वर्षात १२ गावांमधील नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड देण्याचे नियोजन : कोंड्याल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

नागरिकांना मालमत्तेचे अधिकृत दस्तऐवज वेळेत उपलब्ध व्हावेत, यासाठी प्रशासनाने कामकाजाला गती द्यावी. पुढील एका वर्षात हद्दवाढ भागातील सर्व १२ गावांतील प्रॉपर्टी कार्ड तयार करून नागरिकांना देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. महापालिका प्रशासनाच्या या उपक्रमामुळे हद्दवाढ भागातील नागरिकांच्या मालमत्ता विषयक समस्या मार्गी लागण्यास मदत होईल आणि मालमत्तेच्या नोंदी अधिक सुलभ व पारदर्शक होतील, असा विश्वास महापौर विनायक कोंड्याल यांनी व्यक्त केला.




सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील १२ गावांमधील नगर भूमापन, प्रॉपर्टी कार्ड व मालमत्ता नोंदणी प्रक्रियेबाबत घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी सभागृह नेते नरेंद्र काळे, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगरसेवकद्वय बिजू प्रधाने, सिध्देश्वर कमटम, नगर भूमापन विभागाचे अधिकारी, मॅपक्स कंपनीचे प्रमुख सचिन कांबळे, नगररचना विभागाचे उपअभियंता जोशी, सहाय्यक अभियंता झरतार आदी उपस्थित होते.

गुरुवार, दि.२१ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर महानगरपालिका कौन्सिल हॉल येथे सर्व नगरसेवकांसाठी विशेष सादरीकरण आयोजित करण्यात आले आहे. या सादरीकरणात प्रॉपर्टी कार्ड, नगर भूमापन प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे व पुढील कार्यपध्दती याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. महापालिका प्रशासनाच्या या उपक्रमामुळे हद्दवाढ भागातील नागरिकांच्या मालमत्ता विषयक समस्या मार्गी लागण्यास मदत होईल आणि मालमत्तेच्या नोंदी अधिक सुलभ व पारदर्शक होतील, असेही त्यांनी सांगितले.

# सोलापुरात जाणवतोय रक्ताचा तीव्र तुटवडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

सध्या सोलापूर शहरात रक्त आणि रक्तघटकांचा अत्यंत तुटवडा जाणवत आहे. दरवर्षी एप्रिल आणि मे या दोन महिन्यात ही परिस्थिति निर्माण होत असते. मात्र यंदाच्या वर्षी तीव्रता अधिक जाणवत आहे. यामुळे रक्ताची गरज असलेल्या रुग्णांसह थलेसेमिया, सिकलसेल, कॅन्सर, किडनी विकार यासारख्या वारंवार रक्त संक्रमाणाची गरज असलेल्या रुग्णांच्या नतेवाईकांची रक्त मिळवण्यासाठी धावाधाव होत आहे.



हा परीक्षेचा आणि उन्हाळी सुट्ट्यांचा कालावधी असल्याने नियमित रक्तदाते सहल, लग्नकार्य इत्यादि कारणांनी परगावी जातात. तसेच कोणताही मोठा राष्ट्रीय सण नसल्याने शिबीरांची संख्या व पर्यायाने रक्तसंकलनही कमी असते. या आणीबाणीच्या परिस्थितीत सामाजिक संस्था, व्यावसायिक संस्था, कारखानदार, मॉल, बॅंका याठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करून रुग्णांची गरज भागवावी, असे आवाहन डॉ.हेडगेवार रक्तपेढीचे अध्यक्ष सतीश मालू यांनी केले आहे.

# ज्या चांद्रमासात सूर्याचे राशिसंक्रमण होत नाही तो महिना अधिकमास : दाते

## यंदा दि.१७ मे ते १५ जून या कालावधीत अधिक ज्येष्ठ महिना

**तभा प्रतिनिधी,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

दर तीन वर्षात एकदा कोणतातरी महिना अधिकमास येतो. त्यामध्ये सुध्दा सामान्यतः २८ ते ३५ महिन्यात अधिक मास येतो आणि दर १९ वर्षांनी पुन्हा तोच महिना अधिकमास येतो, असा एक साधारण नियम आहे.



चैत्र, वैशाख, ज्येष्ठ याप्रमाणे १२ चांद्र महिने आहेत. एका अमावास्येपासून दुसऱ्या अमावास्येपर्यंत एक चांद्रमहिना असतो. मीन राशीत सूर्य असताना ज्या चांद्रमासाचा आरंभ होतो त्यास चैत्रमास म्हणतात. मेष राशीत सूर्य असताना ज्या चांद्रमासाचा आरंभ होतो त्यास वैशाख मास म्हणतात. याप्रमाणे अनुक्रमाने पुढील चांद्रमास होत जातात. प्रत्येक चांद्र महिन्यात सूर्याचे राशिसंक्रमण झाले तर तो नेहमीचा चांद्रमास असतो. परंतु ज्या चांद्रमासात सूर्याचे राशिसंक्रमण होत नाही त्या महिन्यास अधिकमास म्हणतात. यामध्ये सुध्दा




चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन व फाल्गुन हे अधिकमास होऊ शकतात, असे पंचागकर्ते मोहनराव दाते यांनी सांगितले.

सौर वर्ष ३६५ दिवसांचे असते, तर चांद्रवर्ष हे ३५४ दिवसांचे असते, म्हणजे चांद्रवर्ष हे ११ दिवसांनी कमी असते. सुमारे तीन वर्षातून एकदा अधिकमास आला की सौरवर्ष व चांद्रवर्ष यांची सांगड घातली जाते आणि ऋतुचक्राशी सुध्दा जमवून घेतले जाते. सूर्य व चंद्र यावरच मुख्यत: सृष्टीची स्थिति अवलंबून आहे. प्रत्येक चांद्रमासात सूर्याचे राशिसंक्रमण झाले तरच त्या महिन्यास शुचित्व प्राप्त होते. म्हणून सूर्य संक्रमण न झाल्यामुळे होणाऱ्या मासास अधिकमास, मलमास, धोंडामास असेही म्हणतात. मल म्हणजे अशुध्द अशा अधिकमासात नेहमीची व्रतवैकल्ये करता येत नाहीत. प्रत्येक महिन्याची एक-एक देवता सांगितली आहे. त्याप्रमाणे या अधिकमासाची देवता भगवान श्रीकृष्ण असल्याने या अधिकमासास पुरुषोत्तम मास असेही म्हटले आहे.

या अधिकमासात श्री पुरुषोत्तम प्रीत्यर्थ महिनाभर उपोषण, अयाचित म्हणजे भोजन करते वेळी न मागता मिळेल तेवढेच खाणे. एक भुक्त म्हणजे माध्यान्ही एक वेळ भोजन करणे, नक्त भोजन म्हणजे दिवसा उपोषण करुन रात्री भोजन करणे, मौन भोजन म्हणजे भोजनाच्यावेळी मौनव्रत धारण करणे. याप्रमाणे व्रते करावीत. अशक्ताने (ज्यांना महिनाभर शक्य नाही त्याने) वरीलपैकी एक प्रकार निदान तीन दिवस अगर एक दिवस तरी आचरणात आणावा. त्याचप्रमाणे महिनाभर तांबूलदान दिल्यास सौभाग्यप्राप्ति, देवापुढे अखंड दीप लावल्यास लक्ष्मीप्राप्ति, निदान एक दिवस गंगास्नान केल्यास सर्व पाप निवृत्ति होते.

या महिन्याची देवता पुरुषोत्तम असल्याने श्रीविष्णुयाग, श्रीसत्यनारायण पूजा करता येईल. या महिन्यात शुक्ल व कृष्ण द्वादशी, पौर्णिमा, कृष्ण अष्टमी, नवमी, चतुर्दशी व अमावास्या या तिथीस आणि व्यतीपात व वैधृति असेल त्यादिवशी अपूपदान (अनरसे दान) करावे. यादिवशी शक्य नसेल तर या महिन्यात कोणत्याहि दिवशी तेहतीस अपूपदान करावे. ज्यांना अपूपदान देणे शक्य नसेल त्यांनी तेहतीस बत्ताशांचे दान द्यावे. व्रत व दान करून आयुष्य, आरोग्य, ऐश्वर्य व पुण्य मिळवावे हा यामागील हेतु आहे.

### हे करु नये; हे करता येईल

या अधिकमासात नित्य व नैमित्तिक कर्मे करावीत. काम्य कर्मांचा आरंभ व समाप्ति करु नये. जे केल्यावाचून गति नाही, अशी कर्मे करावीत. देवतांच्या मूर्तीची पुनःप्राणप्रतिष्ठा करता येते. ग्रहण श्राध्द, जातकर्म, नामकर्म हे संस्कार करावेत. तीर्थश्राध्द, दर्शश्राध्द, नित्यश्राध्द करावीत. गृहारंभ, वास्तुशांति, संन्यास ग्रहण, नूतन व्रत ग्रहण, विवाह, उपनयन, चौल, नवीन देव प्रतिष्ठा करु नये. मात्र साखरपुडा, बारसे, डोहाळजेवण, जावळ, लौकिक गृहप्रवेश, नवीन वाहन-वास्तु खरेदी, नवीन व्यवसाय आदी गोष्टी करता येतात.

### पुढचा अधिकमास सन २०२९ साली

मागील वर्षी ज्येष्ठ महिन्यात ज्यांचा मृत्यु झाला असेल त्यांचे प्रथम वर्षश्राध्द अधिक ज्येष्ठ मासात त्या तिथीस करावे. यापूर्वीच्या अधिक ज्येष्ठ मासात ज्यांचा मृत्यु झालेला असेल त्यांचे दरवर्षाचे श्राध्द अधिक ज्येष्ठातच करावे. मात्र दरवर्षीचे ज्येष्ठ मासात ज्यांचे श्राध्द असेल त्यांचे प्रतिसांवत्सरिक श्राध्द यावर्षी निज ज्येष्ठ मासात त्या तिथीस करावे. यानंतरचा अधिक महिना हा चैत्र असणार असून १६ मार्च २०२९ ते १३ एप्रिल २०२९ दरम्यान हा अधिक चैत्र येईल, असेही त्यांनी सांगितले.

# 'क्रेडाई'चे २४ वे नॅटकॉन अधिवेशन आता भारतातच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

क्रेडाईतर्फे दरवर्षी विविध देशात नॅटकॉन अधिवेशन आयोजित केले जाते. यंदाचे २४ वे नॅटकॉन अधिवेशन असून यावर्षी ॲमस्टरडॅम येथे १३, १४ व १५ ऑगस्ट रोजी हे अधिवेशन आयोजित करण्यात येणार होते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या परदेश दौरे टाळण्याच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून क्रेडाईने हा परदेशातील कार्यक्रम रद्द करून अधिवेशन भारतातच आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणावर परकीय चलनाची बचत होणार असून, देशाच्या आर्थिक हिताला प्राधान्य देण्याचा सकारात्मक संदेश संपूर्ण बांधकाम व व्यावसायिक क्षेत्राला मिळाला आहे. 'देश प्रथम' ही भावना जपत क्रेडाईने घेतलेल्या या भूमिकेचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे. क्रेडाई सोलापूरतर्फे या निर्णयाचे समर्थन करण्यात आले.

CREDAI SOLAPUR

राष्ट्रीय हित आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी अशा प्रकारचे निर्णय प्रेरणादायी आहे. भारतीय बांधकाम क्षेत्राने देशाच्या प्रगतीसाठी जबाबदारीने योगदान देत विकासाच्या नव्या संधी निर्माण कराव्यात, असेही यावेळी सांगण्यात आले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४४१

**उपजे तें नाशे । नाशलें पुनरपि दिसे ।**
**हें घटिकायंत्र तैसे । परिभ्रमे गा ।।**

शत्रू असले तरी हे माझे सगे, सोयरे, ईष्ट, मित्र, गुरुजन असल्याने मी यांना कसा मारु, असे अर्जुन म्हणाला. त्यावर श्रीकृष्ण परमात्मा अर्जुनाला समजावत आहेत की, देहाभिमानाने तू असे बोलत आहेत. कोणाला मारणे तुझ्या हातात नाही. अर्थात, तू मारणारा आहेस आणि हे मरणारे आहेत असे म्हणणे योग्य नाही. कारण तू हे फक्त नाशिवंत देहाच्या बाबतीत बोलतो आहेस. प्रत्यक्षात जो आत्मा आहे, तो अविनाशी आहे. आत्मा कधी जन्मत नाही तसेच तो मरत नाही. एकदा होऊन नंतर होणार नाही असेही आत्म्याच्या बाबतीत घडत नाही. हा जन्म-मृत्यू रहित नित्य, शाश्वत, पुरातन आहे. देहाचा नाश झाला तरी आत्मा मारला जात नाही. अर्जुना हा आत्मा शाश्वत, नित्य, अव्यय आहे हे ज्याला पुर्णपणे समजले तो पुरुष कोणास कसा मारणार आणि कोणाचा वध तरी कसा करणार ? ज्याप्रमाणे एखादा मनुष्य जुने वस्त्र टाकून दुसरी नवी घेतो त्याप्रमाणे या देहाचा स्वामी असणारा आत्मा जुनी शरीररुपी वस्त्रे टाकुन दुसरी नवीन देहवस्त्रे ग्रहण करतो. अशा वेगवेगळया प्रकारे अनेक उदाहरणे देऊन श्रीकृष्ण भगवान अर्जुनाला आत्मा अविनाशी कसा आहे हे समजावत आहेत.



भगवान पुढे म्हणाले, या आत्म्याला शस्त्रांनी कापता येत नाही, अग्नीने जाळून टाकता येत नाही, पाण्याने भिजविता येत नाही, वा-याकडून सुकविता येत नाही. हा जिवात्मा न तुटणारा, विरघळु न शकणारा, न जळणारा व न सुकणारा आहे. तो नित्य, अबाधीत, सर्वव्यापी, स्थिर, व्यापक, परिपूर्ण, अचल व अविनाशी आहे. आत्मा अव्यक्त, अचीत्य उपाधिरहित आहे, त्यामुळे अर्जुना तुला शोक करणे शोभत नाही. हे अर्जुना, आत्मा नित्य नसून देहाबरोबर जन्माला येतो किंवा त्याबरोबर मृत्यू पावतो असे तू मानीत असलास तरी त्याबद्दल शोक करणे योग्य नाही. जे उपजते, निर्माण होते, ते विनाश पावते आणि नष्ट झालेले पुन्हा उत्पन्न होते. रहाटगाडगे फिरावे तसे हे जन्ममृत्यूचे चक्र फिरत असते. चंद्र-सुर्याचे उदोअस्त आपोआप होत असतात, त्यामध्ये खंड नसतो. तसेच जन्ममृत्यूचेही आहे असेही भगवान म्हणाले. म्हणून अर्जुना तू हेतुपुरस्सर या अज्ञानात वावरु नकोस. भगवान श्रीकृष्णांनी आत्म्याबद्दल अर्जुनाला सांगण्याचा उत्कृष्ट प्रयत्न केला आहे. आपणही अर्जुनाप्रमाणे नाशिवंत देहाकडे पाहात असतो. त्यातील आत्मा आपणालाही समजू शकला नाही. आपला देह म्हणजे सर्वस्व आहे असे समजून आपण त्याच्यावर अतोनात प्रेम करीत असतो. आपण फक्त देहाचा, इंद्रियांचाच शोध घेत असतो. पण आत्मा नांवाची अविनाशी अशी नेमकी कोणती वस्तु आहे याकडे कधी पाहाण्याचा प्रयत्न करीत नाही. अर्जुनाच्या सोबत आपण राहू या. म्हणजे आपणालाही आत्मा काय आहे, त्याचे अस्तित्व कोठे आहे याबद्दल समजू शकेल. अर्जुनाच्या सोबत राहाण्यासाठी आपणाला या ओव्यासोबत अंत:करणपुर्वक व आनंदी वृत्ती जोपासून राहावे लागेल.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. १५ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - वैशाख, कृ. त्रयोदशी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- अश्विनी (२०.१५)**
**योग - आयुष्यमान (१४.२१)**
**करण - विष्टी (१८.५५)**
**राहू काल : शुक्रवार**
**स. १०.३० ते १२.००**

**दिनविशेष : * संत जनाबाई स्मृतिदिन.**
*** आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन.**
**१९०७ - सुखदेव थापर यांचा जन्म पंजाबमधील लुधियाना येथे झाला.**
**२००० - जुन्या जमान्यातील भारतीय चित्रपट व नाट्य अभिनेते सज्जन यांचे निधन.**
**२०२२ भारतीय बॅडमिंटन संघाने प्रथमच थॉमस कप चॅम्पियनशिप जिंकली.**
**२०२२ - भारतीय अभिनेत्री पल्लवी डे हिचे निधन.**

# महापौर विनायक कोंड्याल सोमवारी येणार सायकलवर

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला महापालिकेचा प्रतिसाद**

**पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दर सोमवारी 'नो व्हेईकल डे'**

**सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, बस, सायकल, इलेक्ट्रीक वाहन किंवा पायी येण्यास प्राधान्य**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सोलापूर महानगरपालिकेने इंधन बचत व पर्यावरण संरक्षणासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महापालिकेतील सर्व पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दर सोमवार 'नो व्हेईकल डे' म्हणून घोषित करण्यात आला आहे. महापौर विनायक कोंड्याल हे स्वतः सायकलवर महापालिकेत येणार असल्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल-डिझेलचा काटकसरीने वापर, तसेच वाढते वायू प्रदूषण आणि जागतिक तापमानवाढ यावर नियंत्रण मिळवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. पर्यावरण रक्षण आणि शाश्वत जीवनशैलीचा अवलंब ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले आहे. या दिवशी सर्वांनी खाजगी तसेच शासकीय वाहनांचा वापर टाळून सार्वजनिक वाहतूक, सायकल, ई-वाहन किंवा पायी कार्यालयात येण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले आहेत.

संबंधित सूचनांचे पालन करणे सर्वांसाठी अनिवार्य राहणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला आपली जबाबदारी ओळखून या विधायक उपक्रमाला आपण सर्वांचे उत्स्फूर्त सहकार्य मिळेल, असा विश्वास महापौर विनायक कोंडयाल यांनी व्यक्त केला असून देशहितासाठी छोटेसे योगदान देऊया असे आवाहनही केले आहे.

### महापालिका पदाधिकारी अधिकाऱ्यांनीही प्राधान्य द्यावे

सोलापूर महानगरपालिका मधील सर्व पदाधिकारी/अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी दर सोमवार हा दिवस नो व्हेईकल डे म्हणून घोषित करण्यात येत आहे. नो व्हेईकल डे दिवशी सर्व पदाधिकारी / अधिकारी कर्मचारी यांनी आपली खाजगी दुचाकी किंवा चार चाकी वाहने कार्यालयात आणू नयेत. खाजगी तसेच शासकीय वाहनांचा वापर टाळण्यात यावा.पर्यायी प्रवासाचा वापर कार्यालयात येण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, बस, सायकल, इलेक्ट्रीक वाहन किंवा पायी येण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले आहे.



# न्याय मागितल्यानंतर पोलिसात केस करणे हा कुठला न्याय

**शितल काळे यांच्यासह आदिवासी समाजाने घेतली 'सीईओं'ची भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्याकडे एक महिला शिक्षक न्याय मागण्यासाठी गेले असता त्याच्यावर केस करून अडकाविता हा कोणता न्याय आहे. त्यामुळे याप्रकरणी शहानिशा करून चौकशी करावी अन्यथा आदिवासी समाज रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा आदिवासी समाजाच्या नेत्यांनी दिला आहे.

मागील दोन दिवसा जल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी शितल काळे या महिला शिक्षिकेविरूध्द तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याप्रकरणी सिव्हिल हॉस्पिटलमधून उपचार घेत थेट काळे या महिला शिक्षिकेसह त्यांचे पती, दोन मुले यासह आदिवासी समाजाच्या शिष्टमंडळानी बुधवारी सीईओ कुशल जैन यांची भेट घेतली. त्यावेळी सीईओ यांनी काळे या महिला शिक्षिकेचे दहा वर्षाचे फरक आहे ते देण्याचे आश्वासन दिले असल्याचे शिष्टमंडळाने सांगितले.

याशिवाय शिक्षणाधिकारी यांनी तुमच्याविरूध्द तक्रार केली असेल आणि तुमची काही तक्रार असेल तर ते तुम्ही देवू शकता. आमचा विभाग प्रमुख जर दोषी असेल तर मी कारवाई करणारच असल्याचे आश्वासन सीईओ यांनी दिले असल्याची माहिती आदिवासी शिष्टमंडळाला दिली. यावेळी शिक्षिका शितल काळे यांच्यासह माजी नगरसेविका राजश्री चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण, नकूल चव्हाण, चिट्टू पवार आदी उपस्थित होते.





## आयडियल स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के

**सोलापूर, दि. १४ मे-**

आयडियल इंग्लिश मीडियम स्कूलचा दहावीच्या बोर्ड परीक्षेत १०० टक्के लागला आहे. या परीक्षेत वेदिका युवराज राठोड हिने ९५.४० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. गौरी अविनाश पाटील हिने ९२.०० टक्के गुणांसह द्वितीय तर वशिफा समीर हनजगीकर हिने ८७.२० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच आलोक मनोज राजगुरू याने ८६.६० टक्के गुणांसह चौथा, तर हर्षराज महासिद्ध आठवले याने ८५.६० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक मिळविला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सचिन चव्हाण, सचिवा ज्योती चव्हाण, मुख्याध्यापिका उर्मिला कटप तसेच सर्व मार्गदर्शक शिक्षकांनी कौतुक केले.





## सुयश सेंट्रल स्कूलचा अथर्व रणदिवे बारावी परीक्षेत प्रथम

**सोलापूर, दि. १४ मे-**

मार्च २०२५-२६ मध्ये घेतलेल्या बारावी सुयश सेंट्रल स्कूलच्या इयत्ता बरावीचा सीबीएसई बोर्ड परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला.

या परीक्षेत १३पैकी १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या अथर्व रणदिवे (९२ टक्के), (८५ टक्के), आदर्श मौर्य (८० टक्के) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान मिळविले.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव केशव शिंदे, मुख्याध्यापिका विद्या शिंदे, व्यंकट, बायस आणि सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

## बैलाने मारलेल्या शेतकऱ्याचा मृत्यू

**सोलापूर-** पाणी पाजत असताना अचानक बैलाने मारल्याने जखमी झालेल्या लोहारा तालुक्यातील एका शेतकऱ्याचा उपचारादरमान्य येथील शासकीय रुग्णालयात मंगळवारी मध्यरात्री बारा वाजता मृत्यू झाला. नितीन अशोक माळी (वय ४० रा.जेवळी, जि. धाराशिव) असे शेतकऱ्याचे नाव आहे. ते सोमवारी दुपारच्या सुमारास शेतात बैलाला पाणी पाजत होते. त्यावेळी बैलाने ढुसणी मारल्याने त्यांच्या कमरेस मार लागून ते जखमी झाले होते. त्यांना कुंभारी येथील एका खाजगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात नातेवाईक नामदेव माळी यांनी मंगळवारी पहाटे दाखल केले होते.

## उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांचा नागरिकांशी संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी बुधवार दि. १३ मे रोजी प्रभाग क्र. २३ मधील विकासकामांची पाहणी केली. विकासकामांबाबत नागरिकांशी संवाद साधला.



प्रभाग क्र.२३ मधील लोकु तांडा, अनंत स्मार्ट सिटी, कल्याणी ड्रीम सिटी या भागाला उपमहापौर देवकर यांनी सकाळी भेट दिली. भागातील ए.जी. पाटील इन्स्टिट्युट्स ते लोकुतांडा हा रस्ता अत्यंत खराब झाल्याने त्याच्या दुरुस्तीची मागणी परिसरातील रहिवाशांकडून सातत्याने केली जात होती. त्या अनुषंगाने उपमहापौर देवकर, सामाजिक कार्यकर्ते महेश देवकर यांच्या पाठपुराव्यातून व आमदार सुभाष देशमुख यांच्या सहकार्याने हा रस्ता दुरुस्तीचे काम चालू आहे. संबंधित काम चांगले होत आहे का नाही, याची पाहणी उपमहापौर देवकर व सामाजिक कार्यकर्ते महेश देवकर यांनी केली. तसेच संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांना काम चांगल्या दर्जाचे व वेळेत पुर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

कल्याणी ड्रीम सिटीतील नागरिकांनी त्यांना सोसायटीत पाण्याची जलवाहिनी टाकण्याबाबत निवेदन दिले होते. त्यानूसार कल्याणी ड्रीमसिटीत जलवाहिनी टाकण्याबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

लवकरच कामाबाबत सुरुवात करण्याचे आश्वासन दिले. यावेळी लोकूतांडा, कल्याणी ड्रीम सिटीवरुन सोरेगावला जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या विविध नगरांतील नागरिकांनीही लोकूतांडा ते सोरेगाव रस्ता करण्याबाबत देवकर यांच्याकडे मागणी केली. त्यावरही देवकर यांनी आश्वासक उत्तर दिले. लोकूतांडा येथील धोकादायक डीपी व अन्य मागण्याबाबतही सकारात्मकता उपमहापौर देवकर यांनी दर्शवली.

# लोकसहभागातून 'नो व्हेईकल डे' ही लोकचळवळ व्हावी

**कृतीतून देशभक्ती सिद्ध करणारे सोलापूरकर पुन्हा एकदा सज्ज होणार**

आखाती युद्धाचे साईड इफेक्ट्स जाणवत आहेत. आर्थिक सक्षमतेबरोबरच आपला देश अधिक भक्कमपणे स्वाभिमानाने उभा राहिला पाहिजे. देशाच्या प्रगतीसाठी मोठमोठे निर्णय जितके महत्त्वाचे असतात, तितकीच गरज असते ती छोट्या पण प्रभावी कृतींची आवश्यकता असते. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत आणि पर्यावरण संरक्षणाच्या आवाहनाला प्रतिसाद देत सोलापूरचे महापौर विनायक कोंड्याल यांनी 'नो व्हेईकल डे' हा उपक्रम सुरू करण्याचा घेतलेला निर्णय हा केवळ प्रशासकीय आदेश नसून सामाजिक परिवर्तनाची सुरुवात ठरू शकतो. दर सोमवार हा 'नो व्हेईकल डे' म्हणून पाळण्याचा निर्णय घेताना महापौरांनी स्वतः सायकलवरून महापालिकेत येण्याचा घेतलेला निर्णय विशेष उल्लेखनीय आणि आदर्शवत आहे. कारण नेतृत्व हे केवळ शब्दांतून नव्हे, तर कृतीतून दिसले पाहिजे. आधी केले मग सांगितले या उक्तीचा प्रत्यय देणारी महापौर कोंड्याल यांची ही कृती नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

सोलापूर महापालिकेतील सुमारे साडेतीन हजार अधिकारी आणि कर्मचारी या उपक्रमात सहभागी होणार असल्याने याचा परिणाम व्यापक स्वरूपात दिसून येऊ शकतो. सोलापूर हे शहर ऐतिहासिकदृष्ट्या लढवय्ये आणि स्वाभिमानी आहे. स्वातंत्र्य लढ्यात सोलापूरचे मोठे योगदान आहे. सोलापूर शहराचा स्वातंत्र्यलढ्यातील इतिहास हा केवळ अभिमानाचा विषय नाही, तर प्रेरणेचा अखंड झरा आहे. देश पारतंत्र्यात असताना तब्बल चार दिवस स्वराज्याचा अनुभव घेणारे हे क्रांतिकारी शहर आजही त्याच जिद्दीची साक्ष देत उभे आहे. अन्यायाविरुद्ध झुंजार लढा उभारत सोलापूरकरांनी ब्रिटिश सत्तेला हादरवून सोडले होते. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी येथे मार्शल लॉ लागू करण्याची वेळ आली. त्या संघर्षाने लंडनच्या सत्ताकेंद्रालाही हादरा बसला होता. या लढ्यात अनेक वीरांनी आपल्या प्राणांची आहुती देत स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित ठेवली. त्या चार दिवसांत सोलापूरकरांनी केवळ स्वातंत्र्य अनुभवले नाही, तर स्वयंशिस्त, जबाबदारी आणि सुयोग्य प्रशासन कसे असावे, याचे आदर्श उदाहरण देशासमोर ठेवले. हीच परंपरा आजही सोलापूरच्या प्रत्येक नागरिकाच्या रक्तात जिवंत आहे. देशहितासाठी कधीही मागे न हटणारे, संकटसमयी एकजुटीने उभे राहणारे आणि कृतीतून देशभक्ती सिद्ध करणारे सोलापूरकर पुन्हा एकदा पुढाकार घेण्यास सज्ज आहेत. म्हणूनच 'नो व्हेईकल डे' ही केवळ घोषणा न राहता, सोलापूरच्या त्या ऐतिहासिक वारशाला साजेसा कृतिशील प्रतिसाद ठरावा. ज्या शहराने स्वातंत्र्यासाठी लढा दिला, ते शहर आज पर्यावरण आणि राष्ट्रहितासाठीही तितक्याच ताकदीने उभे राहील, याबाबत कोणतीही शंका नाही. देशहितासाठी योगदान ही भावना कृतीत उतरवण्याची हीच योग्य वेळ आहे.

आज त्याच परंपरेला साजेसा प्रतिसाद देण्याची वेळ पुन्हा एकदा आली आहे. 'नो व्हेईकल डे' ही संकल्पना केवळ वाहन न वापरण्यापुरती मर्यादित नाही, तर ती शाश्वत जीवनशैलीकडे टाकलेले एक ठोस पाऊल आहे. आजच्या घडीला वाढते वायू प्रदूषण, जागतिक तापमानवाढ आणि इंधनाचा वाढता तुटवडा या गंभीर समस्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने स्वतःहून पुढाकार घेणे अत्यंत आवश्यक आहे. सार्वजनिक वाहतूक, सायकल, ई-वाहन किंवा पायी चालण्याचा पर्याय स्वीकारणे हे केवळ पर्यावरणासाठीच नव्हे, तर वैयक्तिक आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. थोडे चालणे, थोडा श्वास मोकळा घेणे आणि शहराशी जवळीक वाढवणे.




**किरण बनसोडे**
**मो. ९८२२६१६१४१**

ही या उपक्रमाची खरी ताकद आहे.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हा उपक्रम कोणत्याही राजकीय चौकटीत अडकू नये. 'नो व्हेईकल डे' ही एक लोकचळवळ बनली पाहिजे. यात टीका-टिप्पणीपेक्षा सहभाग महत्त्वाचा आहे. यातून कुणाचाही तोटा होत नाही; उलट इंधन बचत, पैशांची बचत, प्रदूषणात घट आणि आरोग्य सुधारणा असे अनेक फायदे मिळतात. या उपक्रमाला प्रतिष्ठा देण्याची आवश्यकता आहे. केवळ सोमवारीच नव्हे तर जेव्हा जेव्हा शक्य आहे तेव्हा तेव्हा पायी चालत जाण्याची सवय लावून घेण्याची गरज आहे. आणि या सवयीला सर्वांकडून प्रतिष्ठा मिळण्याची आवश्यकता आहे. शहरातील प्रतिष्ठित नागरिक, उद्योजक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींनी, पदाधिकारी, अधिकारी - कर्मचारी स्वतःपासून सुरुवात केली, तरच हा संदेश तळागाळापर्यंत पोहोचेल. एक दिवस वाहनाशिवाय जगण्याचा प्रयत्न हा उद्याच्या शाश्वत भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. आपले नातेवाईक, मित्र, सहकारी यांच्या समवेत काही अंतर का होईना पण वाहनाशिवाय चालत हितगुज आणि गप्पा मारत एक सुखद प्रवास करावा. एक नवा आनंद घेता येऊ शकतो.

'नो व्हेईकल डे' हा केवळ एक दिवस न राहता सवय बनली पाहिजे. आठवड्यातून एक दिवस का होईना, पण आपण स्वतःहून हा संकल्प पाळला, तर त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण शहरावर होईल. सोलापूरकरांनी यापूर्वीही देशहितासाठी पुढाकार घेतला आहे; आता पुन्हा एकदा त्याच एकजुटीची गरज आहे. चला तर मग, केवळ घोषणा नको तर कृती हवी आहे. देशहितासाठी छोटेसे योगदान देऊया आणि 'नो व्हेईकल डे'ला एक अभिमानाची लोकचळवळ बनवूया...!

# प्राणी संग्रहालयातील कामासाठी डीपीडीसीमधून निधीचा प्रयत्न

**महापालिका सर्वसाधारण सभेत मान्यतेनंतर प्रस्ताव पाठविणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

शहरातील महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाचा दर्जा उंचावून सेंट्रल झू अथॉरिटीची मान्यता पुन्हा मिळवण्यासाठी महापालिकेने तब्बल १५ कोटींच्या कामांचा आराखडा तयार केला आहे. या निधीसाठी डीपीडीसीकडे प्रस्ताव पाठविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महापालिकेची आर्थिक परिस्थिती डळमळीत असल्याने हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूर करून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पुढे पाठविण्यात येणार आहे.

सोलापूर महापालिका अंतर्गत असलेल्या शहरातील महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथील विविध त्रुटींमुळे सेंट्रल झू एथॉरिटीने रद्द झाली होती. ती मान्यता पुन्हा मिळवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून हालचाली सुरू आहेत. झु ऑथॉरिटीने काढलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी विविध कामे करणे क्रमप्राप्त आहे. यानुसार या विविध १५ कामांचा सुमारे १४ कोटी ९९ लाख ७१ हजार ६०० रुपयांचा आराखडा तयार केला आहे. यासाठीचा निधी जिल्हा नियोजन विभागाकडून मिळविण्यासाठी प्रस्ताव सादर करणार आहे. आराखड्यास व प्रस्तावास मान्यता मिळण्याचा विषय महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या पटलावर




घेण्यात आला आहे.

महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे विविध कामे करणे तसेच केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण यांनी दि. २८ डिसेंबर २०२१ रोजीच्या आदेशान्वये वन्यजीव संरक्षण कायदा मधील मानकांचे उल्लंघन होऊन या प्राणीसंग्रहालयामधील ४५ त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कळविले होते. केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण नवी दिल्ली यांच्याकडील वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत प्राणी संग्रहालयाची मान्यता पुनर्स्थापित करणे आवश्यक असल्याने तसेच प्राणी संग्रहालय चालू स्थितीत असताना महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाची संबंधित काही तांत्रिक बाबींची पूर्तता केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणकडे प्रलंबित आहे. यातूनच केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाची मान्यता मिळण्यासंबंधी प्राणी संग्रहालयाशी निगडित प्रलंबित बाबींची पूर्तता करून कायदेशीर मान्यता पुनर्स्थापित करण्यासाठी यामधील आतापर्यंत 'एनटीपीसी' कडून प्राप्त सीएसआर फंडातून बिबट्या, सिंह, काळविट व मोराचे सहवास क्षेत्र अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे तसेच जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ मधून या ठिकाणी प्राण्यांसाठी व्हेटर्नरी हॉस्पिटल बांधण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

दि. ६ मे २०२६ रोजी महापालिका आयुक्तांसमवेत झालेल्या चर्चेनुसार काही नवीन आवश्यक स्थापत्य विषयक बाबींची पूर्तता करण्याबाबत सेंट्रल झू एथॉरिटी दिल्ली यांनी सांगितले आहे. त्याप्रमाणे महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाचे सल्लागार एन्व्हायरोसेफ कन्सलटंट यांच्याकडून विविध विकास कामाचे पूर्वगणनपत्रक आणि आराखडा तयार करून घेतला आहे.

या विविध विकास कामांसाठी १५ कामांसाठी १४ कोटी ९९ लाख ७१ हजार ६०० रुपये लागणार आहेत. महात्मा गांधी प्राणी संग्रहालयातील फेज दोन मधील विविध कामांसाठी १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होऊन मिळण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्याची मागणी आ. देवेंद्र कोठे यांनी केली आहे. सध्या महापालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने या कामासाठी शंभर टक्के निधी महापालिकेला प्राप्त होणे आवश्यक आहे. या कामाच्या पूर्वगणनपत्रकास जिल्हा नियोजन विभागाकडील 'प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२६-२७' किंवा अन्य जिल्हा वार्षिक योजनेतील बजेट तरतुदीमधून हा निधी मिळावायासाठी हालचाली असून जिल्हाधिकाऱ्यांची प्रशासकीय वित्तीय मान्यता मिळण्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. यामुळे हा प्रस्ताव मान्यतेसाठी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे आणला आहे. यावर चर्चा होऊन निर्णय होणार आहे.

### प्राणीसंग्रहालयातील अशी कामे व लागणारा निधी कंसात

रॉयल बेंगल टायगर (१ कोटी ७० लाख ७४ हजार), जॅकल (१ कोटी १३ लाख ५४ हजार), फॉक्स (१ कोटी १५ लाख ११ हजार), खुले ॲम्पीथिएटर आणि इव्हेंट स्पेस (२३ लाख ४४ हजार), रेस्ट एरिया- पॅगोडा (१४ लाख २ हजार), फुडकोर्ट आणि इंटरपिटेशश सेंटर (१ कोटी ४१ लाख ९१ हजार), पेट्टींग झू (१ कोटी ३० लाख ५२ हजार), डीआयवाय वर्कशॉप स्पेस (१ कोटी १६ लाख ९८ हजार), इन्फोटेन्मेंट एरेना (१३ लाख ४१ हजार), जॅपनीज गार्डन (२८ लाख ७ हजार), ट्रॉपीकल फॉरेस्ट्री (१० लाख ६४ हजार), फ्रेग्रन्स गार्डन (१२ लाख २७ हजार) आणि एआर व एआय शो (१ कोटी ६६ लाख ७० हजार) असे १० कोटी ५७ लाख ४१ हजार ५११ रुपये लागणार आहेत. याशिवाय इंटरनल इलेक्ट्रिफिकेशन वर्क (५२ लाख ८७ हजार), वॉटर सप्लाय अँड अंडर ड्रेनेज सिस्टीम वर्क (५२ लाख ८७ हजार) क्वालिटी कंट्रोल टेस्टींग अँड रॉयल्टी चार्जेस (१७ लाख ४४ हजार), आर्किटेक्चर फी ३ टक्के (४२ लाख ५ हजार), कंटींजेन्सीज ४ टक्के (५६ लाख ६ हजार) आणि १८ टक्के जीएसटी (२ कोटी ९ लाख ३६ हजार) असे एकूण १४ कोटी ९९ लाख ७१ हजार ६०० रुपये.

## महत्वाचे...



### जामगाव येथे एकता महिला मंचतर्फे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**वैराग, दि. १४ मे-**

येथील जय मल्हार सार्वजनिक वाचनालय, जामगाव (आ) येथे 'एकता मंच'च्या सदस्यांच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासाचे स्मरण करत 'जय भवानी, जय शिवाजी', 'छत्रपती संभाजी महाराज की जय' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. या कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन एकता महिला मंचच्या सदस्यांनी केले होते. यावेळी व्यासपीठावर रेश्मा मुकटे, कल्पना वाघमोडे, सुचिता कुटे, सुनिता नवले, सुकमल खंडागळे आदी महिला उपस्थित होत्या. महिलांनी संभाजी महाराजांचे शौर्य आणि त्यांनी स्वराज्यासाठी दिलेल्या बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. महाराजांचा इतिहास आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून, त्यांचे विचार घराघरात पोहोचवणे काळाची गरज आहे, असे मत व्यक्त करण्यात आले. जय मल्हार वाचनालयाच्या परिसरात पार पडलेल्या या सोहळ्यासाठी गावातील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. एकता महिला मंचच्या वतीने राबवलेल्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### चर्मकार समाजाचा ३१ मे रोजी राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

**दक्षिण सोलापूर, दि. १४ मे-**

चर्मकार समाज विकास मंडळाच्या वतीने चर्मकार समाजातील उपवर युवक- युवती, घटस्फोटीत, विधवा, विधुर तसेच दिव्यांग यांचा राज्यस्तरीय वधु- वर परिचय मेळावा आयोजित केल्याची माहिती मुख्य निमंत्रक राजशेखर जेऊरकर यांनी दिली. परिचय संमेलन रविवार दि. ३१ मे रोजी सकाळी आठ ते सायंकाळी पाच या वेळेत जामगोंडी लॉन्स, आसरा ब्रिज जवळ, सोलापूर येथे होणार आहे. संमेलनाच्या आयोजनाचे हे दुसरे वर्ष असून संपूर्ण राज्यभरातून तसेच कर्नाटक व आंध्र प्रदेश येथूनही वधू वरांची नोंदणी होत आहे. वधु वर परिचय संमेलन हे पूर्णतः विनामूल्य असून याचा लाभ सर्व समाज बांधवांनी घ्यावा, असे आवाहन पाटबंधारे विभागाचे निवृत कार्यकारी संचालक हरिदास टोणपे व सोलापूर महानगरपालिकेचे निवृत नगर अभियंता सुभाष सावस्कर यांनी केला आहे. नाव नोंदणीसाठी वामन धूळराव ९४२३३७६२२५, परशुराम शिंदे ९७३०८१३०४६, सदाशिव कांबळे ९९२३०८०७८७ यांच्याशी संपर्क साधावा. संमेलनासाठी दत्ता शिंदे, मल्हारी बनसोडे, शिवपुत्र हरवाळकर, यशवंत कांबळे, श्रीकांत मनुखाने, कल्लप्पा व्हनहुवे, संगीता शिंदे- हत्याळीकर, सुनिता वनस्कर, दत्ता हरवाळकर, शावरप्पा वाघमारे, काशिनाथ वाघमारे, महादेव कांबळे, राजश्री कांबळे, रेवणसिद्ध व्हनमराठे, शिवकुमार तोळणुरे, राजेंद्र कांबळे, राजू व्हनकोरे, अंबादास चाबुकस्वार, ज्योती बनसोडे, राजश्री कांबळे, सुधीर बनसोडे, सचिन राजगुरु, अशोक धुळराव, प्रशांत आगवणे, पौर्णिमा धूळराव, चेतन वाघमारे, सुजाता हरवाळकर, सुहास राजभोज आदी परिश्रम घेत आहेत.

### लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याच्या गुन्हयातून आरोपीस जामीन मंजूर

**पंढरपूर, दि. १४ मे-**

मंगळवेढा येथील लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केलेच्या मंगळवेढा, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१८५/२०२६ हा गुन्हा दाखल झालेला होता. सदर गुन्ह्यामध्ये आरोपी समाधान मेटकरी यास मंगळवेढा पोलीसांनी अटक करुन पंढरपूर येथील मे.जिल्हा न्यायाधीश यांचे कोर्टासमोर हजर केले. त्यानंतर आरोपीस न्यायालयीन कोठडीचा आदेश झालेला होता. त्यानंतर सदर आरोपीने मे. कोर्टात नियमित जामीन मिळणेसाठी वकीलामार्फत जामीन अर्ज दाखल केला होता. त्यानंतर सदर जामीन अर्जावर आरोपीचे वतीने व सरकारी पक्ष व मुळफिर्यादीचेवतीने युक्तीवाद करण्यात आला. सदर आरोपीचे वकीलांचा युक्तीवाद ग्राहय धरुन पंढरपूर येथील मे.जिल्हा न्यायाधीश श्रीमती.मिटकरी मॅडम यांचे कोर्टाने आरोपीस जामीन मंजूर केलेला आहे.सदर प्रकरणात आरोपीच वतीने ॲड. तुषार आनंद रोकडे यांनी काम पाहिले.

# 'गुरु माऊली'ला पुन्हा तीन दिवसांची पोलिस कोठडी

### तपास अधिक गतीने सुरू; आतापर्यंत ४ तक्रारी दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १४ मे-**

भक्तांची आर्थिक फसवणूक करणारा भोंदू नानासाहेब विरकर उर्फ 'गुरु माऊली' याला न्यायालयाने १६ तारखेपर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपींकडून २० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली असून तपास अधिक गतीने सुरू आहे.

बुधवार (दि. १३) रोजी अनगर (ता. मोहोळ) येथील एका महिलेने फसवणुकीची तक्रार दाखल केली असून, आतापर्यंत या प्रकरणात एकूण चार तक्रारी नोंद झाल्या आहेत. याआधी पंढरपूर येथील निलेश भुईटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विरकर व त्याचा भाऊ विकास विरकर हे पोलिस कोठडीत आहेत. तपासादरम्यान धक्कादायक माहिती समोर आली असून, आरोपी विकास विरकर हा नाशिक जिल्ह्यातील त्रिंबकेश्वर तसेच संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ (घृष्णेश्वर मंदिर परिसर) येथे हातगाड्यांवर कासव विकणाऱ्या विक्रेत्यांकडून २०० ते ३०० रुपयांना कासव खरेदी करत होता. हीच कासवे ''पिडा दूर होते'' असे सांगत भक्तांना तब्बल २१ हजार रुपयांना विकली जात होती. आतापर्यंत सुमारे १०० कासवे आणल्याची माहिती समोर आली असून त्यापैकी तीन कासवे पोलिसांनी जप्त केली आहेत.

विशेष म्हणजे, तक्रारदाराकडून जप्त केलेले जिवंत कासव नेमके कुठून आणले याचा अद्याप उलगडा झालेला नाही. न्यायालयात सुनावणीदरम्यान पोलिसांनी आणखी आरोपींचा सहभाग असण्याची शक्यता व्यक्त करत इंदापूर येथील घराची झडती, आश्रमातील कथित काळ्या जादूचे स्वरूप, तसेच कामाख्या देवी व नरसोबावाडी येथे केलेल्या विधींच्या तपासासाठी सात दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती.

मात्र न्यायाधीश अनय कुलकर्णी यांनी तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. आरोपींच्या वकिलांनी अटकेपूर्वी नोटीस न देणे, जप्त वस्तू जादूटोण्याशी संबंधित नसल्याचा दावा, तसेच बदनामीसाठी खोट्या तक्रारी केल्याचा युक्तिवाद केला. तरीही न्यायालयाने पोलिसांची मागणी अंशतः मान्य करत कोठडी सुनावली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता स्वतंत्र विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी भीम आर्मीचे उतरेश्वर कांबळे यांनी केली आहे.



# मंद्रूपमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व करिअर मार्गदर्शन मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**मंद्रूप, दि.१४ मे-**

डी. एस. कमळे गुरुजी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, मंद्रूप आणि अक्षर ज्युनिअर कॉलेज, कंदलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन मेळावा मातोश्री सभागृह, मंद्रूप येथे पार पडला.

मंद्रूप पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ग्रामीण भागातील मुलींनी एमपीएससी, युपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांद्वारे अधिकारी होण्याचे ध्येय ठेवाव. मोबाईलचा वापर अभ्यासासाठी करण्याचे आवाहन केले. मंद्रूप परिसरात तीन बालविवाह रोखल्याची माहिती देत पालकांनी मुलींच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुणे पंचायत समिती सदस्य मळसिद्ध मुगळे यांनी विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि वैचारिक श्रीमंतीच्या जोरावर यश मिळवावे. मनातील वैचारिक दारिद्र्य संपल्याशिवाय खरी प्रगती होणार नाही, असे सांगितले. भगवद्गीतेतील कर्मयोगाचा संदर्भ देत त्यांनी विद्यार्थ्यांनी फळाची अपेक्षा न ठेवता सातत्याने परिश्रम करत राहावे, असे आवाहन केले.

प्राचार्य अशोक कोळेकर यांनी अक्षर ज्युनिअर कॉलेजचा २०१३ ते २०२६ पर्यंत बारावीचा सलग १०० टक्के निकाल कायम असल्याचे सांगितले. तसेच सेट, नीट, जेईई क्लासेस, पोलीस भरती प्रशिक्षण,एनसीसी व हॉस्टेल सुविधा उपलब्ध असल्याची माहिती दिली. कार्यक्रमाला सरपंच अनिता कोरे, संचालक अभिजीत जवळकोटे, उपसंचालक अविनाश जवळकोटे, तपस्वी कॉम्प्युटर निंबर्गीचे आदित्य जवळकोटे, प्रा. नीता वाघचवरे, प्रा.बाबासाहेब कोकरे, प्रा. महासिद्ध वाले, प्रा. महेश रेवतगांवकर यांच्यासह मंद्रूप, भंडारकवठे, औराद, टाकळी, निंबर्गी, विंचूर, सादेपूर, बसवनगर, कंदलगाव, वांगी परिसरातील विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डी. एस. कमळे गुरुजी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, मंद्रूप येथे एमएस-सीआयटीचे प्रशिक्षण घेणारे २५० पेक्षा जास्त विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

प्रास्ताविक अभिजीत जवळकोटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नीता वाघचवरे यांनी तर आभार प्राचार्य अशोक कोळेकर यांनी मानले.

# माढ्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठी वाहतूक कोंडी

### चौकात पोलिस उपस्थित नसल्याने दादासाहेब साठेंनी केली वाहतूक सुरळीत



**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि.१४ मे-**

माढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात गुरुवारी दुपारी मोठी वाहतूक कोंडी झाली होती. संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे यांचेही वाहन अडकले होते. वाहनधारकांची वादावादी पाहून त्यांनी स्वत: पुढाकार घेवून वाहतुक सुरळीत करण्यास मदत केली.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात वैराग, कुर्डूवाडी सोलापूर व शेटफळ हे रस्ते जोडले गेले आहेत. त्यामुळे या ठिकाणी वाहनाची वर्दळ असते. या ठिकाणी वाहनांना नियंत्रण करण्यासाठी वाहतूक पोलिस नसल्याने वारंवार या चौकात वाहतूक कोंडी निर्माण होते.

काल झालेल्या वाहतूक कोंडीत यावेळी काही वाहनधारकात वादावा0दी दिसून आल्याने व मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाल्याने दादासाहेब साठे यांनी आपल्या वाहनातून उतरून त्या ठिकाणी जाऊन वाहतूक सुरळीत करण्यासाठी काही प्रयत्न केले. यावेळी या ठिकाणी पोलिस उपस्थित नव्हते चौकात चारी बाजूने रस्त्यावर वाहनांच्या रागा लागल्या होत्या.

अशी वाहतूक कोंडी अनेक वेळा का होते ? याचे कारण माढा पोलिस व नगरपंचायत प्रशासनाला माहिती नाही का? अशा घटनांवर का दुर्लक्षित केले जाते. की कारण माहित असून ही त्यावर कोणतेही कारवाई केली जात नाही? असे अनेक प्रश्न आहेत. अशी परिस्थिती निर्माण न होण्यासाठी यावर दोन्ही प्रशासनाने उपाययोजना कराव्यात जेणेकरून अशी परिस्थिती निर्माण होऊन अपघात होऊ नये व या चौकातून नागरिकांना सुरळीत प्रवास करता यावा. या विषयी प्रशासनाने लक्ष दिले नाही तर बेशिस्त वाहतुकीमुळे छोटे मोठे अपघात होऊ शकतात. काही आडमुठ्या वाहनधारकांमुळे गुरुवारी अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ चौकात वाहने एकाच ठिकाणी उभी होती. त्यामुळे चारी रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली.





### वैराग येथे 'सिद्धी एजन्सीज'चा शानदार उद्घाटन सोहळा

#### आधुनिक शेती अवजारांचे दालन आता शेतकऱ्यांच्या सेवेत

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि.१४ मे-**

येथील बार्शी रोडवरील गाळा नं. २०, सांस्कृतिक भवन शेजारी 'सिद्धी एजन्सीज' या आधुनिक शेती अवजारे आणि पॉवर टूल्सच्या भव्य शोरूमचा उद्घाटन सोहळा गुरुवार, दि. १४ मे २०२६ रोजी मोठ्या उत्साहात झाला. आधुनिक शेतीसाठी आवश्यक असणारी अद्ययावत यंत्रसामग्री आता एकाच छताखाली उपलब्ध झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

सोहळ्याचे औचित्य साधून वैराग शहर, मानेगाव आणि परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी एकता महिला मंच, मानेगावच्या प्रमुख रेणुका चौगुले, वैजिनाथ चौगुले, ऋषिकेश चौगुले, सिद्धी चौगुले, कांताबाई चौगुले, सीताबाई कोरे, परमेश्वर कोरे, अश्विनी कोरे, सोनल कोरे, ईश्वर कोरे, देवांश कोरे, अण्णासाहेब चौगुले, सुदर्शन चौगुले, सत्यजित चौगुले, उत्तरेश्वर तोडकरी, सुकशाला तोडकरी, निर्मला लुंगारे, दमयंती शुक्रे आदी उपस्थित होते. सर्व पाहुण्यांनी आणि ग्रामस्थांनी ऋषिकेश चौगुले व दादा चौगुले यांच्या या नवीन व्यवसायाला मनापासून शुभेच्छा दिल्या. शेतीमध्ये यांत्रिकीकरण वाढत असताना अशा दर्जेदार अवजारांच्या दुकानाची वैराग भागाला गरज होती. या एजन्सीमुळे परिसरातील शेतकऱ्यांचा वेळ आणि श्रम वाचण्यास मोठी मदत होणार आहे, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. चौगुले परिवाराने सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## बोगस विद्यार्थी प्रकरणी अपयशी पोलिसावर होणार कारवाई

#### मनसेचे गोवे यांना जिल्हा प्रशासनाकडून पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १४ मे-**

नंदेश्वर येथे माध्यमिक परीक्षेदरम्यान बोगस विद्यार्थी आढळल्याप्रकरणी २० विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल केला होता. मात्र अद्याप १० जणांनाच अटक केली असून उर्वरित १० विद्यार्थ्यांना पकडण्यात अपयशी ठरल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यावर चौकशी करुन कारवाई केली जाईल असे लेखी पत्र मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांना प्राप्त झाले आहे.

दि.२० फेब्रुवारी रोजी दहावीची परीक्षा नंदेश्वर केंद्रावर सुरु असताना केंद्र संचालकास विद्यार्थ्यांबाबत संशय आला. त्यांनी ओळखपत्र तपासणी केल्यावर १० विद्यार्थी बोगस असल्याचे निदर्शनास आले. केंद्र संचालकांनी पोलिसात फिर्याद दाखल केल्यानंतर २० विद्यार्थ्यावर गुन्हा दाखल झाला होता. आज या घटनेला अडीच महिने उलटूनही उर्वरीत १० विद्यार्थी पकडण्यात तपास अधिकाऱ्यांना अपयश आले आहे. शालेय विद्यार्थी जर पोलिसांना सापडत नसतील तर दरोडेखोर, खुनी कसे पकडणार? हे सर्व विद्यार्थी लक्ष्मी दहिवडी येथील सुतार इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे असून डमी विद्यार्थी हे अकॅडमी आर.के. चॅम्पियन स्पोर्टस सांगली येथील आहेत. लक्ष्मी दहिवडी येथे शाळाच जाग्यावर नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत आढळून आले आहे. एवढी मोठी घटना असतानाही पोलिसांना खोलवर तपास करणे जमत नसल्यामुळे याचा उलगडा कसा होणार? असाही सवाल उपस्थित होत आहे.

या सर्व घटनांच्या अनुषंगाने मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनी दि.१ मे रोजी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आंदोलन छेडले. तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेवून योग्य ती चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल असे लेखी पत्र ७ मे रोजी काढले. हे पत्र गोवे यांना नुकतेच प्राप्त झाले आहे.

## मोहोळ तालुक्यात २४ तास वीजपुरवठ्याची हमी

#### मोर्चाच्या इशाऱ्यानंतर महावितरणचे नमते

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १४ मे-**

महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेने महावितरण विरोधात भव्य मोर्चाचा इशारा दिल्यानंतर अखेर महावितरण प्रशासनाने मोहोळ तालुक्यातील ४४ फिडरवर २४ तास सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. आश्वासनानंतर संघटनेने नियोजित मोर्चा तात्पुरता स्थगित केल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दोन महिन्यांपासून महावितरणकडून रात्री सिंगल फेज वीजपुरवठा बंद ठेवण्यात येत होता. रात्री सहा वाजल्यानंतर वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतकरी, फळबाग उत्पादक, विद्यार्थी तसेच दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. मशीनद्वारे दूध काढणे, पिकांना पाणी देणे तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही विपरीत परिणाम होत असल्याची तक्रार होती. या पार्श्वभूमीवर जनहित शेतकरी संघटनेने महावितरण कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. मात्र मोर्चापूर्वीच महावितरण प्रशासनाने संघटनेशी चर्चा करून काही भागात तातडीने २४ तास वीजपुरवठा सुरू करण्यात आल्याचे लेखी पत्र दिले. उपकार्यकारी अभियंत्यांनी दिलेल्या पत्रानुसार मलिकपेठ, बोपले, एकुरके, वाळूज, फिटले, हिवरे आणि पासलेवाडी या फिडरवरील गावांमध्ये २४ तास वीजपुरवठा सुरू केला आहे. उर्वरित ३८ फिडरवरील लोड कमी करून पुढील पाच ते सहा दिवसांत तेथील गावांनाही अखंड सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करणार असल्याचे आश्वासन दिले. थ्री फेज वीजपुरवठा वारंवार ट्रिप होणार नाही, याचीही दक्षता घेतली जाईल. या निर्णयामुळे खवणी, पोखरापूर, आष्टी, शेटफळ, देवडी, वाफळे, नरखेड, सावळेश्वर, शिरापूर, भांबेवाडी व वडवळ परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यावेळी नाना मोरे, दिगंबर कावळे, विजय तळेकर, शिवाजी जाधव, किसन गुंड, तानाजी मोठे, गणेश आतकरे, राजाभाऊ पवार व मनोज खडके आदी उपस्थित होते.

# डीजेचा आवाज व प्रखर लेसर लाईटमुळे नागरिक हैराण

### लग्नसराई; कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १४ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात सध्या लग्नसराईचा हंगाम आहे. मिरवणुकांमध्ये मोठ्या आवाजात डीजेचा वापर होत आहे. कानठळ्या बसवणाऱ्या आवाजामुळे नागरिक, वृद्ध आणि हृदय रुग्ण कमालीचे हैराण झाले आहेत. तसेच प्रखर लेसर लाईटमुळेही डोळ्यांना त्रास होत आहे. पोलिसांकडून कारवाई केली जावी, अशी मागणी नागरिकांसह पत्रकारांमधूनही होत आहे.

सुप्रीम कोर्टाची डीजे, डॉल्बी, प्रखर लाईट यावर बंदी आहे. महापुरुषांच्या जयंती उत्सवावेळी प्रशासनाकडून डीजेला परवानगी नाकारली जाते, मग लग्न सोहळ्यांसाठी हे नियम शिथिल कसे? असा संतप्त सवाल

नागरिकांमधून विचारला जात आहे. पिलीव परिसरात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर डीजे डॉल्बी व लेसर लाईट चालक, संयोजकावर तातडीने कारवाई करण्याची मागणी पिलीव पत्रकार संघाच्या वतीने पिलीव पोलीस दूरक्षेत्रचे हवालदार सतिश रोकडे यांना निवेदन देऊन केली आहे.

याप्रसंगी पिलीव पत्रकार संघांचे अध्यक्ष गणेश देशमुख, सचिव शाहरुख मुलाणी, कार्याध्यक्ष प्रा.संजय पाटील, दामोदर लोखंडे, अतुल नष्टे, सुजित सातपुते, प्रमोद भैस उपस्थित होते.

डीजेच्या दणदणाटामुळे लहान मुले, हृदयरुग्ण आणि वयोवृद्ध नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी रात्री उशिरापर्यंत हे वाद्य सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत आहे. नियमावली सर्वांसाठी समान असावी, मग ती जयंती असो वा लग्न सोहळा, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.




**डीजे डॉल्बी चालकावर कारवाईबाबत पोलिसांना निवेदन देताना गणेश देशमुख, शाहरुख मुलाणी, संजय पाटील, दामोदर लोखंडे आदी.**

#### नागरिकांचा रोष वाढला

शांतता भंग करणाऱ्या अशा डीजे चालक आणि आयोजकांवर पोलीस प्रशासनाने गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी पिलीव पत्रकार संघाने केली आहे. प्रशासनाने वेळीच लक्ष दिले नाही, तर या त्रासाविरुद्ध नागरिकांचा रोष वाढण्याची शक्यता आहे.

#### साहित्य पडून नुकसान

पिलीवच्या पेठेमध्ये सतत गर्दी असते, त्यामुळे डीजे वाजत असताना ग्राहक थांबत नाहीत. परिणामी आर्थिक तोटा होत असल्याची प्रतिक्रिया व्यापाऱ्यांनी दिली. व्यापाऱ्यांच्या दुकानाचे काचा फुटून आतील माल, साहित्य पडून नुकसान झाल्याचीही व्यापाऱ्यांची तक्रार असते.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वीज अंगावर पडून मेंढपाळसह तीन मेंढ्या ठार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १४ मे -**

बार्शी शहर व तालुक्यात बुधवार, दि. १३ मे रोजी दुपारनंतर वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. अलीपूर येथे वीज कोसळून मेंढपाळाचा तसेच त्यांच्या तीन मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाला.

दुपारी तीन वाजेपर्यंत बार्शी शहरात कडक उन्हासह सुमारे ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होत होती. मात्र साडेतीनच्या सुमारास अचानक ढगाळ वातावरणामुळे मोठा बदल झाला. त्यानंतर बार्शी शहरासह अलीपूर, खडकलगांव, बेलगांव, ताडसौंदणे, आगळगांव परिसरात विजांच्या कडकडाटांसह पावसाने जोरदार हजेरी लावली. अलीपूर येथील गट क्रमांक ५९ मध्ये दुपारी चारच्या सुमारास वादळी वारे व पावसादरम्यान, वीज पडल्याने अमोल माने (वय ३५, रा. नेवासा खुर्द, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) या मेंढपाळाचा तसेच त्यांच्या तीन मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेबाबत माहिती मिळताच तहसीलदार एफ. आर. शेख यांच्या आदेशावरुन संबंधित महसूल प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. यानंतर महसूल विभागाने तातडीने पंचनामे करण्याची प्रक्रिया पार पाडली.



## महत्त्वाचे...



### नामदार गडकरी यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर, दि.१४ मे -**

केंद्रीय रस्ते व वाहतूकमार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी श्रींची मूर्ती व उपरणे देऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, नगराध्यक्षा प्रणिता भालके, माजी आमदार प्रशांत परिचारक, मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व व्यवस्थापक प्रविणकुमार घम आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना जीवन जानकर यांनी दिले निवेदन

**वेळापूर, दि.१४ मे-**

मतदारसंघातील अहिल्यादेवी बारव, पानीव येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या पाहणी दौऱ्यानिमित्त आले असता धानोरे गावचे सरपंच जीवन जानकर यांच्या वतीने माळशिरस तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये शिवपुरी मळा व श्रीपूर मळा येथे प्रस्तावित एमआयडीसीचा भारतमाला परियोजनेत सम ावेश, वेळापूर-अकलूज रस्त्यासाठी केंद्रीय रस्ते निधी योजनेतून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, माळशिरस पंचायत समिती सभापती दत्ता मगर, जिल्हा परिषद सदस्य मच्छिंद्र ठवरे उपस्थित होते.

### जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती सदस्यपदी मोहन गायकवाड

**कुर्डूवाडी, दि. १४ मे -**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अंतर्गत जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीत अशासकीय सदस्यपदी कुर्डू (ता.माढा) येथील मोहन गायकवाड यांची नियुक्ती झाली आहे. याबाबत जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना शिफारस केली होती. समितीत एकूण सात अशासकीय सदस्य आहेत. या जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी तर सचिव सहाय्यक आयुक्त सम ाजकल्याण सोलापूर हे आहेत.





### भगवंताच्या भक्तीतच सर्व सुख : ह.भ.प. पाटील

**कन्हेरगांव, दि. १४ मे-**

भगवंताच्या भक्तीतच खरे सुख आणि वैभव मिळते, असे प्रतिपादन हभप राजाभाऊ महाराज रोंगे पाटील यांनी केले. कन्हेरगाव (ता. माढा) येथे बुधवारी (दि. १३ मे) एकादशी निमित्त आयोजित कीर्तन सेवेत ते बोलत होते. सोमनाथ डोके व हनुमंत डोके यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, हभप विष्णू महाराज डोके पाटील, सोसायटीचे संचालक दत्तात्रय डोके पाटील, विनायक पाटील, लिंबाजी हांडे, अमोल मोरे, गणेश शिंदे, केशव डोके, जयराम डोके, लक्ष्मण पाटील, शहाजी पाटील, गहिनीनाथ ताटे, राजेंद्र डोके, जयंत डोके, बाबुराव डोके, पांडुरंग डोके, तुकाराम केदार, दिलीप शिंदे, बाळासाहेब डोके, दत्तात्रय साळुंखे, जालिंदर डोके, संतोष शिंदे, उत्तम भरगंडे, रामचंद्र खोचरे, शिवदास पाटील, बळीराम शिंदे, चेअरमन श्रीमंत पाटील, नागनाथ भगत, कांतीलाल शिंदे, महादेव पाटील, शंकर पाटील, भिमराव धुमाळ, सौदागर भरगंडे, मोहन पाटील, दत्तात्रय पाटील, समाधान पाटील, नागनाथ केदार, सोमनाथ भरगंडे, कबीर डोके, दत्तात्रय खोचरे, भारत डोके, तुकाराम मोरे उपस्थित होते.

# पालखी महामार्गाचे काम ८० टक्के पूर्ण



### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

### दिवे घाटातील रस्त्याचे रुंदीकरण वर्षाखेरपर्यंत पूर्ण होईल

**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि.१४ मे-**

पालखी महामार्गाचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. दिवे घाटातील अरुंद रस्त्याची अडचण आता दूर झाली आहे. घाटातील रस्त्याचे रुंदीकरण केले असून संपूर्ण काम डिसेंबर अखेर पूर्ण होईल, तसेच जेजुरी येथील बायपासला असलेला स्थानिक विरोध विचारात घेऊन त्या ठिकाणी उड्डाणपूल उभारण्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली.

मंत्री नितीन गडकरी यांनी आज आळंदी-पंढरपूर पालखी महामार्गाची (एन एच ९६५) सविस्तर पाहणी केली, यावेळी ते माध्यमांशी बोलत होते. मी कामाच्या दर्जाबाबत अत्यंत कडक असून रस्ते दर्जेदारच झाले पाहिजेत असा माझा आग्रह आहे. या प्रकल्पात अनेक तांत्रिक अडचणी आल्या, मात्र स्थानिक आमदार आणि खासदारांनी केलेल्या सहकार्यामुळे हे काम मार्गी लागले आहे. या महामार्गाच्या बांधकामात 'अल्ट्रा-हाय-परफॉर्मन्स काँक्रीट' (युएचपीसी) या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. तब्बल १३ पुलांसाठी हे तंत्रज्ञान वापरले आहे. संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर केवळ रस्तेच नव्हे, तर पर्यावरण आणि पाणी नियोजनावरही भर दिला आहे. या मार्गावर ४६ तलाव बांधले असून ४० हजार झाडे लावली आहेत, ४५० जुन्या झाडांचे यशस्वी पुनरोपण केले आहे, असेही ना. गडकरी म्हणाले. हा मार्ग केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून यामुळे पर्यटन आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, तसेच शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### पंतप्रधानांच्या आवाहनानंतर ताफा केला कमी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील सर्वाधिक सक्रिय मंत्री म्हणून ओळखले जाणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मोदी यांच्या इंधन बचत आणि राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षा संदर्भात केलेल्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पालखी मार्गाच्या पाहणी दौऱ्यात गडकरी यांनी सुरक्षा कर्मचारी, अधिकारी आणि पत्रकारांसह बसने प्रवास केला.

### पालखी महामार्गावर वारकऱ्यांसाठी विशेष सोय

यात्रेकरूंच्या सुरक्षेबाबत मंत्री गडकरी यांनी नमूद केले की, पादचारी वारकऱ्यांना वाहनांच्या वाहतुकीपासून वेगळे करण्यासाठी महामार्गाच्या आराखड्यात ३.५ मीटर रुंदीचा एक विशेष मार्ग समाविष्ट केला आहे. यामुळे 'वारी' सुरक्षित आणि सुव्यवस्थित राहील. याव्यतिरिक्त, आम्ही ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी इलेक्ट्रिक लिफ्टने सुसज्ज असलेले फूट ओव्हर ब्रिज उभारत आहोत, असेही ते म्हणाले.



## ऐतिहासिक विहिरीची पाहणी करत केले वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १४ मे-**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज माळशिरस तालुक्यात घुलेवस्ती येथील रस्त्यालगत जुन्या ऐतिहासिक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यकाळातील विहिरीची पाहणी करीत वृक्षारोपणही केले.

पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार अभिजीत पाटील, मा.खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर, मा.आ. राम सातपुते, मा.आ. रणजितसिंह मोहिते पाटील, सभापती दत्तात्रय मगर, अ‍ॅड. अभिषेक पाटील, डॉ. मारुती पाटील, जीवन जानकर, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके, प्रांताधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ आदी उपस्थित होते. रणजितसिंह मोहिते पाटलांनी या विहिरीविषयी माहिती मंत्री महोदयांना दिली.

### मंत्री बसमध्ये; मागे कार्यकर्त्यांच्या गाड्यांचा ताफा

पंतप्रधान नरेंद्र मांदी यांनी इंधन खर्च कमी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी बसमधून प्रवास केला. मात्र या बसच्या मागे कार्यकर्त्यांच्या गाड्यांचा ताफा चालताना दिसत होता. विहिरीजवळ मंत्री महोदय थांबताच या विहिरीच्या परिसराला महागड्या गाड्यांनी वेढा घातल्याचे दिसून आले.

# पालखी महामार्गामुळे वारकरी, भाविकांची वाट सुखकर

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी; पालखी महामार्गाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ मे -**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर पंढरपूर, श्री स्वामी समर्थ अक्कलकोट, यांसारखी महत्त्वाची देवस्थाने असलेल्या सोलापूर जिल्ह्यासाठी रस्ते जाळे मजबूतीचे महत्त्व मोठे आहे. या बाबी लक्षात घेऊन बांधलेले हे महामार्ग प्रकल्प जिल्ह्यातील आध्यात्मिक स्थळांपर्यंत पोहचण्यास भाविकांसाठी सुलभ झाले आहेत. श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पालखी घेऊन येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी वेगळा रस्ता केला आहे. यामुळे वारकरी, भाविकांची वाट आता सुखकर झाल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

ना. गडकरी यांनी आज पालखी महामार्गाची पाहणी केली. यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. सध्या पालखी महामार्गाचे ऐंशी टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करण्यात येतील. पालखी महामार्गावरील काही ठिकाणची रखडलेली कामे डिसेंबरअखेर पूर्ण करण्यात येतील. या बरोबरच वाखरी ते पंढरपूर रस्त्याचे काम रेल्वे प्रशासनाकडून काही परवानगी आलेल्या नाहीत. त्याबाबत तात्काळ पाठपुरावा करून काम मार्गी लावण्यात येईल असेही यांनी यावेळी सांगितले.

पालखी महामार्गाच्या कामांची पाहणी करताना ना. गडकरी यांच्यासम वेत पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, माजी खासदार रणजितसिंह नाईक- निंबाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आम दार रणजितसिंह मोहिते-पाटील, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी विजया पांगरकर, सचिन इथापे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रादेशिक अधिकारी अंशुमन श्रीवास्तव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी आदी उपस्थित होते.



### पुरातन विहिरींचे जतन व संवर्धन

माळशिरस तालुक्यातील घुले वस्ती येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेल्या पुरातन विहिरीचे जतन व संवर्धन करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून या ठिकाणी पालखी महामार्गात विशेष रचना करण्यात आली आहे. पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव येथील बाजीराव विहिरीचेही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून जतन व संवर्धन केले आहे. या दोन्ही विहिरींची पाहणी मंत्री नितीन गडकरी यांनी केली. यावेळी त्यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण देखील करण्यात आले.

### आईची इच्छा पूर्ण करता आल्याचे समाधान

तुळजापूर, पंढरपूर, अक्कलकोट हे रस्ते यापूर्वी मोठ्या प्रमाणात खराब झाले होते. त्यामुळे भाविकांना वाहतुकीच्या समस्येमुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या मार्गावरील रस्ते करण्याची संधी मिळाली तर ते रस्ते चांगले कर अशी इच्छा माझ्या आईने व्यक्त केली होती. पांडुरंगाच्या व आईच्या आशीर्वादाने मला रस्ते करण्याची संधी मिळाली.

# कुर्डुवाडी नगरपरिषदेच्या कचरा डेपोमुळे तडवळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात

- पाझर तलाव दूषित होण्याची भीती
- तडवळे ग्रामस्थांवर संकटांचा अतिरेक
- पेयजलाचे प्रदुषण होण्याची भीती
- डासांचा उपद्रव वाढल्याने आजारांची भीती
- कचरा खाण्यासाठी येणाऱ्या कुत्र्यांची भीती
- कचऱ्याला वारंवार आग लावल्याने वायुप्रदुषण

**तभा वृत्तसेवा**
**कुर्डुवाडी, दि.१४ मे-**

कुर्डुवाडी नगरपरिषदेकडून तडवळे (म) आणि भोसरे शिवेवर उघड्यावर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे परिसरात प्रदूषणाने रौद्र रूप धारण केले आहे. कचऱ्यामुळे गावातील पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत असलेला पाझर तलाव दूषित होत असून ग्रामस्थांचे आरोग्य संकटात सापडले आहे. परिणामी तडवळे ग्रामस्थांनी बुधवारी आक्रमक पवित्रा घेत कचरा डेपो कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी केली आहे.



तडवळे (म) येथील गट नंबर २५१ मध्ये ग्रामपंचायतीचे गायरान असून येथे पाझर तलाव आहे. या तलावातून गावातील नागरिकांना आणि जनावरांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. तसेच याच भागात शासकीय धान्य गोदामेही आहेत. मात्र, २००९ पासून कुर्डुवाडी नगरपरिषदेने या गायरान क्षेत्राला लागूनच उघड्यावर कचरा टाकण्यास सुरुवात केली होती. या विरोधात ग्रामस्थांनी बार्शी न्यायालयात धाव घेतली असून हा खटला आजही प्रलंबित आहे. काही वर्षांपासून कचरा टाकणे बंद असताना, अचानक महिनाभरापासून पुन्हा या ठिकाणी उघड्यावर कचरा टाकणे सुरू झाले आहे. पावसाळ्याचे पाणी या कचऱ्यातून पाझर तलावात मिसळण्याची शक्यता असल्याने गावावर जलप्रदूषणाचे संकट उभे राहिले आहे. डासांचे प्रमाण वाढल्याने परिसरात साथीचे आजार पसरण्याची भीती निर्माण झाली आहे.

कचऱ्याला वारंवार आग लावून कचरा पेटवला जातो, त्यामुळे परिसरात आग व धुराचे साम्राज्य पसरलेले आहे. तडवळे ग्राम स्थांनी याबाबत कुर्डुवाडी नगरपरिषदेला जाब विचारला असता ग्रामस्थांवर गुन्हा दाखल करण्याची भाषा नगर परिषदेकडून वापरली जात आहे. चार दिवसापासून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आग लागलेली आहे. नगरपरिषदेकडून कुर्डुवाडी शहरातील मोकाट कुत्री गाडीतून आणून या परिसरात सोडली जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ही कुत्री गट नंबर २५१ च्या परिसरात राहणाऱ्या कुटुंबांवर आणि त्यांच्या पशुधनावर हल्ले करत आहेत.

> कुर्डुवाडी नगरपरिषदेने हा सार्वजनिक उपद्रव तात्काळ थांबवावा, अन्यथा ग्रामस्थांच्या आरोग्याला निर्माण होणाऱ्या धोक्यास प्रशासन जबाबदार राहील. आम्ही न्यायालयाच्या निर्णयाची प्रतीक्षा करत आहोत, परंतु तोपर्यंत नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करून हा कचरा डेपो बंद करावा.
>
> **-अ‍ॅड.मुकेश परबत, ग्रामस्थ.**

## सापडलेली बॅग प्रामाणिकपणे केली परत

### तोंडलेच्या तानाजी जाधव यांनी जपला माणुसकीचा वारसा

**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि. १४ मे -**

आजच्या स्वार्थी जगातही माणुसकी व प्रामाणिकपणा जिवंत असल्याचे प्रेरणादायी उदाहरण तोंडले ता. माळशिरस येथील तानाजी लक्ष्मण जाधव यांनी दाखवून दिले आहे. बुधवारी दि. १३ मे रोजी त्यांनी सापडलेली बॅग संबंधिताला प्रामाणिकपणे परत केली.



तानाजी जाधव हे माळशिरस येथून तोंडले गावाकडे येत असताना माळशिरस परिसरात त्यांना एक सुटकेस सापडली. बॅगमध्ये महत्त्वाची कागदपत्रे, जनगणना नियुक्ती आदेश, पाच साड्या, पर्स तसेच इतर साहित्य होते. बॅग कोणाची आहे, याचा शोध घेण्यासाठी जाधव यांनी आपले मित्र नवनाथ कोडग यांच्या मदतीने बॅगमधील कागदपत्रांची पाहणी केली. त्यातून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित व्यक्तीचा संपर्क क्रमांक मिळवून त्यांनी तात्काळ संपर्क साधला.

यानंतर गुरुवार दि. १४ मे रोजी बोंडले येथे उज्वला गोपाळ शिंदे (नगरपरिषद शाळा, मंगळवेढा) यांच्या वतीने त्यांचे पती खंदारे यांच्याकडे सदर बॅग सुरक्षितपणे सुपूर्त करण्यात आली. हरवलेली बॅग आणि त्यातील सर्व साहित्य सुखरूप परत मिळाल्याने संबंधित कुटुंबियांनी तानाजी जाधव व नवनाथ कोडग यांचे आभार मानले.

प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचे दर्शन घडविणाऱ्या या कृतीमुळे तानाजी जाधव यांच्यावर परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.